
v diary...



# स्वान्त सुखाय

श्याम कुलकर्णी



# या मित्रांनो! घेऊन जा! लुटा! लुटा! लुटून न्या!

# स्वान्तसुखाय

## हे पुस्तक फ़ुकट नाही

यामागे अनेकांचे कष्ट व पैसे आहेत.

पण तरीही आम्ही ते वाचकांना विनामूल्य घेऊ देतो.

कारण ई पुस्तक एकदा बनलं की एकजण वाचो वा एक लाख.

आमचं काहीच कमी होत नाही.

उलट आनंद वाढतो, मजा येते.

पण

## तुम्ही ते फ़ुकट का घ्यावं?

तुम्हालाही काही देता येईल.

असे काही द्या ज्याने ई साहित्यच्या लेखकांना, टीमला आणि तुम्हाला आनंद मिळेल

आणि तुमचं काहीच कमी होणार नाही.

तुम्ही आशिर्वाद आणि शुभेच्छाद्या

लेखकांना फ़ोन करून दाद द्या

आपल्या मित्रांचे मेल पत्ते आम्हाला द्या

मित्रांना आमच्याबद्दल मेल आणि Whatsapp करा

ई साहित्यचे फ़ेसबुक पेज, इन्स्टाग्राम, टेलिग्राम यांवर स्वतः जा व इतरांना आमंत्रित करा. सोशल मिडियावर ई साहित्यचा प्रचार करा.

सर्वात बहुमोल अशा तुमच्या सूचना द्या

दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळ मत, सूचना, टीका, विरोधी मत यांचे स्वागत आहे. प्रामाणिक मत ज्याने लेखकाला व ईसाहित्य टीमला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यास मदत होईल. मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे व त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा. अखेर संपूर्ण समाज एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.

ई साहित्य प्रतिष्ठान

सादर करत आहे

# स्वान्तसुखाय

श्याम कुलकर्णी

# स्वान्तसुखाय


## लेखक : श्री. श्याम कुलकर्णी

पत्ता : द्वारा श्री. जयवंत कुलकर्णी, ''गन्धार''फ़्लॅट क्र. ५/४
आयडियल कॉलनी, कोथरूड पुणे ४११०२९
संपर्क – व्हॉट्स ॲप क्र. ९७६५४५६५८१
Email : sgk6642@gmail. com


या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई (दंड व तुरुंगवास) होऊ शकते.

his declaration is as per the Copyright Act 1957. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

प्रकाशक: : ई साहित्य प्रतिष्ठान

www. esahity. com

esahity@gmail. com

Whatsapp- 9987737237

प्रकाशन : २४ ऑक्टोबर २०२२ (दिवाळी शके १९४४)

©esahity Pratishthan®2021

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई-साहित्य प्रतिष्ठानची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

ई साहित्य प्रतिष्ठान हे मुक्त व्यासपीठ आहे या पुस्तकात व्यक्त झालेली मते व दिलेली माहिती ही पुर्णतः लेखकाची आहेत. त्यांच्याशी ई साहित्य प्रतिष्ठान सहमत असेलच असे नाही.

# श्री श्याम कुलकर्णी



यंत्र अभियांत्रिकी मास्टर्स पदवी M. E. 1975

अभियांत्रिकी महाविद्यालयातून प्राध्यापक म्हणून निवृत्त. लेखनाची लहानपणापासून आवड. किर्लोस्कर, मनोहर, वसंत, प्रपंच, लोकसत्ता अशा अनेक नियतकालिकांमधून स्फुटलेखन प्रकाशित.

# अनुक्रमणिका


१. असेही एक गाव होते!

२. फर्ग्युसनचे दिवस

३. घिसाडकामाचे दिवस

४. यांचे काय करायचे?

५. चष्म्याची पृथ्वीप्रदक्षिणा

६. दोन ओंडक्यांची ----!

७. काचविरहित चष्मा

८. सौंदर्यस्पर्धेत पुरुष?

९. परिमार्जन ----?

१०. गोळी कशी गिळू मी?

११. औषध नलगे मजला!

१२. संस्कृत दिनाच्या निमित्ताने!

१३. स्वान्त सुखाय!

१४. मूक वसन्त!

१५. घोणेसरकार

१६. मांबा, सिंबा, मांबा

१७. अर्धी चड्डी
१८. वजने, मापे काही जुने काही नवे!
१९. दा. मि. ट!
२०. सुबत्ता की (आणि ) चंगळवाद
२१. स्थलांतरित
२२. एकशे एकावा पुरुष

## प्रास्ताविक

हे पुस्तक “श्यामवाटिकाचा दुसरा भाग म्हणून काढायचे असल्याने वेगळी प्रस्तावना काही आवश्यक नाही असे माझे व प्रकाशकांचे ही मत होते.पण नाव बदलल्यावर दोन शब्द लिहावे असे वाटले.

माझे सर्वच लेखन “स्वान्तसुखाय” झाले आहे.त्यामुळे आणि शिवाय “स्वान्तसुखाय” या नावाचा लेखही या संग्रहात समाविष्ट केल्यामुळे हे दोन शब्द लिहावेसे वाटले.या पुस्तकातील जवळ जवळ सर्वच लेख हे मला आलेले काही अनुभव व भेटलेली काही माणसे यावर आधारित आहेत, त्या सर्व व्यक्तींना हे पुस्तक समर्पण !

श्याम कुलकर्णी

# १. असेही एक गाव होते!

ते एक आटपाट नगर होते. छोटेसेच जेमतेम पाच हजार वस्तीचे, म्हणजे लोकसंख्येच्या दृष्टीने खेड्यातच जमा होण्यासारखे. पण एका संस्थानच्या राजधानीचे गाव होते. आणि राजाही तेथे वास्तव्य करत होता. त्यामुळे त्या नगराला वेगळीच शान होती. मायाबाजार चित्रपटात " विझले रत्नदीप नगरात आता जागे व्हा यदुनाथ " हे गीत लिहिताना कविराज गदिमांना याच नगरीची याद आली असणार. काही झाले तरी या नगरीच्या "अंबाबाईच्या परडी" तील नैवेद्य त्यांनी खाल्ला होता ना!शिवाय स्वातंत्र्य मिळण्यापूर्वीही या नगरीत रात्री रस्ते विद्युतद्दीपांनी झळकत. स्वातंत्र्यदिनानिमित्त राजवाड्यासमोरील दीपमाळ संपूर्ण विजेच्या दिव्यांनी चमकत होती आणि तरी राजाने त्यापूर्वीच राज्यत्याग करून जनतेच्या हाती सत्ता सोपवली होती.

गावात शिरण्यापूर्वीच यमाई देवीच्या मंदिराचा कळस दिसू लागे. गावात शिरताना प्रथम दोन बाजूस दगडी खांब असलेल्या वेशीतून प्रवेश करावा लागे व लगेच भव्य क्रीडांगण डाव्या बाजूला दिसू लागे. फाल्गुन महिन्यात शिम ग्याच्या निमित्ताने येथे निरनिराळ्या खेळांचे सामने होत त्याना शिमगास्पोर्टस असे म्हणत. इतर वेळी शाळेतील मुलांचे सामने पण याच

मैदानावर होत. मैदानाच्या टोकाला व्यायामशाळा होती. थोडे पुढे आले की उजव्या बाजूस मूळपीठ देवीच्या मंदिराकडे जाण्याचा रस्ता दिसतो. या रस्त्यावरून जाताना प्रथम दत्तमंदीर लागते ते प्रसिद्ध गायक व व्हायोलिनवादक पं. गजाननबुवा जोशी यांचे पिताजी पं. अनंत मनोहर जोशी यानी आपल्या आध्यात्मिक गुरूच्या स्मरणार्थ बांधले आहे. त्या मंदिरात आश्विन व॥ पंचमीस अतिशय मोठा संगीत महोत्सव होत असे. त्या महोत्सवात भारतातील त्यावेळच्या बहुतेक प्रथम दर्जाच्या गायक वादकांनी हजेरी लावली होती. आता त्या मंदिरासमोर मोठा हॉल रस्त्याच्या विरुद्ध बाजूस बांधला आहे व हा उत्सव तेथे होतो.

तेथून थोडे पुढे गेले मूळपीठ देवीच्या डोंगराच्या पायऱ्या लागतात. या डोंगरावर सकाळी नेमाने जाणाऱ्या लोकांना महाराजांचे दर्शन हटकून व्हायचे कारण भल्या पहाटे ३ वाजता उठून समंत्र सूर्यनमस्कारांचा व्यायाम करून व दुग्धपान करून मूळपीठ देवीच्या दर्शनास जाणे हा त्यांचा नित्यक्रम होता. काळया फरशीच्या जवळ जवळ दहाबारा फूट लांब व दीड फूट रुंदीच्या पाचशेहून अधिक पायऱ्या व एकदम सर्व पायऱ्या चढून दम लागेल म्हणून मध्ये शंभर फूट लांबीचे सपाट भाग (लंबक) देवीच्या मंदिराच्या प्रवेशद्वारापर्यंत नेतात. प्रत्येक सपाटीच्या सुरवातीस दोन बाजूस सुंदर संगमरवरी पुतळे. त्यात जय विजय अधिक लक्षात राहणारे.

पहिल्या सपाटीवर उजव्या बाजूस वळले तर अतिशय सुंदर वस्तुसंग्रहालय दिसते. महाराजांनी देशोदेशीच्या मनमोहक, ऐतिहासिक वस्तूंचा

केलेला संग्रह येथे अतिशय कलापूर्णतेने जतन केला आहे. त्यात वेगवेगळ्या धर्तीचे पुतळे, राजा रविवर्मा, धुरंधर, आलमेलकर अशा निरनिराळ्या प्रसिद्ध चित्रकारांच्याव शिल्पकारांच्या कलाकृती, नाणी, भांडी अशा अनेक वस्तूंचा संग्रह केलेला आहे. त्या इमारतीसभोवतीच्या बागेतही अनेक संगमरवरी पुतळे आहेत. त्यात एक उल्लेखनीय म्हणजे सहा ऋतूंचे संगमरवरी पुतळे व प्रत्येक पुतळ्याखालील चबुतऱ्यावर त्या ऋतूचे वर्णन करणारे काव्य सुंदर अक्षरात कोरलेले!

वानगीदाखल एकच काव्य देतो

हेमंत आला तशी थंडी आली
घेऊन ऊर्णास निवारियेली
शेकावया शेगडी पेटवीली
बाला सुखाने बहू शोभवीली

व चबुतऱ्यावर समोर शेकोटी पेटवून शेकत बसलेल्या बालिकेचा सुंदर पुतळा.

मूळपीठ डोंगराकडे न वळता डाव्या बाजूला वळल्यास गावात प्रवेश व्हायचा. सुरवातीस त्यावेळी भव्य वाटणारी इमारत होती "त्र्यंबक कलाभवन " असे तिच्यावर कोरलेले होते. ते एक प्रकारचे कलादालन होतें. येथेही आवारात अनेक संगमरवरी पुतळे व आतल्या भिंतीवर काही सुंदर पेंटिंग्ज टांगलेली होती. नंतर ती इमारत शैक्षणिक कामासाठी वापरण्यात येऊ लागली. त्याच्यापुढील भाग पंचवटी. त्यात एक सुंदर राममंदीर शिवाय महाराजांच्या वडिलांची समाधी

होती. पंचवटीच्या पुढे आले की बाजाराची जागा इथे आठवड्याचा बाजार मंगळवारी भरत असे. तेथून पुढे एक छानशी बाग होती. तिला विशाल बाग असे म्हटले जाई. मध्यभागी डाक बंगला होता व बाग विविध फुलांनी फुललेली असे. तसेच सरळ पुढे आल्यावर मोठा तलाव लागतो. असे दोन तलाव शेजारी शेजारी होते पण आता त्यातील एकच पाण्याने भरलेला असे. या तळयाच्या काठी आमची प्राथमिक शाळा होती.

नगराच्या मध्यभागी राजवाड्याशेजारी यमाई देवीचे गावातील मंदीर आहे. समोर एक उंच दीपमाळ व एक छोटी दीपमाळ. संस्थानची राजधानी असल्याने कारणपरत्वे निघणारा छबिना आणि दसरयाचे सीमोल्लंघन इतरत्र पहायला न मिळणारे हे सोहळे गावकराना मोठ्या उत्साहाचे असत. छबिना म्हणजे वाजत गाजत देवीचा मुखवटा गावात मिरवीत नेणे त्यामुळे गावातील सर्व प्रजाजनांना देवीचे दर्शन स्वत:च्या घरासमोर घेता येत असे. जणु देवी प्रत्येक घरात पायधूळच झाडत असे. आणि आलेल्या दैवी सुवासिनीची ओटी भरण्याची सुवासिनींची इच्छा पुरी होत असे. पौष महिन्यात हा छबिना अधिक थाटामाटाने निघत असे. अग्रभागी संस्थानचे दोन सजवलेले हत्ती, त्यांच्यामागे चार घोडे व त्यावर ऐटीत बसलेले घोडेस्वार, त्यातील मागील घोड्यांवर दोघे राजपुत्र, त्याच्यामागे दोन सांडणीस्वार आणि त्यापाठोपाठ नगारा, शिग, चौघडा, ढोल सनई, ताशा अशा वाद्यांच्या गजरात आई अंबाबाईची पालखी येताना दिसत असे. हा सगळा सोह्ळा पहाण्यासारखा असे.

दसऱ्याचा सणही मोठा वैशिष्ट्यपूर्ण असे. दसऱ्याच्या पूर्वी मूळपीठवर यात्रा भरायची आणि अष्टमीला महाराज स्वत: येऊन पेढे, बत्तासे, खोबरे उधळायचे आणि ते तुकडे वेचण्यास मुला माणसांची झुंबड उडायची. दसऱ्याच्या दिवशी दुपारी चारच्या सुमारास सजवलेला हत्ती वाड्यासमोर यायचा. वाड्याच्या प्रांगणात सैनिकी कवायत व्हायची आणि त्यानंतर ढोलाच्या तालावर बॅंडपथक "जय अम्बे हो प्रतिनिधिस सुचिर सुखदा "हे गीत वाजवले जायचे आणि सजवलेल्या हत्तीवरील अंबारीतून महाराजांची स्वारी शिलंगणासाठी निघायची. अंबारीत लहान राजपुत्र अगर पुत्री यांपैकीही कोणी तरी असायचे. त्याचबरोबर छबिन्याच्या मिरवणुकीचा बहुतेक जामानिमा असायचा. ही मिरवणूक गावातून मूळपीठ देवीच्या डोंगराच्या डाव्या बाजूस असणाऱ्या मोकळया जागेत जायची.

त्या जागेवर सोने म्हणून वाटायच्या आपट्याच्या डहाळयांचा ढीग रचलेला असायचा. तसेच मैदानावर नेमबाजीसाठी पत्र्याचे डबे टांगून ठेवलेले असत. काही विशिष्ट अंतरावरून त्या डब्यांवर बंदूकीच्या गोळया झाडण्यात येत. गोळी कोठे लागली हे आम्हाला क्वचितच कळे पण त्यानंतर शिंग फुंकले जाई आणि सगळे आपट्याच्या डहाळयां वर तुटुन पडत आणि त्यात मिळालेल्या पान किंवा डहाळी तुऱ्यासारखी आपल्या शिरोभूषणात ऐटीने खोचत. हा सीमोल्लंघनाचा भाग झाल्यावर पुन्हा मिरवणूक वाड्यापर्यंत येऊन कऱ्हाडदेवीसमोरील मंडपात सर्व मानकरी व प्रजाजन जमा होत. प्रथम महाराजांकडून सोन्याचे (आपट्याची पाने) आदान प्रदान होत असे.

त्यानंतरदेवीसमोर राजगायक गायन सादर करीत. पं. अनंत मनोहर जोशी (पं. गजाननबुवा जोशी यांचे पिताजी ) हे राजगायक होते. पण आमच्या काळात वयोमानपरत्वे ते निवृत्त झाले होते

राजवाड्यात स्थापन केलेल्या देवीला कऱ्हाड देवी असे नाव होते त्या देवीसमोरील मंडपसदृश्य जागेत आषाढ मासी महिनाभर कीर्तन महोत्सव होत असे. त्यात महाराज स्वत: कीर्तन करत त्यांचे कीर्तन पहाण्याचा योग मला आला नाही पण अनेक प्रसिद्ध कीर्तनकार तेथे येत तसेच गावातील लहान मोठ्या कलाकारांनाही कीर्तन करण्याची संधी मिळत असे. पं. गजाननबुवा जोशींच्या व्हायोलीनवादनाची सुरवात अशीच महाराजांच्या कीर्तनास करावयाच्या साथीतूनच झाली.

या मंदिराच्या उजव्या बाजूस एक मोठा मंडप ज्यास नवरात्र मंडप म्हणत. नवरात्र मंडपात होणारी नाटके आणि इतर कार्यक्रमही मोठे रंगतदार असत आणि त्यातील महत्वाच्या कार्यक्रमास महाराज स्वत: उपस्थित रहात. महाराजांचे चिरंजीवही कधी कधी या नाटकात भाग घेत आणि अतिशय सुंदर अभिनय करत. महाराज स्वतः उत्तम चित्रकार होते. त्यानी रामायण महाभारतातील प्रसंगावर काढलेली अतिशय सुंदर चित्रे अजूनही यमाई मंदिराची शान वाढवतात.

पंचवटीतील राममंदिराशेजारी समाधीस्थळावर असलेल्या मोठ्या सभामंडपात अनेक नामवंत व्यक्तीची व्याख्याने झाली, त्यात फक्त आचार्य प्र. के अत्रे सोडले तर त्यावेळचे सर्व ख्यातनाम लेखक, वक्ते येऊन गेले. आचार्य

अत्रे यांनी मात्र "साष्टांग नमस्कार " हे सूर्यनमस्काराची (महाराजांच्या मते) कुचेष्टा करणारे नाटक लिहिल्यामुळे त्याना संस्थानात प्रवेशबंदीच होती. त्यामुळे अत्रे औंधात प्रथम आले "श्यामची आई" या त्यानी सानेगुरुजींवर काढलेल्या चित्रपटाच्या चित्रीकरणासाठी पण ते महाराजांच्या निधनानंतरच!

सर्वत्र सकाळी ११ ते संध्याकाळी ५ या कालावधीत भरणारी शाळा संस्थान खालसा होण्यापूर्वीच्या काळात मात्र सकाळी ८ ते ११ व दुपारी दोन ते पाच अशी भरत असे. सकाळीप्राथमिक शाळा सुरू होण्यापूर्वी शाळेच्या इमारतीच्या पटांगणात उभे राहून प्रार्थना व मनाचे श्लोक म्हटले जायचे. प्रार्थनेचे वैशिष्ट्य हे की प्रत्येक वाराची प्रार्थना वेगळी असे. सोमवारी "नमन प्रभुपदा " तर मंगळवारी "मंगल दिन हा " आणि बुधवारी "वंदन त्या ईशा" या तीन प्रार्थना अजून आठवतात. आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे या प्रार्थनांना वेगवेगळ्या रागदारीतील चाली असत. वर उल्लेखलेल्या प्रार्थना झिंझोटी, बिहाग आणि भीमपलास या रागात संगीतबद्ध केलेल्या होत्या.

सकाळच्या शाळेतील मधल्या सुट्टीत राजवाड्याशेजारील यमाई देवीच्या मंदिराच्या भव्य मंडपात शाळेतील सर्व विद्यार्थी सूर्यनमस्कारासाठी जमत आणि त्यांच्या मंत्रोच्चाराने मंडप दणाणून जात असे. दुय्यम शिक्षणाची शाळा श्रीयमाई श्रीनिवास विद्यालय या नावाने प्रसिद्ध होती आणि या शाळेत अतिशय प्रसिद्ध व्यक्तींनी शिक्षण घेतले. त्यापैकी एक म्हणजे कविवर्य ग. दि. माडगुळकर. याच शाळेत "गुरुदक्षिणा" या नाटकातील त्यानी केलेल्या वक्रदंताच्या भूमिकेचे राजाने कसे खदखदा हासून कौतुक केले व त्याना " बाळ

तू टाकीत जा " असा सल्ला दिल्याचे त्यानी आपल्या "औंधाचा राजा " या लेखात उल्लेख केला आहे. या शाळेतच शिकलेले दुसरे महनीय व्यक्तिमत्व म्हणजे पां. स. तथा सानेगुरुजी. भारताचे अनेक ठिकाणी राजदूत म्हणून राहिलेले बॅ. अप्पासाहेब पंत हे तर महाराजांचे पुत्रच असल्यामुळे याच शाळेत शिकणार हे उघडच होते. याशिवाय "तराळ अंतराळ " या आत्मवृत्ताचे लेखक, मराठवाडा विद्यापीठाचे एके काळचे कुलगुरू डॉ. शंकरराव खरात हे याच शाळेचे विद्यार्थी. ग. दि. मांचे बंधू व्यंकटेश हेही काही काळ या शाळेत शिकले.

हायस्कूलमध्येही शाळा भरताच प्रार्थना होत असे ती म्हणण्यासाठी सर्व विद्यार्थी व शिक्षक त्यातल्या त्यात मोठे क्षेत्रफळ असणाऱ्या आणि सरस्वतीचे मोठे तैलचित्र लावलेल्या सरस्वती हॉलमध्ये जमत. हायस्कूलमध्ये गेल्यावर जी प्रार्थना आम्ही सरस्वतीवंदना म्हणून म्हणत होतो ती म्हणजे अलिकडे "आलाप" या १९७७ मध्ये निघालेल्या अमिताभ बच्चन यांच्या हिंदी चित्रपटातील " माता सरस्वती शारदा " हे गीत! आश्चर्य म्हणजे शाळेच्या सुरवातीपासून हे गीत ज्या चालीवर गायले जात होते तीच चाल " आलाप" मध्येही वापरण्यात आली आहे. शाळेकडून विद्यार्थ्यांना द्यावयाच्या प्रगतिपुस्तकावर तसेच संस्थानात तयार होणाऱ्या वह्यांवर छापलेले असे " शील, शरीर, अध्ययन " आणि " योगः कर्मसु कौशलम " संस्थानचा छापखाना नगरातच होता. याच छापखान्यात पं. सातवळेकर यांचे " कल्याण " मासिक छापले जायचे.

शाळेत शिकणाऱ्या गरीब विद्यार्थ्यांना राहण्यासाठी वसतीगृहाची सोय होती. याच वसतीगृहात सानेगुरुजी व ग. दि. मा. यानी काही दिवस राहून अंबाबाईच्या परडीतला प्रसाद म्हणजे वसतीगृहातील भोजन घेतला होता. भोजनगृहात एक फळा ठेवलेला असे व त्यावर दररोज एक श्लोक लिहिलेला असे. स्वतः महाराज कधीतरी भोजनगृहात येत व एकाद्या विद्यार्थ्याला श्लोक म्हणायला सांगत.

अखिल भारतीय मराठी साहित्य सम्मेलनाचे अध्यक्षपद या एवढ्याश्या छोट्या गावाशी संबंधित सहा व्यक्तींनी भूषवले. त्या म्हणजे स्वतः महाराज बाळासाहेब ऊर्फ भवानराव पंतप्रतिनिधी, ग. दि. माडगूळकर, व्यंकटेश माडगूळकर. गो. नी. दांडेकर, शंकरराव खरात व ना. सं. इनामदारं!

वस्ती बरीचशी जातिनिहाय असली तरी मिश्र वस्ती बऱ्याच ठिकाणी असे. ब्राह्मण आळीतच अगदी दोन ब्राह्मणांच्या घराच्या मध्ये एक मशीद होती. आम्ही काही काळ राहत असलेला वाडा ब्राह्मणाचा असून गुरव गल्लीत होता, तर आमच्या शेजारी मोठा वाडा होता त्याचे मालक मुसलमान होते व दिवाळीचा सण ते आमच्यापेक्षा अधिक उत्साहाने साजरा करत आणि रमजानला शिरखुरमा खायला त्यांच्याकडे ज्या अगत्याने बोलावत तितक्याच उत्साहाने दिवाळीच्या फराळालाही. दिवाळीत त्यांचा किल्लाही प्रेक्षणीय असे. त्यांच्या शेजारील गृहस्थ गोंधळी होते शिवाय ते शिंपीकामही करीत आणि त्यावर ताण म्हणजे पं. अनंत बुवा जोशी यांच्या सेवानिवृत्तीनंतर दसऱ्याला

देवीपुढे शास्त्रीय गायनासाठी हजेरी लावण्याचा मानही त्याना मिळाला होता, तसेच महाराजांच्या कीर्तनास हार्मोनियमची साथही ते करत.

शतायुषी रामूअण्णा किर्लोस्कर, वेदमहर्षी पं. सातवळेकर, गोनीदा, ना. सं. इनामदार, यांच्या वास्तव्याने औंधनगरी पुनीत झाली होती. दुर्दैवाने महाराजांच्या नंतर औंधात रहाण्यात त्याना स्वारस्य उरले नाही. पं. सातवळेकरांनी पारडीस तर गोनीदांनी तळेगावला प्रस्थान केले. किर्लोस्करांना संस्थानातील कुंडल( आताचे किर्लोस्करवाडी) या गावातील जमीन कारखान्यासाठी महाराजांनी उपलब्ध करून दिल्यामुळे लक्ष्मणरावांचे मोठे बंधू रामूअण्णा मात्र औंधात राहिले आणि त्यांच्यामुळे अनेक प्रसिद्ध किर्लोस्करांचे पाय औंधाला लागले. पण त्यांच्यानंतर मात्र औन्धात महनीय व्यक्तींचे वास्तव्य अपवादानेच घडले. आता त्या व्यक्ती तर नाहीतच पण काही प्रथा आणि स्थळेही नष्ट झाली आहेत त्यामुळे म्हणावे लागते " असेही एक गाव होते"

# २. फर्ग्युसनचे दिवस

नुकताच दहावीचा निकाल लागला आहे आणि आता महाविद्यालयीन प्रवेशाचे वारे वाहू लागले आहेत. विद्यार्थ्यांची संख्या इतकी वाढली आहे की इतक्याजणांसाठी चांगली महाविद्यालये त्यामानाने कमीच उपलब्ध आहेत. या पार्श्वभूमीवर मला फर्ग्युसनला मिळालेला प्रवेश म्हणजे आगगाडीने सहज बोगद्यात शिरावे इतका सहज झाला, त्यात कुठल्याच प्रकारचा त्रास वा अडचण असते असे वाटले नाही.

अगोदर आमच्या खेड्यातून एकदम पुण्यासारख्या शहरात आणि एकदम फर्ग्युसनसारख्या नावाजलेल्या कॉलेजात प्रवेश घेणे ही एक स्वप्नवत् गोष्ट होती. कारण आपण कॉलेजची पायरी चढू की नाही याविषयी मी शेवटपर्यंत साशंक होतो. पण एकदम पहिल्या तीस क्रमांकातच आल्यामुळे मला महाविद्यालयात घालणे पालकांच्या दृष्टीने आवश्यक ठरले. आमच्या पुण्यातील एका नातेवाइकांची फर्ग्युसनमधील प्रा. माईणकर यांचा परिचय असल्यामुळे त्यांच्याच घरी अर्ज भरून (तो अर्जाचा नमुनाही त्यांनीच कार्यालयातून मागवून घेतला होता. ) पुरेसे पैसे नसूनही बाकीचे पैसे नंतर पाठवून देण्यास सांगून त्यांनी लगेच माझा प्रवेश निश्चितही केला. त्यावेळी चांगल्या विद्यार्थ्यांची कदर असावी.

महाविद्यालयाचा पहिला दिवस अविस्मरणीय होता. त्यादिवशी प्राचार्य डॉ. कोगेकर नवीन प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांसमोर स्वागतपर व उपदेशपर भाषण देणार होते व त्यासाठी स्थळ होते ऍम्फी थिएटर. सकाळी १०॥ वाजता ते होणार होते मी व माझे वडील आम्ही दोघे नियत वेळी महाविद्यालयाच्या प्रांगणात पोचलो. यापूर्वी एकदा महाविद्यालयाच्या आवारात आम्ही आलो असलो तरी त्यावेळी रिक्षाने तडक प्रा. माइणकरांच्या बंगल्यात गेल्यामुळे ते भव्य आवार तसे आम्ही प्रथमच पहात होतो त्यामुळे हे ऍम्फी थिएटर कोठे आहे याविषयी आम्हास कल्पना नव्हती पण आवारात शिरल्यावर एका विद्यार्थ्यास विचारल्यावर त्याने तिकडे बोट दाखवले. आवारात पामचे बरेच वृक्ष होते. प्रवेशद्वारातून आत शिरून थोडे अंतर चालून गेल्यावर प्रथम डावीकडे कार्यालय असणारी इमारत होती. व उजव्या बाजूस एक उंच इमारत होती त्यातच ऍम्फी थिएटर होते. आम्ही आत शिरलो तेव्हा नुकतेच प्राचार्य स. वा. कोगेकर यांचे भाषण चालू झाले होते.

ऍंफी थिऐटर बरीच मोठी इमारत होती व अजूनही आहेच. ऍम्फी थिएटरव्यतिरिक्त त्यामध्ये आणखी दोन वर्गाच्या खोल्याही होत्या. त्याना A1, A2 अशी नावे होती. A1 म्हणजे मुख्य थिएटर जेथे प्राचार्यांचे भाषण चालू होते. ही इमारत व आवारातील बऱ्याच इमारती दगडीच होत्या खेड्यातील मराठी माध्यमाच्या शाळेत शिकल्यामुळे व. प्राचार्यांचे भाषण फर्ड्या इंग्लिशमध्ये असल्याने बरेचसे मला कळत नव्हते पण सर्व नवागत विद्यार्थ्यांना उपदेशवजा भाषण होते एवढे समजत होते. ऍम्फी थिएटरच्या आतील बाजूने

गिलावा नसल्यामुळे भव्य असले तरी फार आनंददायक वाटले नाही. त्या इमारतीच्या डाव्या बाजूस वाचनालयाची मोठी इमारत होती. कार्यालयाची इमारत डाव्या बाजूस. अश्या या तीन इमारतींच्या मधील मोकळ्या जागेत छोटीशी बाग होती त्यात बरीच पामची झाडे होती. चौथ्या बाजूने जाणारा रस्ता वसतीगृहाकडे जात होता. वाचनालयाच्यामागे कॅन्टीन व एक छोटी इमारत होती. त्यापुढे गेल्यावर छोटीशी जिमखाना खोली होती.

एकूण आवार खूपच मोठे होते. आवारातच प्राध्यापकांचीही घरे होती. प्रा. माईणकर वसतीगृहप्रमुख होते. पुढे ते काही काळ प्राचार्यही झाले अर्थात त्यावेळी मी माझ्या उद्योगात मग्न होतो. बाकी आवारात रहाणारे प्राध्यापक डॉ. वाडेकर, वगैरे कधीकधी दिसत. त्यावेळी बरेच प्राध्यापक धोतर नेसून आवारात वावरत आणि काहीजण अगदी वर्गावरही धोतर नेसून येत त्यापैकी संस्कृतचे प्राध्यापक वाडेकर हे एक होते. प्राचार्य कोगेकरही आवारात धोतर नेसून फिरत.

त्यावेळी प्रथम वर्षाची परीक्षा विद्यापीठातर्फे घेण्याची पहिलीच वेळ होती. त्यापूर्वी ही परीक्षा महाविद्यालयातर्फेच घेतली जाई. त्या वर्षाला F. Y. (first year) म्हणत व ते Rest Year असेच मानले जाई. विद्यापीठातर्फे घेतल्या जाणाऱ्या या वर्षास पदवीपूर्व (Pre-Degree) असे नाव ठेवण्यात आले त्यामुळे आमची परीक्षा P. D. Sc. अशी ओळखण्यात येणार होती. काही ठिकाणी (मराठवाड्यात) तिला P. U. C. Sc. (Pre University course) अशी संज्ञा होती.

एस. एस. सीला मी संस्कृत हा विषय घेतला होता व त्यात बरेच चांगले गुण मिळवले होते त्यामुळे आताही परीक्षेत चांगले मार्क्स मिळावे म्हणून शिवाय प्रा. माईणकर संस्कृतचे प्राध्यापक असल्याने मी ऐच्छिक विषय म्हणून संस्कृत घेतले. त्याला पर्याय जर्मन किंवा फ्रेंच असा होता. शिवाय इंजिनियरिंगला जाणाऱ्या विद्यार्थ्यांना पुढे तो विषय असल्याने ऐच्छिक विषयात इकॉनॉमिक्सचाही समावेश होता. मी संस्कृत घेऊन सुरवातीच्या काही वर्गास हजरही राहिलो. त्या वर्गात सगळे आर्ट्सचेच विद्यार्थी असत माझ्यासारखा एकादा दुसराच.. प्रा. वाडेकर तो विषय शिकवीत. ते छानच शिकवीत, मला त्यात रसही होता. पण योग्य मार्गदर्शन नसले की काय होते, तेच माझ्या बाबतीत झाले.

वसतीगृहातील विद्यार्थ्यांमध्ये त्यावेळी चर्चा सुरू होती की जर्मन विषय प्रा. घारपुरे फार छान शिकवतात शिवाय ती एक वेगळी भाषा पुढे अभियांत्रिकी शाखेस जाणाऱ्या विद्यार्थ्यांना फायदेशीर आहे आणि सगळयात महत्वाची गोष्ट म्हणजे त्या विषयात मार्क अगदी ९०-९५ टक्केसुद्धा पडतात. मला त्यावेळी त्याच गोष्टीचे अधिक आकर्षण वाटले किंवा भूलच पडली म्हणायला हवे.

मेंढरांच्या कळपात असल्यागत मी त्या सगळयांच्याबरोबर जर्मन घ्यायचे ठरवले व संस्कृत ऐवजी जर्मन अश्या विषयातील बदलासाठी अर्ज देऊन टाकला. आणि लगेच तो बदल मिळणारच अश्या समजुतीने त्या विषयाच्या वर्गासही मी जाऊ लागलो. माझ्यासारखेच या लाटेत इतके विद्यार्थी सापडले होते की ऍंफी थिएटरचा हॉलदेखील आमच्या त्या वर्गास पुरेनासा झाला.

अर्थातच महाविद्यालयास असा असमतोल राखणे योग्य वाटले नाही कारण काही ऐच्छिक विषयाला विद्यार्थीच नाहीत अशी परिस्थिती झाली आणि शिवाय इतका मोठा वर्ग हाताळणे हेही प्रा. घारपुरे यांना अवघड होते. अगोदरच नेहमीच्या वर्गातच १४०-५० विद्यार्थी असत. माझ्या ई तुकडीत माझा क्रमांक १३९ होता असे वाटते. म्हणजे जर्मनच्या वर्गात २५० तरी विद्यार्थी झाले असावेत त्यामुळे महाविद्यालयाने ज्यानी प्रवेश घेतानाच जर्मनसाठी अग्रक्रम दिला होता त्यानाच तो विषय घेण्यात येईल असा निर्णय घेतला. त्यामुळे आता माझी परिस्थिती 'ना घरका न घाटका' अशी झाली.

आता तरी मी पुन्हा माझी पहिली निवड कायम ठेऊन संस्कृतला प्राधान्य दिले असते तर काही बिघडले नसते. खरे तर मी विषय बदलण्याचा अर्ज देण्यापूर्वीच माईणकरांना भेटलो असतो व त्यांचा सल्ला घेतला असता तर असे झालेच नसते. त्यांचा माझा परिचय प्रवेश घेताना झालाच होता व ते अतिशय प्रेमळ गृहस्थ होते. पण माझ्या अतिशय लाजाळू वृत्तीमुळे मी तसे केले नाही इतकेच काय पुन्हाही निर्णय घेण्यासाठी त्यांचा सल्ला घेण्याचे टाळले व पुढे अभियांत्रिकीला आपल्याला इकॉनॉमिक्स म्हणजे अर्थशास्त्र उपयोगी आहे म्हणून तेच घेऊया, असे ठरवून विषय बदलून मी अर्थशास्त्र मिळावे म्हणून अर्ज दिला व तो मंजूरही झाला. त्यासाठी मराठी माध्यम घेता होते तरी मी इंग्रजी माध्यमच निवडले. त्यामुळे मी अर्थशास्त्र हा विषय कॉमर्स शाखेस जाणारे विद्यार्थीही शिकत नसतील इतक्या वेळा म्हणजे चक्क तीन वेळा शिकलो. कारण दुसऱ्या वर्षास तो अभियांत्रिकीला जाणाऱ्यांसाठी आवश्यक म्हणून व

परत अभियांत्रिकीच्या शेवटच्या वर्षासही एक विषय म्हणून. आणि इतके ज्ञान प्राप्त करून प्रत्यक्ष अर्थप्राप्तीबाबतीत मात्र कोराच राहिलो.

प्राचार्य कोगेकरांच्या भाषणाव्यतिरिक्त पहिल्या दिवशी काहीच वर्ग झाले नाहीत. मी प्रा. माईणकरांच्या घरून प्रवेश अर्ज भरल्यामुळे नेहमीच्या पद्धतीने प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या यादीत माझे नाव नसल्याने वसतीगृहात रहाणाऱ्या विद्यार्थ्यांची जी वेगळी F तुकडी होती त्यात माझे नावच नव्हते. व शेवटी ते E तुकडीत आले.

२०जून या तारखेस नियमाप्रमाणे कॉलेज सुरू झाले तरी शनिवार होता त्यामुळे प्रत्यक्ष वर्ग सोमवारपासून २२ तारखेपासून सुरू होतील या कल्पनेने मी २१ तारखेस कॉलेजकडे फिरकलोच नाही. वडिलांच्या बरोबर कोठे कोठे फिरत राहिलो. २२ तारखेस कॉलेजमध्ये गेलो व पोर्चकडे नजर टाकली तर टाइमटेबल लावलेल्या नोटिसबोर्डसमोर मधमाश्याच्या पोळयात माश्यांनी गर्दी करावी तशी विद्यार्थ्यांची गर्दी दिसली. त्यामुळे’ 'आधीच उल्हास त्यात फाल्गुन मास''अशी परिस्थिती झाली. शेवटी जरा धाडस करून त्यात घुसलो तर टाइमटेबलचा गोंधळ काही समजेना कारण माझ्या ई तुकडीचे वर्ग सकाळी १०॥ ला सुरू होत होते तर एफ तुकडीचे म्हणजे हॉस्टेलमधील विद्यार्थ्यांचे मात्र १२ वा. सुरू होत होते. हॉस्टेलच्या विद्यार्थ्यांची प्रॅक्टिकल्स सकाळी असत. त्यामुळे त्यांचे थेअरी वर्ग बाराला सुरू होत होते. हे काही माझ्या प्रथम लक्षात आले नाही. हॉस्टेलची मुले सकाळी प्रॅक्टिकलला जाऊन आली व त्याना १२ वा.

लेक्चर असल्याने ती आरामात होती आणि त्यामुळे मीही तसाच आरामात राहिल्यामुळे २२ तारखेच्या पहिल्या तासाला मला उशीरच झाला.

दुसऱ्या तासासाठी आत शिरल्यावर वसतीगृहात रहाणाऱ्या आपल्या मित्रांना भेटायला येणारा एक विद्यार्थी माझ्या ओळखीचा झाला होता तो दिसला, त्याच्या बाकावर जाऊन बसलो आमच्या वर्गाची रचना एकाद्या रंगमंदिरासारखी होती. अगदी खालच्या पातळीवर प्राध्यापकांना उभे रहाण्यासाठी व्यासपीठ त्याला लागून भिंतीवर फळा. असा फळा आमच्या शालेय जीवनात मी कधी पाहिला नव्हता. तो काचेचा होता व त्याचा पार्श्वभाग हिरव्या रंगाचा असून त्यातील अर्ध्या भागावर आलेखाच्या कागदावर असाव्यात तश्या उभ्या आडव्या रेषा. आकृत्या काढण्यास त्या उपयोगी. फळयाच्या वर ट्यूब लाइट त्याचा प्रकाश बरोबर फळयावर पडायचा. प्राध्यापकांच्या समोर भले मोठे टेबल. या गोष्टींचे आता काही नवल वाटत नाही पण औंधासारख्या खेड्यातून या वातावरणात गेलेल्या माझ्यासारख्या मुलास हा सगळा प्रकार स्वप्नवत् वाटावा यात नवल नाही. रंगमंदिरात असाव्या तश्या अनेक पायऱ्या प्राध्यापकांच्या समोरील भागास असून प्रत्येक पायरीवर बाकांची एक ओळ. एका वर्गात १५० विद्यार्थी सहज बसू शकत. आणि खालच्या पायरीवर उभ्या असणाऱ्या प्राध्यापकाचा आवाज अगदी सहज शेवटच्या ओळीतील विद्यार्थ्यास ऐकू येई. त्याचे श्रेय वर्गाच्या रचनेस द्यावे की प्राध्यापकांच्या आवाजास समजत नाही. त्यावेळी शेवटच्या रांगेत प्रवेश करण्यासही एक दार असे व उशीरा येणारे विद्यार्थी त्यातून प्रवेश करत त्यामुळे

प्रा. खांडेकर हे इंग्रजीचे प्राध्यापक वर्गात आल्याबरोबर "last man please shut the door" असा हुकूम सोडत व तो त्याला बरोबर ऐकू येऊन तो ते दार बंद करी.

त्यादिवशी जूनचा महिना असल्यामुळे दुपारी ढग आले होते त्यामुळे अंधारच पडला होता. त्यामुळे फळ्यावरील व वर्गातील सगळे ट्यूबलाइट्स लावलेले होते. मी आत शिरून बसल्यावर एक खाकी वेषधारी युवक आत आला. त्याने आत येऊन फळा स्वच्छ केला व डस्टर टेबलावर ठेऊन तो बाहेर पडला व घंटा होताच प्राध्यापक प्रा. कोल्हटकर आत शिरले ते कसे शिकवतात याची व आपल्याला काही समजते का याचीही उत्सुकता होतीच. तास बॉयॉलॉजीचा होता. तो वर्ग P9 या वर्गखोलीत होता. फर्गसन महाविद्यालयात बऱ्याच वेगवेगळया इमारती होत्या. कार्यालयाच्या इमारतीस M (main Building) व त्यातील खोल्यांना M1, M2, फिजिक्स विभागातील खोल्यांना P1, P2 केमिस्ट्री विभागाच्या खोल्यांना C1, C2 अश्या संज्ञा होत्या आमचे बरेच वर्ग फिजिक्सच्या इमारतीत भरत. केमिस्ट्रीचे वर्ग त्याच विभागात, इंग्रजीचा एक वर्ग कार्यालयीन इमारतीत, तर एक P9 मध्ये, मराठी, इकॉनॉमिक्स व मॅथेमॅटिक्सचे वर्ग ॲम्फिथिऐटरमधील वर्गात भरत.

शाळेत असताना एकाच वर्गात बसण्याची संवय असल्यामुळे प्रत्येक तास वेगवेगळया खोलीत असण्याची कल्पना डोक्यात घुसायला थोडा वेळ लागलाच. म्हणजे A1 मधला पहिला मराठीचा तास संपला की P9 मधल्या दुसऱ्या तासासाठी तेथे जाऊन उभे रहायचे व तेथे क्लास चालू असेल तर

आरडाओरडा करून तेथील प्राध्यापकाला गोंधळात टाकायचे व घंटा वाजली की आत घुसायचे. या कसरतीसाठी दोन तासांच्या मध्ये पाच मिनिटांचा वेळ दिलेला असे. म्हणजे १०॥ चा तास ११-१५ ला संपला तर पुढचा तास ११-२० ला सुरू होणार. सुरवातीस वर्गात शिरून पुढचा बाक पकडण्याची धडपड असे पण मग पुढे शक्यतो मागचा बाकच बरा असे वाटू लागले.

. फिजिक्सला प्रथम वर्षास प्रा. ई. एस. जोग होते. त्यांची हेल काढून बोलण्याची पद्धत मजेशीर होती. त्याच विषयाच्या काही भागासाठी प्रा. डी. एस. जोग होते त्यानी फिजिक्सचे आमच्या दृष्टीने अतिशय प्रचंड आकाराचे पुस्तक लिहिलेले होते. ते वर्गात धोतर, कोट व टोपी अश्या वेषात येत. त्याच विषयासाठी आम्हाला अगदी तरुण प्राध्यापक जेव्हां आले त्यावेळी त्यानी आपल्या व्यक्तिमत्वाने व शिकवण्याच्या पद्धतीने सर्वांवर छाप टाकली ते म्हणजे प्रा. राम ताकवले ते पुढे पुणे विद्यापीठाचे कुलगुरू झाले.

केमिस्ट्रीचे प्राध्यापक प्रा. घाणेकर व प्रा डोळे होते. डोळे यांनीही त्या विषयाचे पुस्तक लिहिलेले होते. मॅथेमॅटिक्सला पहिल्या वर्षी प्रा कवलगीकर हे ऑलजिब्रा शिकवत. त्यांचे वैशिष्ट्य म्हणजे ते पांढरा शर्ट, पांढरी पॅंट व त्यावर पांढराच कोट घालत व नाकातल्या नाकात बोलत. कॅलक्युलस शिकवणारे प्रा. एन. आर. कुलकर्णी अतिशय सहजतेने विषय शिकवत व त्यांचे विषयातील प्रभुत्व सहज जाणवे. प्रा. महाजनी सॉलिड जॉमेट्री शिकवत. ते रॅंग्लर होते व त्यानीही त्या विषयावर पुस्तक लिहिले होते काही दिवस रॅंग्लर प्रा. चंद्रात्रेही आम्हाला शिकवत होते. खरे तर फर्गसन कॉलेज ज्या डेक्कन एज्युकेशन

सोसायटीचे होते त्याच संस्थेचे विलिंग्डन महाविद्यालय सांगलीस आहे त्याचे ते प्राचार्य होते पण संस्थेतील मतभेदामुळे त्याना आमच्या महाविद्यालयात प्राध्यापक म्हणून यावे लागले तेही अगदी वर्ष सरतेवेळी त्यामुळे त्यानी आमचे फार कमी वर्ग घेतले. प्रा. डी. एस. जोगही असेच विलिंग्डनवरूनच आलेले असल्यामुळे त्यांनीही आमचे फार कमी वर्ग घेतले. को ऑर्डिनेट जॉमेट्री प्रा. ए. बी. शहा शिकवत. (प्रा. अ. भि. शहा हेच होते का माहीत नाही)

मराठी हा विषय प्रा. पटवर्धन शिकवत. त्यावेळी मराठीची डॉ. रा. श्री. जोग, प्रा. पारसनीस अशी दादा मंडळी आमच्या कॉलेजला होती पण ती कदाचित आर्ट्सच्या वर्गांना शिकवत असतील. प्रा. पटवर्धनही शिकवीत चांगले, पण कधी कधी त्यांच्या बोलण्यास कुचेष्टेचा वास येई. मराठीसाठी एक वेच्यांचे पुस्तक होते व पुरवणीवाचन म्हणून व्यंकटेश माडगूळकरांचे माणदेशी माणसं होते ते मी दहा वेळा तरी वाचले असेल. इंग्रजीस प्रा. खांडेकर होते ते गद्य शिकवत तर प्रा, कामत पद्य म्हणजे Golden Treasury. प्रा. खांडेकरांचे शेवटच्या बाकावरील मुलास उद्देशून म्हटलेले Last man please shut the door. " हे वाक्य व पद्य वेच्यातील सरोजिनी नायडू यांच्या My father do not rest या धड्याची अजून आठवण होते. तर Golden Treasury मधील La Belle Dame Sans Merci ही कविता विचित्र नावामुळे लक्षात राहिली. इंग्लिशला प्रा. प्रधान सरांचा वर्ग आवडे शिवाय त्यांच्या राजकीय भूमिकेमुळे व आचरणातील साधेपणामुळे त्यांच्याविषयी आदरही होता. शिवाय ते

शिकवतही छान. ते नेहमी खादीचे कपडे घालत व शिकवतानाही त्यांच्या विचारप्रणालीचे दर्शन घडवीत.

इंग्रजीविषयी एक मजेशीर गोष्ट आठवते. मराठीला जसे "माणदेशी माणसं" होतं तसं इंग्रजीसाठी "Tono Bungay" हे H. G. Wells या लेखकाचे पुस्तक होते. तसे ते लेखक खूप प्रसिद्ध आणि ते पुस्तकही. पण मला ते काही केल्या वाचवेना. आणि आमच्या मित्रापैकी पण कोणी वाचले असेल असे वाटत नाही कारण कोणीच त्याविषयी काही बोलत नसे. विद्यापीठाची परीक्षा असल्याने विद्यापीठाच्या नियमानुसार या दोन्ही पुस्तकांवर परीक्षेत प्रश्न येणार होते. त्यामुळे कमीतकमी एकदा ती वाचणे आवश्यक होते. . माणदेशी माणसं मी दहा वेळा तरी वाचले असेल. पण टोनो बंगे दररोज इतर विषयांचा अभ्यास झाला की रात्री मी वाचायला घेत असे आणि एकादे दुसरे पान वाचून झाले की घोरायला लागत असे. ते पुस्तक न वाचायला आणखी एक कारण होते ते म्हणजे आधल्या वर्षी इंग्रजीच्या पुरवणी वाचनासाठी Silas Marner ही जॉर्ज एलियट ची कादंबरी होती व अशी वदंता होती की या एका वर्षासाठी तीच पुरवणी वाचन म्हणून ठेवणार. त्या कादंबरीचे साने गुरुजींनी केलेले गोड गोष्टीच्या भागात "मनूबाबा" हे रूपांतर मी पूर्वीच वाचले होते त्यामुळे त्यावर प्रश्न आले तर आपण सहक उत्तरे देऊ असा आत्मविश्वास मला होता. पण तसे विद्यापीठाकडून जाहीर होत नव्हते त्यामुळे टोनो बंगे हे माझे रात्रीच्या झोपेचे औषध आवश्यकता नसून चालू होते.

शेवटी या प्रश्नाचा निकाल लागायला मागील वर्षाच्या नापास झालेल्या विद्यार्थ्यांच्या आंदोलनात्मक पवित्र्याने लागला. खरे म्हणजे मी प्रवेश घेतला त्याच्या आधल्या वर्षी पहिले वर्ष म्हणजे Rest year असे समजले जाई व परीक्षा महाविद्यालयाकडून घेतली जाई तरी विद्यार्थी नापास कसे झाले होते हे आजच्या काळात आश्चर्यच वाटेल कारण आता विद्यापीठाच्या परीक्षेतही विद्यार्थी चुकूनच नापास होतात आणि झालेच तरी त्याना A. T. K. T. मिळतेच. काही का असेना त्यांचा प्रश्न सोडवण्यासाठी विद्यापीठास Silas Marner ला एक वर्षाची वाढ द्यावी लागली. आमच्या वेळपासून पहिल्या वर्षाचीही परीक्षा विद्यापीठाकडून घेतली जाऊ लागली व त्याला पी. डी. म्हणजे प्रीडिग्री म्हटले जाऊ लागले आणि हा बदलही त्यावेळचे पालक व विद्यार्थी यानी मुकाट्याने मान्य केला. त्यामुळे पहिल्या वर्षाची परीक्षा महाविद्यालयाकडून घेऊनही नापास होणाऱ्या विद्यार्त्यांसाठी पुढील वर्षाच्या प्रवेशासाठी विद्यापीठाची म्हणजे आम्हाला आवश्यक असणारी पी. डी. ची परीक्षा देणे आवश्यक होते आणि त्यानी Silas Marner चा अभ्यास केला होता म्हणजे असे त्यांचे म्हणणे होते व ते विद्यापीठास मान्य होते त्यामुळे पुन्हा त्याना वेगळ्या पुस्तकाचा अभ्यास करावा लागणे हा त्यांच्यावर अनावश्यक बोजा होणार होता. त्यामुळे त्या वर्षापुरते इंग्रजीच्या प्रश्नपत्रिकेत या दोन्ही पुस्तकांचा समावेश होता. त्यामुळे मी “Silas Marner” वरील प्रश्न सोडवले व "Tono Bungay वाचण्याचे माझ्यावरील संकट टळले. ते नंतरही वाचण्याचे माझे प्रयत्न अयशस्वी ठरले.

इकॉनॉमिक्स या दोनदा विषय बदलण्याची कसरत करून घेतलेल्या विषयाला. प्रा. श्रीमती नाडकर्णी व प्रा. बाळ गाडगीळ हे दोन प्राध्यापक होते. पण दोघेही विषय तितकाच कंटाळवाणा करून शिकवत. खरे तर त्यात प्रा. गाडगीळ तर विनोदी लेखक होते पण आपल्या विनोदाचा वारा चुकूनही आपल्या विषयाच्या शिकवण्यास ते लागू देत नसत कदाचित आपले विनोद असे वाया घालवण्याचे त्याना मान्य नसावे. त्यांचे तासही ऍम्फी थिएटरमधील वर्गात होत. त्याच वर्गात गणिताचेही वर्ग होत.

वसतीगृहातील विद्यार्थ्यांच्या जेवणासाठी तीन चार मेसेस होते. मी महाराष्ट्र मध्ये जेवत होतो. ते कॉन्ट्रॅक्टरकडून चालवले जात होते व त्याचा दर महिना ३५ रु. होता. इतर मेसेस क्लब टाइप व विद्यार्थ्यांनी चालवलेले होते. तेथे महिन्याचे बिल ठराविक नसे.

रविवारी फीस्ट व बुधवारी चेंज म्हणजे एकादा वेगळा पदार्थ उदा. बटाटेवडा, दहिवडा, शिरा. फीस्टला पक्वन्न अमर्याद खाता येत असे. ज्या मेसमध्ये विद्यार्थी जेवत असे तेथीलच एक कर्मचारी खोल्या झाडायला येत असे.

बुधवार हा अतिशय आनंदाचा वार असे कारण त्यादिवशी संध्याकाळी चेंज असे व त्यानंतर बिनाका गीतमाला असे. त्यामुळे आठच्या आत जेवण आटोपून मनोरंजन कक्ष म्हणून जी एक खोली असे तेथे विद्यार्थ्यांची गर्दी होत असे, त्या कक्षात बुद्धिबळ व कॅरम खेळण्याचीही सोय होती. टेनिसचे कोर्ट पण कॉलेजच्या आवारात होते आणि टेबलटेनिसची एक खोली कॅन्टीनच्या जवळ

होती तेथे चार आणे तास असे टेबल राखून ठेवावे लागे अर्थात आम्ही त्या फंदात पडत नव्हतो कारण त्यासाठी लागणारी रॅकेट व पुन्हा पुन्हा घ्यावे लागणारे चेंडू यांचा खर्च आपल्याला परवडणार नाही ही कल्पना. टेनिसच्या बाबतीत तर ती रॅकेट विकत घेणे तर राहिलेच पण हातात पकडणे तरी जमेल की नाही अशी देहयष्टी त्यावेळी माझी असल्याने तोही प्रश्न मिटला.

. फिजिक्स प्रॅक्टिकलची पद्धत म्हणजे प्रयोगशाळेत गेल्यावर एक महाविद्यालयाचे नाव वगैरे लिहिलेला कोरा ताव मिळे त्यावर आपले नाव व रोल नंबर लिहायचे. प्रयोगाची माहिती डेमॉन्स्ट्रेटरकडून मिळे व त्यानंतर त्यानी सांगितलेल्या पद्धतीने प्रयोग करून निरीक्षणे व प्रयोगाचे वर्णन त्या कागदावर लिहून दाखववावयाची व ते बरोबर असल्यास त्यांची सही घेतल्यावर प्रयोग पूर्ण होई व एका फाइलला तो कागद लावावयाचा. ग्राफ काढावयाचे असल्यास ग्राफ पेपर पण मिळे व तो त्या कागदाबरोबरच फाइलला लावावा लागे. असे जर्नल तेथल्या तेथेच पूर्ण होई. केमिस्ट्रीला मात्र जर्नल म्हणजे एक लठ्ठ नोटबुक दिलेले होते. प्रथम वजनकाटा (केमिकल बॅलन्स)वापरणे, नंतर रसायनांचे काही प्रकार वापरून त्यांच्यावर काही प्रक्रिया करायच्या अश्या स्वरुपाचे प्रयोग असत.

बॉयॉलॉजी मध्ये जीवशास्त्र व वनस्पतीशास्त्र असे दोन विभाग त्यात काही प्राण्यांचे व काही वनस्पतींचे निरीक्षण करून त्यांची माहिती लिहिणे अश्या स्वरुपाचे प्रयोग असत. जीवशास्त्राच्या प्रयोगशाळेतील एक डेमॉन्स्ट्रेटर जरा खवटच होते. उंदराची किंवा सश्याची मृत शरीरे आमच्या समोर ठेऊन

त्यांची माहिती ते देत होते. त्यांच्या माहितीतील anus हा शब्द मला समजला नाही म्हणून मी विचारल्यावर मजेदार दृष्टिक्षेप माझ्याकडे टाकत अगदी सगळ्या क्लासला ऐकू येईल अश्या खणखणीत आवाजात "एनस म्हणजे ढुंगण " तेसुद्धा ढु वर अगदी रेटून जोर देत म्हणाले त्याबरोबर सगळ्या वर्गात हशा पिकला आणि मला लाजल्यासारखे झाले. .

आता बिनाकामुळे चित्रपटसंगीतात फारच रस निर्माण झाल्यामुळे व जोडीस तितकाच उत्साही जोडीदारही मिळाल्यामुळे रेडिओ ऐकणे हा एक महत्वाचा कार्यक्रम झाला. बऱ्याच वेळा सकाळी हॉटेलमध्ये रेडिओ सिलोनवरील फरमाइश ऐकायला मिळे. पण दुपारची विविध भारतीवरील फरमाईश आमची अधिक आवडीची होती त्यावेळी केमिस्ट्रीचा तास बुडवणे काही अवघड वाटत नसे कारण तो विषय वाचून समजत असे. प्रा. घाणेकर यांचा परिचय एकदा डॉ. माईणकरांच्याकडे झाला होता पण एवढ्या मोठ्या १५० मुलांच्या वर्गात मी न आल्याचे त्याना कळणे शक्य नव्हते. आणखी बुडवण्यालायक तास इकॉनॉमिक्स चा त्याच वेळेस असे त्यामुळे आमची संगीतसाधना निर्विघ्नपणे चालू राहिती. त्याशिवाय स्वरविहारसारखी म्युझिक हाउसेस आमच्या सेवेस तयारच होती.

होस्टेलमध्ये असताना चहा पिणे हा एक महत्त्वाचा कार्यक्रम असे. मला सोडायला दादा आले त्यावेळी त्यानी कँटीनमध्ये येऊन मालक शेट्टीची गाठ घेऊन 'या मुलाला कधी कधी पैसे नसले तर उधार देत जा' असे सांगून ठेवले होते. अर्थात त्यालाही आमचे किती लाड पुरवायचे यावर मर्यादा होती.

कॅंटीनचा मालक मोठा स्मार्ट गृहस्थ होता तो क्वचितच असे पण दुसरा एक शेट्टी व जुगल असे दोघे गल्ल्यावर असत. चहा प्यायला दिवसातून अनेक वेळ गेल्याने मी, दाढे यांची त्याना चांगलीच ओळख झाली होती. कॅंटिनमध्ये फक्त सकाळी वडा सांभार अगदी गरम गरम मिळे व त्यावेळी सिंगल घेतले तर दोन व डबल घेतले तर तीन आणे पडत त्यामुळे आम्ही शक्यतो डबलच घेत असू. संध्याकाळचा विशेष पदार्थ म्हणजे सुकी भेळ. हे दोन पदार्थ पुन्हा त्या चवीचे कोठे खायला मिळाले नाहीत. दुपारी बटाटेवडा असे. कॉलेजच्या मधल्या सुट्टीत तो खायला मिळे. पण त्यावेळी पैश्याची फारच तंगी असल्याने खाण्याची इच्छा दाबूनच ठेवावी लागे.

आमच्या वसतीगृहाच्या खोलीतून मेस दिसे आणि त्याचजवळ स्नानगृह व शौंचालये होती. आमच्या ब्लॉकमध्ये स्वच्छतागृह होतेच पण तेथे अंघोळीची सोय नव्हती. या स्नानगृहात सकाळी मोठा बॉयलर पेटवलेला असे व त्यातून बादली, बादली गरम पाणी काढून तेथील कर्मचारी देत असे. अंघोळीसाठी पत्र्याच्या भिंती उभ्या करून दहा बारा छॉटी बंद स्नानगृहे केलेली असत. त्यात बादली नेऊन त्या गरम पाण्याने अंघोळ करता येत असे

फर्ग्युसनच्या वसतीगृहात असताना डॉ. माइणकरांकडे कधी कधी जात असे. त्यांचा बंगला आमच्या होस्टेल ब्लॉकच्या मागेच होता त्यामुळे मागील फाटकातून त्यांच्याकडे जाता येत असे. त्यावेळी त्यांच्याकडे जाऊन काय बोलावे मला कळत नसे त्यामुळे त्यांना तोंड दाखवून येणे हा एक उपचारच

असे. त्यानी त्यांच्याकडे आलेल्या प्रा. घाणेकरांची ओळख करून दिली. त्याचाही मी फारसा उपयोग करून घेतला नाही.

मी पहिल्यांदा पुण्याच्या थिएटरमध्ये पिक्चर पाहिला तो मित्रांबरोबरच. त्यावेळी हिंदविजय व डेक्कन ही सिनेमागृहे डेक्कन जिमखान्यावर होती तेथपर्यंत चालतच जावे लागे. हिंदविजयला त्यादिवशी "परवरिश" हा राजकपूर, माला सिन्हा व महमूदचा पिक्चर लागला होता. त्यावेळी प्रथमच मी इतके चांगले सिनेमागृह पहात होतो. नंतर त्याचे नटराज झाले व आता तर ते नाहीच. त्यावेळपर्यंत चार किंवा पाच आणे दराने पिक्चर मी पाहिले होते आणि तसे हिंदविजयमध्येही प्रथम दर्जाचे तिकीट दहा बारा आणेच असेल पण ते उपलब्ध नव्हते आणि एकदम बाल्कनीचे सव्वा रु. चेच तिकीट काढताना माझा जीव बराच वरखाली झाला पण तसाच धीर करून तिकीट काढून बसलो. पिक्चर चांगला असला तरी सहाचा सिनेमा नऊ वाजता सुटल्यावर जेवायला मिळेल की नाही या भीतीने त्याची जेवढी घ्यायला हवी हप्ती तितकी मजा घेता आली नाही शेवटी सव्वानऊला मेसमध्ये आमची ताटे झाकून ठेवलेली पाहिली तेव्हां कोठे जीव भांड्यात पडला.

त्यानंतर मग बरेच सिनेमे पाहिले त्यातल्यात्यात पॅरेमाउंट ला मॅटिनीला देव आनंदचे जुने पिक्चर लागत ते आम्ही हमखास बघत असू. "बारीश", "टॅक्सी ड्रायव्हर""आरपार" "जागते रहो"इ. जुने पिक्चर त्यात पाहिले. दादा पुण्याला आले असताना त्यांच्याबरोबर कधी नवे मराठी पिक्चरही पाहिले. "झनक झनक पायल बाजे"हा असाच त्या काळात बघितलेला व त्यानंतरही

बरेच वेळ पाहिलेला चित्रपट. नाटके मात्र त्या कालात पाहिली नाहीत कारण त्यांचे तिकिटदर त्यामानाने जास्त असत.

त्याच काळात बी. जे. मेडिकल कॉलेजच्या आर्ट सर्कलतर्फे जवळजवळ प्रत्येक वर्षी पंडित रविशंकर यांच्या सतारवादनाचा कार्यक्रम होत असे पण त्याला हजेरी लावण्याची इच्छा कधी झाली नाही हे म्हणजे अगदी "अभाग्याचे घरी बाबा कामधेनु आली नाठाळ म्हणून त्याने हाकलुनिया दिधली " असा प्रकार झाला.

नव्या विद्यार्थ्यांना अपरिचित वातावरणात रहाणे सुसह्य व्हावे म्हणून आमच्या महाविद्यालयाने "ट्युटोरियल क्लासेस"हा प्रकार प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्यांसाठी सुरू केला. त्यात वीस वीस विद्यार्थ्यांच्या तुकडीस एक एक प्राध्यापकानी मार्गदर्शन करावे असा विचार होता. आठवड्यातून ते दोनदाएकत्र येत व त्यात आपल्या अडचणी विद्यार्थ्यांनी सांगून प्राध्यापकांनी त्याचे निवारण करावे किंवा सोडवण्यासाठी मार्गदर्शन करावे अशी कल्पना होती. पण आम्हाला अडचणी मांडण्याचे धैर्य नव्हते व प्राध्यापकांना त्या सोडवण्यात रस नव्हता असे म्हटले तरी चालेल. आणि तसेही आम्ही अडचणी सांगितल्याच नाहीत तर ते काय सोडवणार?आमच्या तुकडीस प्रा. वि. मा. बाचल मार्गदर्शक होते व त्यांचा वेळ त्यानी जेन ऑस्टिनची"प्राइड अंड प्रेज्युडाइस" कादंबरी वाचण्यासाठी (म्हणजे आमच्याकडून वाचून घेण्यासाठी)वापरला. आणि इतक्या थोड्या वेळात ती कादंबरी पूर्ण करणे शक्य नसल्याने तो प्रकल्पही अपुराच राहिला ती कादंबरी मी नंतर सेवानिवृत्त झाल्यावर वाचली.

सुरवातीस महाविद्यालयाच्या "वाडिया"लायब्ररीत जाऊन पुस्तके घेण्याची बरीच चढाओढ असायची कारण त्यावेळी कोणाकडेच पुस्तके नसायची वाचनालय रात्री १० -११ वा. पर्यंत उघडे असे. रात्रीचे जेवण करून वाचनालयात जाण्यास सुरवात केली. सुरवातीस सर्वांनाच उत्साह असल्यामुळे वाचनालयात बरीच गर्दी व्हायची. वाचनालयात छान शिसवी खुर्च्या व टेबले होती. अर्थात टेबले स्वतंत्र नसून लाकडी लांब टेबलांना मध्ये पार्टिशन घालून स्वतंत्रपणे प्रत्येकास वाचन लेखन करता येईल अशी व्यवस्था होती आणि ती खरेच आदर्श होती. प्रत्येक विद्यार्थ्यास स्वतंत्र दिवाही असे. सुरवातीस गर्दी करून डी. एस. जोगांच्या फिजिक्सचा मोठा ठोकळा घेण्याची स्पर्धा असे आणि तो ठोकळा घेऊन वाचायला लागल्यावर थोड्याच वेळात झोप यायला लागे. मी इकॉनॉमिक्स घेतले असल्याने कधी कधी ऍडम्सचे पुस्तकही घेऊन बसत असे.

नंतर काही विषयांची पुस्तके विकत घेतल्यावर वाचनालयात जाण्याचा कंटाळा येऊ लागला व इतक्या चांगल्या वाचनालयाचा फारसा फायदा घेऊ शकलो नाही असे आता वाटते. वाचनालयाचा उपयोग करून घेणे हेही एक शास्त्रच आहे व त्यासंबंधी योग्य मार्गदर्शनाची आवश्यकताच आहे असे आता वाटते. माझ्या बाबतीत स्वतंत्र अभ्यास करण्याच्या संवयीमुळे अश्या समूहात अभ्यास करण्याचा सरावच मला झाला नाही. शाळेतही मी स्वतंत्रच अभ्यास करत असे. माझ्या मित्राना मी शिकवत असे किंवा त्यांच्या अडचणी सोडवतही असे, पण मला माझ्या अभ्यासाला स्वतंत्र अवकाश लागत असे त्याचाही

परिणाम असेल. पहिले काही दिवस शिष्यवृत्ती मिळायला लागली नसल्याने घरून येणाऱ्या मनिऑर्डरीचीच वाट पहावी लागे. सर्वांचीच तशी परिस्थिती होती त्यामुळे वसती गृहाच्या व्हरांड्यात जमून प्रत्येकजणच आपली म. ऑ. केव्हां येणार याचा विचार करत असे. .

दाढेसारखाच सातारच्या न्यू इंग्लिश स्कूलचा विद्यार्थी झंवर परिचित तर झालाच पण एका वेगळ्या बाबतीत त्याने आमचे पुढारीपण केले. त्यावेळी महाविद्यालयात सकाळी पी. टी. असे. आता याचे आश्चर्यच वाटते कारण शाळेतसुद्धा जरी पी. टी. चा तास असला तरी पण दररोज सकाळी कवायत क्वचितच असे.. त्यात कवायतीसाठी महाविद्यालयाचा पोषाक म्हणजे निळी अर्धी चड्डी व बनियन तो सुद्धा सॅंडो. असा ड्रेस निवडणाऱ्या महाविद्यालयीन प्रशासनाचे कौतुक करावे तेवढे थोडेच. कारण थंडीच्या दिवसात त्याचा अधिक त्रास वाटे अगदी हुडहुडी भरे. त्या ड्रेससाठी महाविद्यालयाने जी किंमत ठेवली होती त्यातील सॅंडो बनियनची किंमत बाहेर दुकानात मिळणाऱ्या तसल्या बनियनपेक्षा आठ बारा आणे अधिक होती असा झंवर या मारवाडी डोक्यातून निघालेला शोध. त्यामुळे आम्हाला तसे बनियन बाहेरून घ्यायची परवानगी द्यावी असा आग्रह त्याने धरला व त्याच्या पुढारीपणाखाली आम्ही काही जणांनी महाविद्यालयाचे बनियन घेण्याचे नाकारले व शेवटी महाविद्यालयाने आम्हास ते बाहेरून घेण्याची परवानगी दिली. काटकसरीचा महान विजय!

त्यावेळी अगदी विद्यार्थी बी ग्रूप घेत बाकी आम्ही सारे ए ग्रूप. त्यांना गणित जमत नाही म्हणूनच ते बी ग्रूपला गेले असे आम्ही त्याना चिडवत असू. आता परिस्थिती उलट झाली आहे.



# ३. घिसाडकामाचे दिवस

पुणे आणि अमेरिका या दोन्ही स्थानात एक मोठे साम्य आहे. ते म्हणजे तेथे जाण्यापूर्वी जाणारे लोक या स्थानांना शिव्या देत असतात पण तिकडे जाण्यासाठी मात्र त्यांचा जीव कासावीस झालेला असतो. त्यामुळे अमेरिकेत जसे मूळ अमेरिकनांचाच पत्ता नाही तसाच पुण्यातही. अस्सल पुणेकर आता एकमेव पुण्यभूषण सुधीर गाडगीळ यांच्याव्यतिरिक्त कोणी राहिले असेल असे वाटत नाही. तरीही पुणेरी संस्थांचा अभिमान अस्सल पुणेकरांइतकाच आता बाहेरून येऊन स्थायिक झालेल्या या पुणेकरांनाही तितकाच असतो. काही पुणेरी संस्थाच आता नामशेष होत आहेत त्यात पुणेरी टांगेवाला, पुणेरी भामटा(सुद्धा), पुणेरी जोडा, पुणेरी पगडी यांचा समावेश होतो. पुणेरी पगडी अजूनही सत्कारप्रसंगी वापरण्यात येते, त्यावरही ब्राह्मणी शिक्का बसून त्याजागी “फुले पागोटे” वापरावे असा फतवा मध्ये निघाला होता. तरी अजून पुणेरी पाट्या विशेषत: "आमची कोठेही शाखा नाही "अभिमानाने मिरवतच असतात.

पण पुणेरी काहीही म्हटले की पुणेकराची छाती जी अभिमानाने भरून येते त्यात सी. ओ. ई. पी. चा म्हणजे कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग पुणे याचा समावेश व्हायलाच हवा. उगीच नाही त्याचं नाव P. I. E. T. असं बदलायला

निघाल्यावर सगळ्या पुणेकरांनी विशेषत: त्या कॉलेजच्या आजी व विशेषत: माजी विद्यार्थ्यांनी काव काव करून ते नाव कायम ठेवायला लावलं. सी. ओ. ई. पी. चा विद्यार्थी असल्याचा अभिमान प्रत्येक विद्यार्थ्याला असतोच. अर्थात तो मलाही आहे अगदी मी अमेरिकेत भाच्याच्या मुलीच्या बारश्याला गेलो तेव्हां भेटलेले गोखले हे गृहस्थ आपल्या घरात तीन पिढ्या म्हणजे ते स्वत:, त्यांचे वडील व आता माझ्या भाच्याबरोबरचा त्यांचा मुलगा हे सर्व सी. ओ. ई. पी. चे विद्यार्थी आहेत हे अभिमानाने सांगत होते. त्याना मी भेटल्यावर तर त्यांचा आनंद इतका उचंबळून आला की काही विचारायलाच नको

खरं तर हे मूळ कॉलेज म्हणून स्थापन झालेच नव्हते. इमारती, धरणे, कालवे रेल्वेज अशी सार्वजनिक बांधकामे करणाऱ्या दुय्यम अधिकाऱ्यांना शिक्षण देण्यासाठी जुलै १८५७ मध्ये पूना इन्जिनिअरिंग क्लास अंड मेकॅनिकल स्कूल या नावाची एक संस्था इंग्रज अमदानीत सुरू करण्यात आली व हेन्री कोकवर त्या संस्थेची धुरा सोपवण्यात आली. इंग्रजीवर प्रभुत्व व गणिताचे जुजबी ज्ञान एवढीच काय ती प्रवेश पात्रता लागत होती. ज्या उमेदवारांना प्रवेश हवा असे, त्यानी जवळच्या शासकीय इंग्लिश शाळेच्या मुख्याध्यापकाकडे अर्ज देणे आवश्यक असे. त्याला सोयिस्कर असे अश्या दिवशी तो मुख्याध्यापक त्यांची प्रवेशपरीक्षा घेई व उत्तरपत्रिका हेन्री कोककडे जात. त्यांची तपासणी करून उत्तीर्ण विद्यार्थ्यांची यादी त्या मुख्याध्यापकांना कोक देई सहा महिन्यानंतर. त्यातील योग्य वाटणाऱ्या पंधरा विद्यार्थ्यांना दरमहा ६ रु. ची शिष्यवृत्तीही देण्यात येई. शिक्षणक्रमात गणित, ड्रॉइंग (अभियांत्रिकी), सर्व्हेइंग,

लेव्हलिंग, बिल्डिंग अँन्ड कन्स्ट्रक्शन या विषयांचा समावेश होता व अभ्यासक्रम दोन वर्षांचा होता. १८६४ मध्ये त्या स्कूलचे पूना सिव्हिल इंजिनिअरिंग कॉलेजमध्ये रूपांतर झाले आणि वनसंरक्षण (फॉरेस्ट्री) व शेतकी (ऍग्रिकल्चर) या विषयांची जोड देण्यात आल्याने त्याला पूना कॉलेज ऑफ सायन्स म्हणू लागले. १८८६ मध्ये अभ्यासक्रम अधिक सुसंबद्ध करण्यात येऊन प्रवेशपात्रता जी मॅट्रिक्युलेशनची होती ती एका वर्षाने वाढवून त्यावेळीच्या प्रीव्हियस परीक्षेत उत्तीर्ण होण्यापर्यंत वाढवण्यात आली. १९११ मध्ये त्या कॉलेजमधील अभियांत्रिकीशी संबंध नसलेले सर्व विषय सायन्स इन्स्टिट्यूट ऑफ बॉम्बे मध्ये शिकवण्याची सोय करून त्याना बॅचलर ऑफ सायन्स ही पदवी देण्यात येऊ लागली. व या कॉलेजचे नाव बदलून ते कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग करण्यात आले.

ही संस्था प्रथम मुंबई विश्वविद्यालयास संलग्न होती आणि मिळणारी पदवी लायसेन्शिएट ऑफ सिविल इन्जिनिअरिंग किंवा L. C. E. या नावाने ओळखली जाई. १८५८ पर्यंत हा सर्टिफिकेट कोर्स होता त्याचे पदवी अभ्यासक्रमात रूपांतर १९१२ मध्ये झाले म्हणजे पदवी अभ्यासक्रमाची पहिली तुकडी १९१२ मध्ये बाहेर पडली.

मी फर्ग्युसन कॉलेजात असताना माझ्या ससून मधील बहिणीकडे जाताना वाटेत कोर्टाच्या समोर रेल्वेचे रूळ पसरलेले व त्यांच्या मागे एक कळाखाऊ इमारत दिसे ती म्हणजे आपली भावी शिक्षणसंस्था असा विचार येऊन ती आतून कशी असेल याचा विचार मनात यायचा. त्यावेळी आजच्यासारख्या

प्रवेशपरीक्षा घेणे, पुन्हा त्या रद्द होणे मग (कोर्टाची इमारत सहजच समोर उपलब्ध असल्यामुळे) कोर्टबाजी होणे वगैरे प्रकार न घडता संस्थेत सहज प्रवेश मिळायचा. मी जेव्हां या संस्थेत प्रवेश केला म्हणजे जून १९६० या वर्षी ती पुणे विद्यापीठास संलग्न होती व अभ्यासक्रम तीन वर्षांचा असून मेटॅलर्जी, सिविल, मेकॅनिकल, इलेक्ट्रिकल व टेलिकम्युनिकेशन्स या पाच शाखांचे शिक्षण तेथे देण्यात येत होते. प्रवेशासाठी इंटर सायन्स किंवा प्रीप्रोफेशनल (म्हणजे सध्याची बारावी) परीक्षा कमीतकमी ५०% गुणांसह उत्तीर्ण असणे आवश्यक होते. प्रवेश देताना गुणवत्ता यादीनुसार उपलब्ध जागांवर प्रवेश मिळत असे.

उंट आणि अरब या गोष्टीप्रमाणे पॉलिटेक्निकच्या इमारतीत इंजिनिअरिंग कॉलेज सुरू झाले व नंतर मात्र पॉलिटेक्निकला गणेशखिंड रस्त्यावर दुसरी इमारत बांधून देण्यात आली. सर्वत्र म्हणजे जेथे जेथे इंजिनिअरिंग कॉलेजेस सुरू झाली तेथे तेथे असाच प्रकार झाला होता. म्हणजे पॉलिटेक्निकच्या इमारतीत कॉलेज सुरू व्हायचे आणि मग पॉलिटेक्निकची हकालपट्टी व्हायची. सोलापूरचे तर पूर्ण कॉलेजच हलवून कराडला नेण्यात आले. (म्हणजे सोलापूरला पॉलिटेक्निक असल्यामुळे तेथेच अभियांत्रिकि महाविद्यालय काढावे असे ठरले पण त्यावेळी मा. यशवंतराव चव्हाण महाराष्ट्राचे मुख्यमंत्री असल्यामुळे ते कराड येथे व्हावे असे ठरले, त्यामुळे सोलापूरचे लोक अजून तो आपला घोर अपमान विसरले नाहीत. ) आम्ही विद्यार्थी असताना मात्र पुण्याचे कॉलेज आणि पॉलिटेक्निक एकाच इमारतीत भरत असे. त्यामुळे कॉलेजची वेळ सकाळी ७ ते दु. १-३० तर पॉलिटेक्निकची दुपारी १-३० ते रात्री ८ अशी विचित्र

होती. त्यामुळे लवकर उठावे लागत असल्याने कॉलेजचे तर रात्री उशीरापर्यंत क्लासेस असल्याने पॉलिटेक्निकचे असे दोन्ही संस्थांचे विद्यार्थी नाराजच असत.

इंजिनिअरिंग कॉलेजचे वसतीगृह शिवाजीनगरलाच पण कॉलेजपासून बऱ्याच अंतरावर आहे. म्हणजे वेधशाळेच्या अगदी समोर आहे. त्यावेळी वेधशाळेचे घड्याळ चालू असे आणि काही वसतीगृहाच्या खोलीतून ते घड्याळ दिसत असे आणि त्याच्या ठोक्यावरच ती मुले कॉलेजात जात असत. वसतीगृहात प्रवेश मिळाल्यावर मी तेथे गेलो तेव्हां खोल्यांचे वाटप झाले होते. प्रथम वर्षाच्या मुलांसाठी हॉस्टेलच्या प्रवेशद्वारातून आत शिरल्यावर अगदी समोर असणारा C ब्लॉक मुक्रर करण्यात आला होता व प्रत्येक खोलीत तीन विद्यार्थी होते. ती व्यवस्था नेहमीचीच होती हे मला नंतर कळले. अगदी आमचे टाइमटेबलसुद्धा अनेक वर्षापूर्वी केलेले तेही बदलत नसे. खोल्या चांगल्याच मोठ्या होत्या व माझ्या खोलीत आणखी दोघेजण होते. पण मला माझ्या एका दुसऱ्या मित्राबरोबर माझ्या पूर्वपरिचयाचा म्हणून रहायचे होते. तसेच त्याने पुस्तकांचा सेट मिळवलेला असल्याने लगेच पुस्तकांचा वापर करणे सोपे जाणार होते. शिवाय तो ज्या ऍनेक्स(annex) ब्लॉकला रहात होता त्यातील खोल्या छोट्या असल्याने एका खोलीत दोनच विद्यार्थी रहात होते. त्यामुळे आम्हाला आणखी कोणाबरोबर जमवून घेण्याचा प्रश्न उद्भवणार नव्हता.

प्रवेश मिळाल्यावर तडक त्याच्याच खोलीत गेलो व तो म्हणाला "तू इथेच रहा, आता जरी तुला सी ब्लॉकमधील खोली वाटप झाले असले तरी

आपण बदलून घेऊ" त्यामुळे व माझ्याही मनात तसेच असल्याने मी माझा बिछाना अनेक्स (annex) ब्लॉकमध्ये पसरला नंतर काही भानगडी उपस्थित झाल्या तरी त्यांचे निवारण करून आमचे बस्तान त्याच खोलीत टिकवण्यात आम्ही यशस्वी झालो.

होस्टेलचे त्यावेळी दोन भाग होते त्यातील आतील भाग तंत्रनिकेतनाच्या विद्यार्थ्यांचा होता व त्यांचेही A, B, C ब्लॉक्स होते. महाविद्यालयाच्या वसतीगृहाचा भाग प्रवेशद्वारापाशीच सुरू होत होता. आत गेल्यावर अगदी समोर C ब्लॉक होता व तो पहिल्या वर्षाच्या विद्यार्थ्यांसाठी होता. प्रवेशद्वारापाशीच पण C ब्लॉकशी काटकोन करणारा B ब्लॉक होता तो द्वितीय वर्षाच्या विद्यार्थ्यांसाठी राखीव असे. C ब्लॉकला काटकोन करणारा दुसरा ब्लॉक सरळ आत गेल्यावर C ब्लॉक संपल्यावर होता तो D ब्लॉक होता त्यातही बहुतेक द्वितीय वर्षाचे विद्यार्थी असत. B ब्लॉकच्या ओळीतच A ब्लॉक होता त्यात अंतीम वर्षाचे विद्यार्थी रहात. A आणि B या दोन ब्लॉकच्या मध्ये आमचा ऍनेक्स(annex) ब्लॉक होता. त्या ब्लॉकला संडास व स्नानगृह नव्हते. त्यामुळे आम्हाला A किंवा B ब्लॉकला त्यासाठी जावे लागत होते. अर्थात दोघांनाच खोली असण्याचा जो फायदा होता त्यासाठी तेवढी गैरसोय सोसण्याची आमची तयारी होती. याशिवाय न्यू ब्लॉक हा नव्याने बांधण्यात आलेला ब्लॉकही होता त्यात तर कॉलेज, पॉलिटेक्निक यांची मिश्र वसाहत होती व त्यातही सर्व वर्गाचे विद्यार्थी होते. तो मागील बाजूस होता व त्या भागात पॉलिटेक्निकच्या वसतीगृह प्रमुखाचा बंगला व प्राचार्यांचाही बंगला होता. तर

कॉलेज वसतीगृह प्रमुखांचा बंगला पुढच्या बाजूस A व B ब्लॉकसमोर होता. विद्यार्थिनींची संख्या एका हाताच्या बोटावर मोजण्याइतकीही नसल्याने लेडीज हॉस्टेल असण्याचा संभवच नव्हता. आम्ही प्रवेश घेतला तेव्हां आमच्या सर्व तुकड्यात मिळून एक व द्वितीय वर्षाच्या टेलेकम्युनिकेशनच्या शाखेस एक अश्या फक्त दोन विद्यार्थिनी होत्या.

C ब्लॉक च्या मागील बाजूस म्हणजे प्रवेशद्वाराच्या आणखी डाव्या बाजूस जेवणघराची मोठी एकमजली इमारत होती. त्यात A ते F असे सहा क्लब होते. त्यातील आमचा C म्हणजे कर्नाटक क्लब व गुजराती विद्यार्थ्यांचा D क्लब हे दोन पूर्ण शाकाहारी होते. तर सिधी, मुस्लिम कोकणी क्लब पूर्णपणे मांसाहारी तर B हा महाराष्ट्र क्लब मिश्र पद्धतीचा म्हणजे मधून मधून मांसाहार करणारे होते.. याशिवाय मराठवाड्यातून आलेल्या मुलांचा G क्लब वेगळयाच छोट्या जागेत होता, तोही शाकाहारीच असावा.

आमच्या कॉलेजचे त्यावेळचे मेस म्हणजे क्लब ही अगदी खास संस्था होती आणि बाहेरचे विद्यार्थीसुद्धा तेथे जेवण घेण्यास उत्सुक असायचे. मेसचा कारभार अगदी लोकशाही पद्धतीने चाले व त्यात अजून कॉंग्रेसी संस्कृतीने प्रवेश केलेला नव्हता. शासनाकडुन आस्थापना खर्च झालेला होता म्हणजे प्रत्येक क्लबचे स्वयंपाकी, वाढपी व इतर कर्मचारी यांना पगार शासनातर्फे मिळत तसेच मेसमधील भांडी तसेच बाके, खुर्च्या वगैरे फर्निचरही मूळ शासनाकडूनच मिळाले असावे. दररोजचे जेवण तयार करण्यासाठी लागणारा शिधा, लाकूडफाटा हा मेस चालवण्याचा खर्च आम्हा विद्यार्थ्यांकडून घेतला

जाई. सुरवातीस काही रक्कम अनामत घेतली जाई व नंतर प्रत्येक महिन्यासाठी ज्याप्रमाणात खर्च होई त्या प्रमाणात मासिक बिल आकारण्यात येई. क्लबच्या कार्यकारिणीत सेक्रेटरी, कलेक्टिंग व स्पेंडिंग ट्रेझरर, अशी तीन पदे असत व त्यासाठी निवडणुका होत अगर सर्वानुमते ती पदे क्लबच्या सभासदांपैकी तिघाना देण्यात येत.

सचिव क्लबच्या सर्व कारभारावर देखरेख ठेवी पण त्याच्याकडे आर्थिक व्यवहार नसत. पैसे जमा करण्याचे काम कलेक्टिंग टेझरर करी तर खर्च करण्याचे काम स्पेंडिंग ट्रेझरर करी. बॅंकेत तिघांच्या नावावर खाते असे व त्यापैकी दोघांच्या सहीने पैसे काढणे किंवा चेक देणे ही कामे होत त्यामुळे तिघांनी संगनमत केले तरच पैशांचा गैरव्यवहार करणे शक्य होत असे. व तेही शक्य नसे कारण त्यात आणखी एक व्यक्ती असे ती म्हनजे फॉर्टनाईट सेक्रेटरी. पंधरा दिवसाच्या जेवणात कोणते पदार्थ द्यायचे ही गोष्ट तो ठरवत असे व दर पंधरा दिवसानी हे पद वेगवेगळ्या सभासदाकडे जात असे. त्या पदावर काम करणाऱ्या सभासदाची कार्यक्षमता तो किती चांगले जेवण व किती कमी खर्चात देतो यावर ठरत असे. प्रत्येक पंधरावड्यात झालेल्या खर्चावरून प्रत्येक जेवणास किती खर्च झाला याचा हिशेब त्या सेक्रेटरीस काढावा लागे व त्यानुसार प्रत्येकाचे बिल काढण्यात येत असे. अश्या व्यवस्थेमुळे तीन वर्षे अतिशय चांगले जेवण कमीतकमी खर्चात आम्हाला मिळाले. त्याशिवाय दोन विद्यार्थी ऑडिटरचे काम करत. सकाळी नाश्त्याला दूध व अंडे असे अर्थात तो खर्च वेगळा घेण्यात येत असे. पण त्यावेळी प्रत्येक जेवणाचा खर्च साठ ते पासष्ठ पैसे (आता साठ

पासष्ठ रुपयातही तसे जेवण मिळत नाही)इतका येत असे त्यामुळे अगदी रविवारचे मिष्टान्नभोजन व आठवड्यातील दोन चेंजसह आमचा मासिक भोजन खर्च पन्नास रुपयाच्या आसपासच असे. आणि चांगल्या जेवणामुळे प्रत्येकाची तब्येत सुधारत असे. क्लबमध्ये एक मोठा रेडिओ व कॅरम बोर्ड होता. त्यामुळे जेवणापूर्वी व नंतरही बरेच विद्यार्थी खेळत बसायचे. व बुधवारी अर्थातच आमच्यासारखे बिनाकाचे शौकीन रेडिओभोवती कोंडाळे करून बसायचे.

त्यावेळी गणित हा विषय शिकवायला मामा गद्रे व प्रो. भाटिया ही जोडगोळी होती. तसेच प्रा. वर्टीकर पण होते. ते नेहमीच starting from the fundamentals असे शिकवायचे त्यामुळे त्यांचा एकादा तास चुकला तरी पुढच्यावेळी चुकल्यासारखे वाटायचे नाही याउलट प्रा. भाटिया मागील तासाला एकादी ओळच राहिली असेल तर त्या ओळीपासूनच सुरवात करायचे. त्यांनी गणिताची F. E. BSc व S. E. B. Sc ही पुस्तके दुसऱ्याच्या नावावर लिहिली होती. Similar examples for practice. ही त्या पुस्तकातील वाक्यरचना ते आम्हाला गृहपाठ देताना वापरून आपण ते पुस्तक लिहिले आहे याची जाणीव करून द्यायचे. डेक्कन जिमखान्यावरील अलाइज पब्लिशर त्यावेळी ही पुस्तके प्रकाशित करी. गणिताचे तास रेल्वे रुळाच्याशेजारील वर्गखोली क्रमांक १२ मध्ये असत व त्यांच्या तासाच्या मध्ये कमीतकमी एकदा तरी कोणतीतरी गाडी खडखड करत शेजारून जाई व तेवढा वेळ काही शिकवणे अशक्य होत असे.. मामांच्या वर्गात हा अडथळा आनंददायक वाटायचा पण इतर वेळी तो त्रासदायक वाटे. अश्या खोल्यातून वर्ग भरवणे इतके का आवश्यक

होते काही कळत नाही. तेवढे वर्ग इतर बऱ्याच खोल्यात भरवता आले असते, पण हा विचार कोणत्याच प्राचार्यांनी अजूनतरी केला की नाही कळत नाही. तसाच त्रास वर्कशॉपशेजारील एका वर्गखोलीत व्हायचा तेथे कबुतरांची फडफड चाले. आता तो क्लास पाडून तेथे मोठी इमारत उभारण्यात आली आहे.

त्या वेळी प्राचार्य वर्तक होते. ते सिव्हिल ईंजिनिअर होते. व तंत्रशिक्षण संचालक टी. एन. तोलानी होते. त्याना आम्ही कधी पाहिलेही नाही. प्राचार्य वर्तकांनाही एकदाच पाहिले ते फी भरण्यास उशीर झाल्यामुळे होणारा दंड रद्द करून घेण्यासाठी. ते निवृत्त झाल्यावर त्यांच्या जागी प्रा. ओगले यांची ज्येष्ठतेनुसार प्राचार्य म्हणून नियुक्ती झाली. ते मेटॅलर्जी विभागाचे प्रमुख होते.

प्रथम वर्षाला अप्प्लाइड मेकॅनिक्स व इन्जिनिअरिंग ड्रॉइंग हे दोन विषय विद्यार्थ्यांचे शत्रु समजले जात कारण त्या विषयात जास्तीतजास्त विद्यार्थी नापास होत. अजूनही या परिस्थितीत फार फरक पडलेला नाही. ईंजि.. ड्रॉइंग शिकवायला प्रा केळकर होते ते बहुधा डिप्लोमाच झालेले होते, तरी त्यांचे विषयावर प्रभुत्व बऱ्यापैकी होते पण त्यांचे इंग्लिश भयानक होते. त्यावेळी आजच्यासारखी ड्रॉइंगची साधने नव्हती त्यामुळे मोठा बोर्ड. टी स्क्वेअर, सेट्स्क्वेअरची जोडी पेपर बोर्डाला चिकटून रहावा म्हणून क्लिपा असा सगळा जामानिमा घेऊन जावे लागत असे. सेटस्क्वेअरला मध्ये भोके असल्याने केळकर सर त्याला holy setsquare म्हणत. एकदा ते कट्ट्यावर उभे होते व मुले खालच्या भागात होती तर त्याना त्यांनी "Why are you understanding?"असा प्रश्न विचारला होता. आपले इंग्लिश चांगले नाही

याची त्यांनाही कल्पना होती त्यामुळे तेही "what is language?it is this येथे ते मुले व स्वत: यामध्ये हातवारे करून between you and me" असे सांगून आपले बोलणे एकमेकास कळले की पुरे असे व्यक्त करत. पण ड्रॉइंगसाठी अस्खलित भाषा महत्वाची नसल्याने आम्हाला ते कळे. त्या वेळी प्रा. गुंडा व आर्वीकर यांचे पुस्तक ड्रॉइंगसाठी होते.

गणिताचे दोन पेपर्स प्रथम वर्षास होते. त्याला M1व M2 म्हणत. त्या दोन विषयांचा अभ्यासक्रम फारच प्रचंड होता. डिप्लोमा करून एकदम द्वितीय वर्षास प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना हे दोन पेपर्स क्लिअर करावे लागत आणि ते न जमल्याने बऱ्याच विद्यार्थ्यांना पदवी शिक्षण सोडूनच द्यावे लागले. पुढे बऱ्याच काळानंतर ही त्रुटी दूर करण्यात आली व द्वितीय वर्षास एकदम प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांवरील हा बोजा काढून घेतला गेला.

इलेक्ट्रिकल इंजिनिअरिंगची आणखी वेगळीच तऱ्हा. आमच्याच वर्गाला तो विषय शिकवायला सलग एक प्राध्यापक लाभलेच नाहीत. वर्षभरात तो विषय जवळजवळ निदान दहा प्राध्यापकांनी तरी शिकवला. अगोदरच तो विषय जरा अनाकलनीय. कारण विद्युत्प्रवाह, विद्युत्दाब, वगैरे सगळयाच कल्पना काल्पनिक त्यात शिकवणारे प्राध्यापक दररोज बदलते त्यामुळे शेवटपर्यंत मला तो विषय मुळीच समजला नाही. हीट एंजिन्ससाठी सुद्धा प्राध्यापक बदलते होते पण त्यातील कल्पना दृष्य होत्या म्हणजे बॉयलर दिसत असे किंवा डिझेल इंजिन किंवा तपमान वगैरे कल्पना थोड्यातरी समजण्यासारख्या होत्या त्यामुळे त्यासही प्राध्यापक असे तसेच असले तरी

वाचून विषय कळत असे. त्यावेळी भारतीय लेखकांनी लिहिलेली पुस्तके उपलब्धच नव्हती त्यामुळे इले. इंजि. ला कॉटन. हीट एंजिन्सला लेविट किंवा रॅंगहॅम अश्यांची मोठी जाडजूड पुस्तके वाचावी लागत.

पहिले वर्ष सर्व शाखांना एकच असल्याने सिव्हिल इंजि. मधीलही दोन विषय आम्हाला होते. त्यात एक सर्व्हेइंग ऍंड लेव्हलिंग दुसरा इंजिनिअरिंग मटीरिअल्स. तिसरा एक विषय फौंडेशन ऍंड कन्स्ट्रक्शन असा होता सुदैवाने त्याला परीक्षा नव्हती.

त्या वर्षी प्रॅक्टिकल्स गणित व इंजिनिअरिंग मटे. सोडून सर्व विषयांना होती. ड्रॉईगसाठी सर्व जामानिमा घेऊन ड्रॉईंग हॉलला जावे लागे. तेथे लॉकर्स उपलब्ध होती त्यात बोर्ड ठेवता येई व दररोज नेण्या आणण्याचा त्रास वाचे.

वर्कशॉपचे चार विभाग होते. फिटिंग, चिपिंग. कारपेन्ट्री व स्मिथी. वर्कशॉपमध्ये काम करताना बॉयलर सूट घालावा लागे व तेथेच सर्व हत्यारांच्या बरोबर ठेवण्यासाठी लॉकर दिलेला असे. पुण्याच्या कॉलेजात त्यावेळी वर्कशॉपच्या तळघरात हे लॉकर्स होते. तेथे जाऊन प्रथम बॉयलर सूट चढवून व योग्य ती हत्यारे घेऊन वर यावे लागे. म्हणजे चिपिंग असल्यास छिन्नी हातोडा, तर फिटिंगसाठी योग्य त्या फायली व लोखंडी तुकडा कापण्यासाठी हॅकसॉ, कारपेंटरीसाठी लाकडी हातोडा, पटाशा, रंधा तर स्मिथीसाठी चिमटा व हातोडा वगैरे.

सुरवातीस चिपिंग किंवा फिटिंग आले की विद्यार्थ्यांची दाणादाण उडायची. चिपिंगसाठी एक चार पाच इंच उंच. तेवढाच लांब व रुंद लोखंडी

(मॅलिएबल स्टील)ठोकळा मिळायचा व त्यावरील धातू छिन्नीच्या सहाय्ये काढून त्यावर योग्य तो आकार तयार करायचा. त्या विभागाच्या बाजूस त्याचे ड्रॉइंग दिलेले असे ते अगोदर कच्चे काढून घ्यायचे व नंतर छिन्नी व हातोड्याने त्या ठोकळ्यावर आपल्या करामतीचे कौशल्य दाखवावयाचे. सुरवातीस हातोड्याचे घाव बहुधा छिन्नीऐवजी हाताच्या बोटावरच पडायचे व बरीच दुखापत व्हायची. तरी त्यावेळी डिप्लोमाच्या विद्यार्थ्यांना तर दगड घडवायचे पण प्रशिक्षण असे त्याच्यापेक्षा हे थोडे बरे म्हणायचे

वर्कशॉपमध्ये इन्स्ट्रक्टर असत ते त्या धंद्यातील प्रवीण असेच लोक असत म्हणजे कारपेंट्रीला इन्स्ट्रक्टर कुशल सुतारच असे तर फिटिंगला कुशल फिटर. त्यांच्या दृष्टीने आमचे जॉब म्हणजे किस झाडकी पत्ती. स्मिथी विभागाचे कारागीर तर इतके कुशल की जो जॉब आम्ही सात आठ दिवस राबूनही नीट करत नसू ते तो अगदी जादू केल्यासारखे. आमच्यासमोरच मोजून दहा बारा ठोके घालून पूर्ण करून फेकून देत. तीच गोष्ट इतर विभागांची.

पहिल्याच वेळी चिपिंग मिळाल्यामुळे माझे अंग दररोज अगदी मोडून येई. त्यावेळी मी गावात रहात होतो त्यामुळे आणखीच अवघड जात होते थोडक्याच दिवसात होस्टेल मिळाल्यावर चिपिंगसुद्धा सुसह्य होऊ लागले. तरीही छिन्नी व हातोडा चालवण्याचे कौशल्य काही येत नव्हते.

आपल्या दृष्टीने जॉब संपला तरी तो सबमिट करण्यापूर्वी इन्स्ट्रक्टरना दाखवावा लागे व तो त्याना पसंत पडला नाही तर तोच रिपीट करावा लागे. तरी चिपिंग व फिटिंगमधील शारीरिक श्रमामुळे त्यात रिपीट न देण्याचे सौजन्य ते

दाखवीत. पण फिटिंगमध्ये दोन भाग एकमेकात व्यवस्थित बसवावे लागत व नंतर त्यात मोठ्या भेगा नसायला हव्यात. इन्स्ट्रक्टर्स आमचा म्हणजे माझा जॉब घेऊन त्याचे दोन भाग फिट करून त्यातून पलीकडे पाहून यातून पलीकडला हत्ती दिसतोय की, म्हणून आणखी घासायला सांगत मग लागले पुन्हा घासायला. रिपीट मिळाला नाही यातच आनंद मानायचा. त्यामुळे आमचे मेडिकलला गेलेले मित्र आम्हाला घिसाडीच म्हणत तर आम्ही त्यांना खाटीक म्हणत असू.

त्यामानाने कारपेंटरी कमी श्रमाचे वाटे कारण आम्हाला दिले जाणारे लाकूड चांगल्या प्रतीचे असल्याने रंध्याने भराभरा त्याच्या कपच्या उडत. पण त्यासाठी रंधा अगोदर व्यवस्थित जोडलेला व घासलेला असणे आवश्यक असे. मी सुरवातीला कितीही घासले तरी त्या लाकडाची एकादी कपची निघे बाकी तुकडा तसाच. आमच्या मित्रांना एकाला विचारले कारण त्याच्या लाकडाच्या तो अगदी दणदण चिपा काढत होता. त्याने "अरे रंध्याला धार लावावी लागेल असे म्हणून त्याचे पाते काढून त्याला धार कशी लावायची व त्यानंतर ते पाते त्यात कसे बरोबर बसवायचे ते दाखवले त्यानंतर भराभर त्या लाकडाच्या तुकड्याच्या खपल्या उडु लागल्या त्या आनंदात मी इतके घसाघस घासले की तो तुकडा इन्स्ट्रक्टरना दाखवल्यावर"हे काय केले त्याचा आकार अगदीच कमी करून टाकला" असे म्हणून त्याच्यावर मॅलट(लाकडी हातोडा)चे दोन घाव घालून माझ्यासमोर त्याचे दोन तुकडे करून पुम्हा दुसरा लाकडाचा तुकडा घेऊन या आणि ड्रॉइंग नीट पाहून त्याप्रमाणे रंधा मारा आणि पुन्हा तुकडा

जर नीट केला नाही तर परत तिसरा तुकडा मिळणार नाही "असा दमही दिला. यावेळी मात्र मी काळजीपूर्वक जरा हळू हळूच तासले. कारपेंटरी तशी जमायला अवघड वाटली नाही कारण त्यात श्रम कमी होते व जॉब पूर्ण झाल्यावर आपण काहीतरी तयार केले आहे अशी जाणीव तरी व्हायची. उलट फिटिंगमध्ये मात्र घासघासून फक्त दोन तुकडे अडकवून एक लोखडी छोटाच चौरसच काय तो तयार व्हायचा.

स्मिथीचा विभाग सगळ्यात शेवटी माझ्या वाट्यास आला. तेथील मिस्त्री फारच मजेदार होते. तेथे भट्ट्या पेटलेल्या असायच्या व आपल्याला लोखंडाच्या सळईचा एक तुकडा मिळायचा त्यापासून कडी किंवा बोल्ट अश्या वस्तू बनवायचे असा जॉब असे. भट्टीमध्ये योग्य तपमानापर्यंत तो तुकडा चिमट्यात धरून लाल होईपर्यंत तापवायचा आणि मग त्याच्यावर जोरजोरात घणाचे घाव घालायचे. आमच्या सारख्या हळूबाईंचा तुकडा आम्ही घाव घालायला लागेपर्यंतच थंड व्हायचा मग आम्ही घातलेल्या घावाचा काहीच उपयोग व्हायचा नाही, मग काय पुन्हा तापवा आणि पुन्हा ठोका, सळीचा व्यास वाढवावयाचा असेल तर जंपिंग ही क्रिया करावी लागे त्यात तो तुकडा तापवून उभा धरून त्यावर योग्य दिशेने घाव घातले तर ठीक नाहीतर तो वाकून वाया जायचा. तुकड्यातील काही भाग तोडायचा असल्यास स्लेज हॅमर वापरावा लागे व त्यासाठी दोघांची आवश्यकता भासे. कारण चिझेल एकाने धरून दुसऱ्याने दोन्ही हातांनी स्लेज हॅमर उचलून त्यावर घाव घालावे लागत त्यामुळे एका भट्टीपाशी दोघेजण तरी असतच.

आमच्यापैकी काहीजण बनेल होती ते जॉब करायला बराच वेळ लावत मग इन्स्ट्रक्टरपैकी एकादा "काय राव, कसले मिळमिळीत ठोके घालताय अस म्हणून त्याच्या हातुन हॅमर हिसकावून घेऊन आणि जॉब चांगला गरम करून दहा बारा ठोके फाड फाड मारून जॉब तयार करून त्याच्यासमोर फेकून देत आणि"जा कर जा सब्मिट " असे म्हणायचे. स्मिथी सेक्शन मला सगळ्यात शेवटी आला. तोपर्यंत वर्कशॉपची संवय झाली होती शिवाय थंडीचे दिवस असल्याने भट्टीसमोर बरे वाटायचे शिवाय इन्स्ट्रक्टर असे मजेदार त्यामुळे स्मिथी सेक्शनचे वातावरण तप्त असले तरी एकूण ताप कमी वाटला.

मेकॅनिकल डेपार्ट्मेंट आर. टी. ऑ. ऑफीसवरून जाणाऱ्या रस्त्यावर आहे त्यामुळे कार्यालयाकडून गेले तर तो रस्ता ओलांडावा लागे. याउलट वसतीगृहातून निघाल्यावर संचेती हॉस्पिटलशेजारील पुलावरून सरळ यंत्रविभागाकडे जाता येते व आमचे पहिले तास किंवा ड्रॉईंग प्रॅक्टिकल असले तर आम्ही तसेच करत असू. लांबूनही भली मोठी चिमणी नजरेत भरत असे रात्री ती त्यावर प्रकाशझोत टाकून ती प्रकाशमान केलेली असायवी. खाली बॉयलर हाउस होते व त्यात एक लँकेशायर व एक बॅबकॉक्स विलकॉक्स असे दोन बॉयलर होते. पहिल्या हीट एंजिन प्रॅक्टिकलला बॉयलरच्या आत शिरून तो पहाणे हा भाग होता पण त्यासाठी बॉयलर सूट घालावा लागे प्रयोगशाळेत या बॉयलर्सच्या धुडाबरोबरच मर्लीस डिझेल इंजिन व इतरही इंजिने जुन्या काळीघेतलेली असल्याने धूडच होती. प्रयोग प्रत्यक्ष काही करावे लागतच नव्हते. प्रॅक्टिकल्सच्या वेळी बॉयलर अथवा इंजिने यांचे वर्णन करून त्यांच्या

कार्याची व त्यातील निरनिराळ्या भागांची माहिती देत. या विषयाचे जर्नल म्हणजे मागील वर्षीच्या मुलाने काढलेली निरनिराळ्या भागांची ड्रॉइंग्ज व माहिती, त्यामुळे ते जर्नल एकदा कॉपी केले की झाले असा प्रकार होता. त्या आकृत्या बहुधा डी. ए. लो च्या पुस्तकातल्या असायच्या.

अगदी उजव्या बाजूला ड्रॉइंग हॉल्स आहेत. त्यामध्ये मशीन ड्रॉइंग काढावयाचे असे. त्यासाठी एकादा यंत्राचा भाग देऊन त्याच्या सर्व भागांचे व संपूर्ण भागाचे असे दोन भागात ड्रॉइंग काढावे लागे. त्या भागाची मोजमापे घेऊन प्रत्येक भाग समोरून बाजूने व वरून कसा दिसेल याचे ड्रॉइंग काढायचे. त्यासाठी प्रथम स्केचबूकमध्ये कच्चे चित्रण मोजमापासह काढून नंतर मोठ्या शीटवर काढावे लागे. त्यावेळी ड्रॉइंग पेपरसुद्धा भारतीय बनावटीचे नसत. स्टेडलर किंवा स्कॉलर पेपर बरेच महाग असत त्यामुळे भारतीय बनावटीचा हॅंडमेड पेपरही काहीजण वापरत पण ते क्वचितच. हे सर्व ड्रॉइंग साहित्य गावात बुधवार पेठेतील पी. डी. ब्रदर्स आणि आणखी एक दुकानातच मिळे. एकदा सक्काळी सक्काळीच ड्रॉइंग प्रॅक्टिकल असताना माझ्याजवळील कागद संपल्याचे कळले तेव्हां बुधवारात गेलो तर सगळी दुकाने बंद. त्यावेळी पुण्यातले दुकानदार इतक्या लवकर दुकान उघडण्याचे पाप करत नसत अजूनही बरेच दुकानदार त्याच काळात वावरत आहेत. त्यामुळे मला बराच वेळ वाया घालवावा लागला. याच ड्रॉइंगहॉलमध्ये दुसऱ्या वर्षी काम करत असताना "पाणी आले पाणी आले" असा ओरडा झाला आणि आम्ही सगळे कसेबसे

बाहेर पडलो कारण पानशेत धरण फुटले होते. त्यानंतर महिनाभर कॉलेज बंदच होते.

ड्रॉइंग मध्ये पुन्हा सिविल विभागाचे ड्रॉइंग वेगळे असे. ते रेल्वे रूळाला लागून असलेल्या सिविल ड्रॉइंग हॉलमध्ये असे पण त्यासाठी अगोदर सर्व्हेइंग व लेवलिंगचे प्रॅक्टिकल करावे लागे, त्यासाठी त्याच इमारतीत इन्स्ट्रूमेन्ट्स मिळण्याची सोय होती व तेथून थिओडो लाइट डंपी लेव्हल वगैरे कुणा एका विद्यार्थ्याच्या नावावर घ्यावा लागे. सुरवातीस काही प्रॅक्टिकल्स आवारातच म्हणजे सिव्हिल डिपार्ट्मेंट व मुख्य कार्यालयाची इमारत यांच्यामधील मोकळया जागेत होत म्हणजे तेथे या इन्स्ट्रुमेन्ट्सचा वापर कसा करायचा हे शिकवले जाई व जर्नलमध्ये त्याची आकृतीसह नोंद करावी लागे. त्यानंतर प्रत्यक्ष जागेची मोजमापे घेऊन त्या जागेचे क्षेत्रफळ प्लॅनिमीटरच्या सहाय्याने काढणे वगैरे कामे करावी लागत. हा विषय प्रॅक्टिकल करूनच बराचसा समजे.

रेल्वे रुळाकडील गेटमधून आत शिरतानाच सिव्हिल विभागातूनच प्रवेश करावा लागे तर आत शिरताच लगेच डाव्या बाजूस इलेक्ट्रिक विभाग होता. त्यात वर व खाली असे दोन वर्ग होते व त्यातील पायऱ्या लाकडी होत्या त्यामुळे न आवडणाऱ्या प्राध्यापकाच्या लेक्चरच्या वेळी त्यांच्या आवाजापेक्षा या पायऱ्यावरील आपटल्या जाणाऱ्या आम्हा विद्यार्थ्यांच्या चपला बुटांचाच आवाज जास्त जोरात येत असे. त्यावेळी प्रा. एम. व्ही. देशपांडे विभागप्रमुख होते पुढे ते अमरावती कॉलेजला प्राचार्य व शेवटी तंत्रशिक्षण संचालक झाले. त्यावेळी ते नुकतेच ऑस्ट्रेलियाला जाऊन आले असल्याने कधीही एकाद्या

प्रसंगी भाषण देण्याची पाळी आली की ते त्याची सुरवात करताना किंवा भाषणाच्या मध्ये केव्हांतरी "when I was in Australia" हे वाक्य असायचेच. त्यावेळी त्या विभागात प्रा, तोटे विषय फार छान शिकवत असे मित्राकडून कळले पण आमच्या तुकडीला मात्र बदलते हुए साथीचा खेळ चालू होता. त्यात कधी पेंडसे तर कधी आठवले असे अतिहुषार लोक येत ते तर गणितेही तोंडीच करत व आमच्या सगळे डोक्यावरून जाई. चौधरी नावाचे नुकतेच अमेरिकेतून m. s. होऊन परत आलेले प्राध्यापकही कधीकधी येत. ते अमेरिकेतून आलेले असल्यामुळे त्यावेळी भारतात न मिळणाऱ्या टेरिलिनची पॅंट व शर्ट घालत पण त्याखाली मात्र स्लिपर्स घालत हे असे का हे मला कधीच कळले नाही.

सर्व्हेइंग प्रॅक्टिकल्स साठी त्यावेळी लॉ कॉलेज रस्ता अगदी मोकळा असल्याने त्यावर लेव्हलिंग वगैरे करून कंटूर सर्व्हे वगैरे केल्याचे आठवते. एका प्रकारे ती छोटीशी ट्रिपच असायची. त्यासाठी आम्ही कसे जात होतो काही आठवत नाही कारण कॉलेजपासून फार सोयिस्कर बसेस होत्या असे वाटत नाही. कॉलेजची व्हॅन वगैरे असल्याचे आठवत तरी नाही. पण तो परिसर शांत व रमणीय असा असल्याने प्रॅक्टिकल्स आनंददायक वाटत. आता तो परिसर तसा असेल यावर विश्वासच बसत नाही. शिवाय विद्यार्थ्यांची एक पूर्ण तुकडी काम करत असल्याने एकटेपण जाणवत नसे.

वर्षभरात आणखी जाणवणारे उपक्रम म्हणजे क्लब डे त्यादिवशी क्लबमधील सर्व विद्यार्थी एकत्र येऊन काही गंमतीदार खेळ खेळणे, संगीत

ऐकणे व मेजवानी व रात्री एकादा पिक्चर असा कार्यक्रम असे. त्यातच मुगले आझम आम्ही पाहिला असे वाटते गॅदरींगला मात्र मी कधीच हजर राहिलो नाही ती सुट्टी मिळाली की घरी पळायचे असे ठरलेले, त्यामुळे गॅदरींगसाठी मोठा पेंडॉल घालत तो काही पहायला मिळाला नाही.

बोटक्लब हे कॉलेजचे भूषण होते व अजूनही आहे. ड्रॉईंगहॉलच्या मागच्याच बाजूस नदी वहात असल्याने त्यावर बोटक्लब बांधण्यात आला आहे. त्यावेळी भरुचा हे त्याचे प्रमुख होते. सुरवातीस पंट या नावाची होडी चालवायला मिळे. बोटक्लबचे आम्ही सभासद झाल्यावर पंट आम्हाला केव्हांही मिळू शके तिच्यात बसून वल्हे कसे मारायचे हे एकदा कळले की ती बोट हळू हळू बराच प्रवास करत असे. बऱ्याच वेळा बहिणीस व तिच्या मैत्रिणीस घेऊनही आम्ही पंट चालवत असू.

टब्फोर हा त्याच्या पुढचा होडीचा प्रकार होता. त्यात चार जण वल्ही मारत तर एक जण दिशादर्शन करे त्याला कॉक्स म्हणत. बोटक्लबचा वर्धापन दिन रिगाटा या नावाने ओळखला जायचा व त्यादिवशी बोटिंगच्या स्पर्धा असत. त्यात टब्फोरचा समावेश असे. त्याच्यापुढे स्कल या नावाचा दोनच जणानी चालवण्याचा प्रकार असे त्याच्याही स्पर्धा असत. पंट सोडून बाकी होड्या चालवण्यासाठी पोहता येणे आवश्यक होते. टब्फोरच्या पुढे माझी मजल गेली नाही.

त्यावेळी सत्रपद्धत नसल्यामुळे परीक्षा सर्वच्या सर्व म्हणजे आठ विषयांची एकदम असे. त्यात २ गणिते, हीट एंजिन्स १, इलेक्ट्रिकल

एंजिनिअरिंग १, मशीन ड्रॉइंग, अप्लाइड मेकॅनिक्स, सर्व्हेइंग ऍंड कन्स्ट्रक्शन, व इंजिनिअरिंग मटीरीअल्स असे आठ विषय होते. ऐन परीक्षेच्या वेळी माझी दाढ दुखू लागली ती इतकी की काही वाचणे अशक्यच झाले म्हणजे आधीच उल्हास त्यात फाल्गुन मास असा प्रकार झाला. ती परीक्षा मी कशी दिली हेच कळत नाही. मशीन ड्रॉइंग, सर्व्हेइंग व बहुधा हीट एंजिन्स १ या विषयांना तोंडी व प्रॅक्टिकल परीक्षा असे, वर्कशॉपला काहीतरी जॉब करावा लागत असे. परीक्षा आटोपल्यावर मात्र दाढदुखी थांबली व मी घरी जायला तयार झालो. या पद्धतीने अभ्यास व नंतर दाढसुखीने बेजार अवस्थेत परीक्षा दिल्यावर काय निकाल लागणार याची धास्तीच होती.

सर्वच दृष्टीने हे प्रथम वर्ष अतिशय त्रासदायक गेल्यामुळे निकालातही त्याचे प्रतिबिंब पडणे स्वाभाविकच होते. त्यावेळी एकदम सर्व म्हणजे आठी विषयात पास होणे आवश्यक असे. ए. टी. के. टी. हा प्रकार नव्हता. प्रत्येक विषयात पास होण्यासाठी जरी ३५ च गुण आवश्यक असले तरी सर्व विषयांचे एकत्रित गुण ४५% म्हणजे ११०० पैकी ४९५ मिळणे आवश्यक असे. पण मी कसाबसा सटकलो तेही बरोबर ५१% गुण मिळवून कारण त्या वर्षी राष्ट्रीय गुणवत्ता शिष्यवृत्तीसाठी कमीतकमी उच्च द्वितीय दर्जा मिळणे आवश्यक असूनही या वर्षीपुरता फक्त द्वितीय वर्ग म्हणजे ५०% च्यावर गुण मिळाले तरी चालेल पण यापुढे मात्र उच्च द्वितीय वर्ग म्हणजे ५५% पेक्षा अधिक गुण मिळालेच पाहिजेत अशी तंबी भरून आमची शिष्यवृत्ती चालू ठेवण्यात आली.

त्यावर्षी अभियांत्रिकीचा निकाल पहिल्या वर्षाचा फक्त ३०% लागला होता. त्यामुळे आमचे काही मित्र मागे राहिले.

त्यावेळी जयकर नियम तेवढाच काय तो आम्हाला आधार होता त्यानुसार एका द्या विषयात किंवा एकूण गुणांसाठी १% कमी पडत असेल तर तेवढी भर मिळालेल्या गुणात घालून उत्तीर्ण म्हणून जाहीर करत. पण त्याच बरोबर प्रथम वर्षास तीनदा नापास झाल्यास अभियांत्रिकीस राम रामच ठोकावा लागे.

बी. ई. इलेक्ट्रिकल झाल्यावर एका वर्षातच मेकॅनिकलची डिग्री घेता येत असे त्यामुळे आमच्याच बी. ई. च्या वर्गात बी. ई. एले. झालेले पंचवीस तीस विद्यार्थी होते त्यामुळे आमच्या वर्गात ९५ विद्यार्थी होते. इतकेच काय आम्ही बी. ई. झाल्यावर पुण्याच्या अभियांत्रिकी महाविद्यालयात मेटॅलर्जीच्या जागा ६० करण्यात आल्या आणि इतके विद्यार्थी उपलब्ध नसल्यामुळे आमच्याच बरोबर बी. ई. झालेल्यांनी त्या वर्षी बी. ई. मेटॅलर्जी होण्याचीही संधी घेतली. त्या दिवसांची आठवण होण्याचे मुख्य कारण म्हणजे १९६३ मध्ये बी. ई झालेल्या सर्व विद्यार्थ्यांचे स्नेहसंमेलन जानेवारी २०१३ या दिवशी घेण्यात आले आणि ते दिवस आठवले.

आमच्या व आत्ताच्या अभियांत्रिकि शिक्षणाची तुलना करावीशी वाटते व अभ्यासक्रम सुधारला तरी शिक्षणाचा दर्जा किती खालावला आहे हे लक्षात येईल.त्याचे महत्वाचे कारण म्हणजे खाजगी शिकवणी वर्गांचा सुळसुळाट !

शिवाय A.T.K.T.मुळे कितीही विषयात नापास झाला तरी तो विद्यार्थी वरच्या वर्गात जातो त्यामुळे मागील वर्गाचे अनेक विषय राहिलेले विद्यार्थी वर ढकलले जातात.अर्थात ही गोष्ट वैद्यकीय शाखेसही लागू पडते आणि त्यामुळे चांगले अभियंते व चांगले वैद्यकीय पदवीधर सापडणे कठीण झाले आहे .खाजगी वैद्यकीय महाविद्यालयात अतिशय मोठा देणगीचा आकडा पार करून प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष ज्ञान मिळवण्यात फारच कमी रस असतो व त्यामुळे अश्या डोक्टरांच्या ताब्यात जाणाऱ्या रुग्णाचे भवितव्य काय असेल याविषयी न बोलणेच योग्य.

# ४. यांचे काय करायचे?

अरविंदकडे सहज डोकावलो तो नवरा बायको बराच पसारा काढून बसली होती. अरविंद पुस्तकांच्या कपाटाबाहेर एका स्टुलावर बसून कपाटातली पुस्तकं काढून त्याच्या मुखपृष्ठावरील नाव वाचून काही पुस्तकं एकीकडे तर काही दुसरीकडे टाकत होता तर वहिनी भांढ्यांच्या पेटाऱ्यातून भांडी काढून कधी एका बाजूला तर कधी दुसऱ्या बाजूला टाकत होत्या. "काय चाललेय काय तुम्हा दोघांचं?काही उद्योग नाही म्हणून तू पुस्तकांची आणि वहिनींनी भांड्यांची मोजदाद चालवलीय का?" मी त्यांच्या उद्योगात खीळ घालत म्हणालो.

"नाही रे बाबा, आता हाच महत्त्वाचा उद्योग होऊन बसलाय आता हा ब्लॉक रिकामा करायचा आहे ना?"

“खरंच की तुम्ही आता शिफ्ट होताय नाहीका? आता काय बाबा, तुम्ही नव्या कोऱ्या मोठ्ठ्या जागेत रहायला जाणार, मग काय हा ब्लॉक भाड्याने देणार का?"अरविंदच्या मुलाने नुकताच मोठा ब्लॉक घेतला होता. इतके दिवस ते दोन बेडरूमच्या जागेत रहात होते आता नातवंडे झाल्यामुळे त्याना स्वतंत्र जागा हवी म्हणून मोठा तीन बेडरूमचा ब्लॉक त्याने घेतला होता, तिकडे शिफ्ट होण्याचे काम बरेच दिवस रहातच होते, कारण नव्या ब्लॉकमध्ये तश्याच नव्या धर्तीचे फर्निचर, नव्या प्रकारचे पडदे वगैरे सर्व गोष्टी त्या ब्लॉकला शोभेशा करण्याचे काम बरेच दिवस चालले होते. त्यासाठी खास एका इंटीरियर

डॅकोरेटरला काही लाख रुपये देऊन नवा ब्लॉक सजवण्याचे काम देण्यात आले होते.

या जुन्या ब्लॉकमधील बऱ्याच वस्तू नव्या ठिकाणास शोभेशा नव्हत्या त्यामुळे आता त्यांची उपयुक्तता संपलीच होती, त्यामुळे जुना ब्लॉक भाड्याने देण्यापूर्वी "आता यांचं काय करायचं" म्हणून त्या वस्तू कोणालातरी विकून किंवा अगदी तश्याच दिल्या तरी चालेल असे प्रसाद मंजिरी (अरविंदचा मुलगा व सूनबाई) यांचे मत होते. तसे जुने बेड, लाकडी कपाट व स्टीलचेही कपाट, वॉशिंग मशीन, फ्रीज, टी, व्ही. या वस्तू काही गरजू लोकांनी पडेल किंमतीत घेतल्याही पण आता जुनी भांडी काही कोणाला नको होती व एक एक भांडे विकत बसण्याइतका वेळही कोणाला होता? त्याऐवजी एका भंगारवाल्यास ती देऊन टाकावी असे मंजिरीचे मत त्यामुळे मीराताई, अरविंदच्या सौ. त्यातील कोणकोणती भांडी भंगारवाल्यास द्यावी याचा विचार करण्यात गुंतल्या होत्या.

"यापूर्वी कधी असा प्रसंग तुझ्यावर आलाच नाही का?"मी अरविंदला विचारले.

"आला की आणि तोही अगदी अचानक "अरविंद म्हणाला.

"त्यावेळी मी नुकताच नोकरीला लागलो होतो आणि पुण्यात एकटाच रहात होतो, आणि बाकी सगळी मंडळी आमच्या गावी रहात होती. वडील नुकतेच सेवानिवृत्त झाले होते. पुण्याला कशीवशी एक खोली घेऊन रहात होतो आणि त्या वर्षी असा काही जोराचा पाऊस आला की एक दिवशी मला तारच आली, "House collapsed start immediately" मग काय तातडीने

गावाकडे गेलो. पहातो तो काय आजोबांनी अगदी हाडाची काडे करून बांधलेलं ते मातीचं घर त्याची समोरची भिंत कोसळली होती सुदैवाने त्या भिंतीजवळ कोणी झोपलेले नव्हते त्यामुळे कुणाला काही इजा झाली नाही पण आता मात्र गावात रहाणे योग्य नाही असे सगळ्यांचे मत पडले. "

. पण आता घरच पडल्यामुळे अचानक हा निर्णय घेतल्यावर आमचे मोठे कुटुंब हालवण्याचा प्रश्न तसा मोठाच होता. आमचे घर कुटुंब या दृष्टीने मोठे होते तसे सामानही इतक्या माणसांचे म्हणजे बरेच होते.

आमचे सामान बरेच होते आणि ते अश्या प्रकारचे होते की शहरातील घरात त्याचा उपयोग करणे जागेच्या अभावामुळे अशक्य होते. उदा:लाकडी देवघर, पितळी फुल्या बसवलेले मोठमोठे पाट ( आज त्या एका पाटाच्या लाकडाचीच किंमत सहज चार पाचशे रु. होईल असे सात आठ पाट, मोठा लाकडी चौरंग, मोठमोठे पितळी हंडे, घागरी व सगळी पितळी ताटे. एक मोठी लाकडी पेटी जिचे वजन दहा वीस किलोहूनही जास्त भरेल. या पेटीत आम्ही जुने कपडे ठेवत असू. व ज्या काळात केळींचे घड घरातील बागेतील केळींना लागत त्यावेळी ते लपवून ठेवायला तिचा वापर आई करत असे नाहीतर दादा गावातील लोकांना ते वाटून टाकत आणि आम्हा पोराना मात्र मग काही मिळत नसे. मोठे दगडी जाते व लोखंडी उखळी, पाटा वरवंटा, असे एकूण सामानाचे स्वरूप होते. आणि ते पुण्याला न्यायचे म्हणजे एकादा ट्रक किंवा छोटी गाडी तरी करावी लागली असती आणि त्यासाठी खर्च त्या सामानाच्या त्यावेळच्या किंमतीपेक्षा कदाचित जास्तच आला असता. आई बाबांचा जीव त्यांच्या

भांड्याकुंड्यातही कसा गुंतला असेल ते आता कळतंय. पण त्यावेळी मला झटपट हालायचे होते आणि ट्रक वगैरे करून सामान हालवायचं म्हटले तर कदाचित त्या सामानाच्या किंमतीपेक्षा ट्रकभाडंच जास्त झालं असतं. म्हणजे निर्वासित लोक फाळणीच्या वेळी अंगावरच्या कपड्यानिशी आले तसेच आम्ही हललो म्हटले तरी चालेल

आमच्या सामानातील कपडे, अंथरुणे, पांघरुणे व आवश्यक कपडे सोडून बाकी सर्व सामान गावातील आमच्या नातेवाईकांकडे ठेवायचे व काही गरजूंना विकून टाकायचे असे मोठी बहीण व तिचे यजमान यांनी ठरवले व दोन दिवसात सामानाची विल्हेवाट लावून आम्ही निघण्यासाठी तयार झालो. कोठल्याच सामानात माझा जीव गुंतलेला नसल्यामुळे त्याची विल्हेवाट कशी लागली याकडेही मी लक्ष दिले नाही, मात्र माझ्या धाकट्या बहिणीस इतके चांगले लाकडी पाट, चौरंग हे सामान अगदी फुकटातच लोकांना दिल्याचे फार वाईट वाटले. आईला तर काय वाटले याची कल्पनाच करवत नाही. वडिलांना त्या पडक्या घरातूनही बाहेर काढता काढता आम्हाला अगदी पुरेवाट झाली. त्यांच सारं आयुष्य त्या गावात गेलं होतं त्यामुळे "तुम्ही सगळे जा मी येथेच रहातो "असे ते म्हणत होते.

आमच्या सामानाची विल्हेवाट अश्या पद्धतीने लावल्यामुळे आमचे सामान इतके कमी उरले की एस टी. बसने आम्ही गावापासून आमच्याबरोबर घेऊन येऊ शकलो व पुण्यातील त्या दोन खोल्यात कसेबसे का होईना बसवून आम्हाला वावरण्याइतकी जागाही उरली पण ती गोष्ट वेगळी होती पण आता

या वस्तूंमध्ये जीव गुंतला आहे. त्यावेळी सगळ्या वस्तु टाकून गाव सोडताना आई बाबांना काय वाटले असेल याची कल्पना आता येतेय.

"मला वाटते आई तुम्ही फार विचार करू नका सगळी भांडी दोनशे रुपयात घेऊन जातो असं भंगारवाला म्हणालाय" मंजिरीने सुचवले. "अगं असं कसं म्हणतेस? जरा काही कमी पडलं की यातली भांडी वापरावी लागतात. आज तू दोनशे रुपयास सगळी भांडी देशील आणि उद्या प्रशांतची मुंज निघाली आणि चार पाहुणे आले की लगेच हजार रुपयांची भांडी विकत घ्यायला निघशील आणि एकदा मुंज आटोपली की मग लगेच म्हणशील "’आता यांच काय करायचं ’"

" म्हणून माझ मत आहे की बरेच सामान याच ब्लॉकमध्ये ठेवावे एक खोली त्यासाठी आपल्याकडे ठेवावी आणि बाकीचा फ्लॅट भाड्याने द्यावा "अरविंदने आपले मत व्यक्त केले. पण त्याच्या मतास फारसा वाव होता असे दिसले नाही.

"आता पुस्तकांची काही गरज नाही ती एकाद्या वाचनालयाला देणगी म्हणून द्यावी "असे अरविंदने सुचवताच ते मात्र सगळ्यांना एकदम मान्य झाले. खरं तर मोठ्या हौसेनं अरविंद, मीरा इतकेच काय प्रशांत मंजिरी यांनीही हौसेने घेतलेली जवळ जवळ १०, ००० रु. पेक्षाही जास्त किंमतीची ती पुस्तकं होती पण आता नातवंडांना तर मराठी वाचनाचीच ॲलर्जी होती, प्रसादला वाचायला वेळ नव्हता, मंजिरीलाही घरकामातून किती वेळ मिळेल हे समजत नव्हते त्यामुळे पुस्तके आणि पुस्तकांचे कपाट या दोन वस्तू घरातून बाहेर काढावयास अरविंदशिवाय कोणाचीच फारशी हरकत नव्हती.

त्यामुळे भांडी कोणती ठेवणे आवश्यक आहे हे पहायला मीरा व पुस्तके कोणती आवश्यक आहेत हे पहायला अरविंद बसले होते. प्रत्येक भांडे काढले की त्याबरोबर ते कोणी दिले, केव्हां दिले याची आठवण मीराला यायची. "हे वन्संनी प्रसादच्या मुंजीच्या वेळी दिलं, हे मामांनी लग्नात दिलं हे काकांनी वास्तुशांतीला दिले करत तिच्या हातून ठेवण्याच्या भांड्यांचाच गठ्ठा वाढत चालला तर प्रत्येक पुस्तक उघडल्यावर "हे पुन्हा एकदा वाचलं पाहिजे?असं म्हणत अरविंदच्या ठेवण्याच्या पुस्तकाचा गठ्ठा वाढत चालला. शेवटी विकावयाची भांडी आणि देणगी म्हणून द्यायची पुस्तके एकूण भांडी व पुस्तकांच्या १०% सुद्धा निघाली नाहीत शेवटी प्रसाद म्हणाला,

"जाऊदे आई बाबा, इतकीच भांडी व पुस्तके निरुपयोगी निघाली तर उगीचच कशाला निवड करायचीय सरळ सगळी भांडी व पुस्तके नव्या ब्लॉकमध्ये ठेवू त्यांची कपाटेही बरोबर घेऊ म्हणजे ती कुठे ठेवायची हा प्रश्नही निकालात निघाला. " शेवटी प्रसादला न राहवून तो म्हणाला.

"अरे पण तूच म्हणालस ना इतकं सामान तेथे नेण्यात अर्थ नाही म्हणून?" अरविंदने जरी प्रश्न विचारला तरी त्याने त्याचबरोबर सुटकेचा सुस्काराही सोडला हे माझ्या लक्षात आले. त्याचबरोबर यापुढे काही दिवसांनी जर हेही घर सोडायची वेळ आली तर कदाचित आपल्याविषयीही "यांचे काय करायचे?" असा विचार त्यांच्या मनात आला तर? हा प्रश्नही त्याच्या डोक्यात घोंघावत असणार

# ५. चष्म्याची पृथ्वीप्रदक्षिणा

सध्या डॉलर काय महाग झालाय, विचारता सोय नाही. म्हणजे जर आपण अमेरिकेत गेलो तर एक डॉलरची वस्टू खरेदी करायची म्हटले तरी पूर्वी तासभर विचार करत असू तर आता आणखीच विचार करून कदाचित ती वस्तू घेण्याचे रद्दही करू. अगोदरच आपणा भारतीय नागरिकांची परदेशात खरेदी करायची झाली तर कुठल्याही परकीय चलनाचे मग तो डॉलर असो वा आणखी कोणतेही चलन असो, रुपयात रूपांतर करण्याची मानसिकता कधीच जात नाही. त्यामुळे साध्या साध्या वस्तु खरेदी करायचे झाले तरी ते तिकडे अगदी स्वस्त म्हटली आणि आपल्याकडे अगदी महागाई कितीही वाढली तरी रूपांतरित पैशांत तिकडल्यापेक्षा आपल्याकडेच कितीतरी स्वस्त मिळते. त्यामुळे पहिल्यांदा अमेरिकेस गेलो तेव्हां साधा अंघोळीसाठी मग ( कारण सौ. ना शॉवर चालत नाही ना)एक डॉलरला म्हटल्यावर लगेच आमच्या खरेदी यादीतून कट झाला. कटिंग तर मी बरेच दिवस केलेच नाही. माझे एक मित्र तर मला म्हणाले, "अरे आपणच कात्रीने केस थोडे थोडे कट केले तरी काही बिघडत नाही. अगोदरच आपल्या डोक्यवर केस असतातच किती आणि असे सहा महिन्यात वाढून वाढून किती वाढणार? आणि हा त्यांचा उपदेश चार महिन्यांपर्यंत मी कसाबसा पाळला पण नंतर मात्र जाऊदे दहा पंधरा डॉलर पण मानेवर आणि कानांवर ते केस नकोत असे म्हणून एकदा मी कटिंग करण्याचे

धाडस केलेच. त्याबाबतीत ए. पी. जेंच्या डोक्यातील ज्ञानापेक्षा त्यांच्या डोक्यावरील केसांना मी खरोखरच मानतो.

माझ्या भाच्याच्याच बायकोने सांगितलेला याबाबतीतील तिचा अनुभव मला नेहमीच आठवतो. तिच्या नवऱ्याला निरनिराळ्या देशातच काम करावे लागते. त्यामुळे दुबई, बॅंकॉक, टर्की अशी त्यांची वास्तव्य स्थाने सारखी बदलत असतात. तरीही पादत्राणासारख्या गोष्टी ते भारतात आल्यावरच खरेदी करतात. काही झालं तरी भाचा कुणाचा? पण दुबईतीलच आपल्या लेकीला मुलगी झाल्यावर माझ्या भाच्याने "यावेळी नातीसाठी डायपर, दुपटी, सगळ्या ब्रॅंडेड वस्तु मी मॉलमध्येच घेणार. " असे जाहीर केले. खर तर माझा भाचा खरेदी प्रकरणी माझा कित्ता गिरवण्यास विसरला होता अश्यातला भाग नाही. तोही माझ्याइतकाच खरेदी शत्रू आहे पण नात झाल्याच्या आनंदात असल्यामुळे असा अपराध त्याचे हातून झाला. तरी त्याच्या बायकोने त्याला उगीच त्या फंदात पडू नकोस असा अगोदरच इशारा दिला तरी त्याने तिकडे दुर्लक्ष केले, त्यामुळे त्याला धडा शिकवण्यासाठी तिने "ठीक आहे तर मग मला पण सॅंडल्स घ्यावयाच्याच आहेत त्याही तिथेच घेऊ" असे आव्हान त्याला दिले त्याबरोबर त्यानेही " घेकी तुला काय वाटते मी घाबरेन की काय?" असे ते स्वीकारले.

नातीसाठी खरेदी झाली, डायपर, दुपटी सारख्या वस्तु ब्रॅंडेड असल्याने महाग होत्या यात वादच नाही तरी एकदा दिला म्हणजे शब्द पाळलाच पाहिजे या बाण्याचा तो मर्द मराठा तेवढ्याने खचण्यासारखी परिस्थिती नव्हती किंवा निदान वर वर तरी त्याने तसे काही दाखवले नाही. पण नंतर सॅंडल खरेदीची

पाळी आली. पहिलीच सॅंडलची जोडी पाहिली आणि तिची किंमत २५०० रिआल ऐकल्यावर माझ्या भाच्याचे अवसान गळले कारण एका रियालचा विनिमय दर त्यावेळी दहा रु. होता. तरीही कसेबसे अवसान गोळा करून "घे काही हरकत नाही" असे तो म्हणाला पण त्याची बायको त्यावर म्हणाली " ही काही फिटिंगला बरोबर नाही" आणि तिने दुसरी पसंत केलेली संडलची जोडी होती ३००० रियालला. अर्थात आता माघार घेणे माझ्या भाच्याला शक्यच नव्हते. पण त्यानंतर मात्र त्याने दुबईत खरेदी करण्याचे नाव काढले नाही. आणि ब्रन्डेड हा शब्दही तो आता उच्चारत नाही. आता पुण्यातही संडलची खरेदी करणे तितकेच अवघड झाले असणार असा माझा अंदाज आहे.

आम्ही मात्र भाच्याइतके धाडसी आणि पैसेवालेही नसल्यामुळे त्या काळात अमेरिकेस जाताना दोन चष्मे घेऊनच जा असा आम्हाला दिलेला सल्ला इमानेइतबारे पाळला. असा सल्ला देण्यात आला त्याचे महत्त्वाचे कारण म्हणजे ती बाब फार खर्चाची असते म्हणतात. एकदा मॉलमध्ये गेल्यावर सहज मी चष्म्यांच्या सेक्शनमध्ये फिरताना पाहिले तर त्या चष्म्यांखाली चार पाच असे आकडे पाहिल्यावर मी मनात म्हटले, "अरे उगीचच लोक अमेरिकेला नाव ठेवतात इतके स्वस्त चष्मे असताना, आणि तसे मी मुलास म्हटल्यावर त्याने ते आकडे किंमतीचे नसून ते आकडे चष्म्याच्या नंबरांचे आहे असे सांगून माझा गैरसमज दूर केला. खरे तर अमेरिकेतील लोकही चष्मा वापरतातच ना पण त्यांची किंमत ते भारतीय रुपयात रूपांतरित करत नाहीत.

मी नेलेल्या चष्म्यातील एक खरोखरच नायगारा पहायला गेलो तेव्हां काचेवर तुषार उसळून दिसेनासे झाल्यामुळे काढून रेनकोटच्या आतील शर्टाच्या खिशात ठेवण्याच्या प्रयत्नात प्रत्यक्षात रेनकोट व शर्ट यांच्या मधील पोकळीत ठेवला गेला व नायगारार्पण झाला व ही घटना अमेरिकावास्तव्याच्या अगदी सुरवातीसच घडली, त्यामुळे माझा दुसरा चष्मा मी असाच गहाळ करीन अशी खात्री असणाऱ्या माझ्या काळजीवाहू सरकारने अगदी स्वत:चा चष्मा घालून त्या चष्म्यावर बारीक नजर ठेवली होती तरीही डिसनेवर्ल्डमधील एका बोटराइडमध्ये चष्मा घालून बसण्याचा मूर्खपणा अंगलट येण्याची शक्यता निर्माण झालीच होती. सुदैवाने तो निसटून बोटीच्या बाहेर न पडता आतच पडला व लगेच सुरक्षित हाती आला हे माझे भाग्य.

आम्ही एका चष्म्यासह सुखरूप परत आलो. पण त्यानंतर अमेरिकेत्च राहिलेल्या आमच्या सूनबाईंचा चष्माही नातवंडांच्या भांडणात मोडकळीला आला म्हणजे काचा सुरक्षित पण चौकटीची एक दांडी तुटली व आणखीही काही नुकसान झाले. तिच्याकडे अर्थातच एक अधिकचा चष्मा होताच पण तोही मोडला तर काय घ्या म्हणून मोडलेला चष्मा दुरुस्त करण्यासाठी तिचे शेजारी ज्यावेळी भारतात येणार होते त्यांच्याबरोबर तिने तो पाठवला. (कारण अर्थातचअमेरिकेत चष्मा घेणे हे मोठे खर्चाचे काम!) ते ठाण्यात येणार असल्याने चष्मा ठाण्यापर्यंत आला. पुढच्या प्रवासासाठी त्यांनी तो आपल्या शालकाबरोबर त्याला पुण्यास काही कामानिमित्त यावयाचे होते म्हणून पाठवला. त्यालाही आमच्या पुण्याच्या घरापर्यंत येण्याइतका वेळ नसल्याने

भांडारकर रस्त्यावर तो ज्या बँकेत येणार होता त्या रस्त्यावर आमचे एक काम करायचे ठरवून त्याला तेथे भेटायचे ठरवले.

आम्ही भांडारकर रस्त्यावर जाऊन त्याने सांगितल्याप्रमाणे बँकेच्या गेटपाशी जाऊन उभे राहिलो. आम्ही एकमेकास पाहिले नसल्यामुळे आमच्या भ्रमणध्वनीवरून त्याच्याशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला. मी भ्रमणध्वनीवरून बोलू लागलो "नमस्कार, आम्ही तुम्ही सांगितल्याप्रमाणे बॅंकेच्या गेट्पाशी उभे आहोत. " " मी पण बॅंकेच्या दारातच उभा आहे" असे त्याचे उत्तर येताच आम्ही आजूबाजूला पाहू लागलो पण जवळपास हातात भ्रमणध्वनी घेऊन बोलत असलेला कोणीच दिसत नव्हता. त्यामुळे आम्ही गोंधळलो. मग आमचा भ्रमणध्वनी वाजला म्हणून मी कानाला लावला"तुम्ही पहिल्या गेटपाशी उभे आहात का?" आम्हाला त्या बॅंकेला दोन प्रवेशद्वारे आहेत हे आत्ताच कळत होते त्यामुळे मी त्याला उत्तर दिले, " तुम्ही दुसऱ्या गेटपाशी उभे असाल तर आम्ही तेथे येतो असे म्हणून आम्ही त्या इमारतीला वेढा घातला पण त्या इमारतीस दुसरे गेट असल्याचे काही दिसले नाही शेवटी पुन्हा त्याचा संदेश आला, "असे करा बॅंकेच्या आतच या मी कौंटरपाशी उभा रहातो" हा पर्याय बरा होता म्हणून आम्ही आत शिरून बॅंकेच्या कौंटरपाशी कोणी व्यक्ती उभी आहे का हे पाहू लागलो अर्थात कौंटरपाशी बरेच ग्राहक उभे होते पण त्यापैकी कोणी आमची वाट पहात आहे अस जाणवले नाही म्हणून आम्ही पुन्हा भ्रमणध्वनी लावला तेव्हां मात्र ती व्यक्ती बॅंकेत नव्हतीच हे उघड झाले कारण आमच्या समोर कोणीच भ्रध्ववर बोलत नव्हते पण माझ्या भ्रध्व वर मात्र

आवाज येत होता " मी वाट पहातो आहे तुमची"शेवटी बराच वेळ बोलून झाल्यावर त्याने विचारले "तुम्ही कोणत्या बॅंकेत आहात?"यावर मी " एच डी एफ सी " असे उत्तर देताच काय घोटाळा झाला ते कळले. आम्ही दोघेही सुरवातीस बॅंकेच्या प्रवेशद्वाराजवळ उभे आहोत असे बजावून सांगत होतो ते बरोबरच होते पण तरीही एकमेकास पाहू शकलो नाही याचे अगदी छोटेसे कारण म्हणजे त्याने बॅंकेचे नाव H. S. B. C. सांगितले होते व आम्ही ते H. D. F. C. आहे अशा समजुतीने त्या बॅंकेच्या गेटपाशी उभे राहून बोलत होतो तर तो त्याने सांगितल्याप्रमाणे H. S. B. C. च्या गेटपाशी उभा राहून बोलत होता.

चष्मा त्याच्याकडून घेऊन आमच्या घराच्या जवळील चष्म्याच्या दुकानात तो दुरुस्तीला टाकला, सूनबाईने चष्म्याचा नंबर दिला नव्हता कारण काचा सुरक्षित होत्या व चौकटीचीच दुरुस्ती करायची होती. पण दुकानदाराने तो चष्मा हाताळताना बरोबर एक काच खाली पडली आणि तिचे चक्क दोन तुकडे झाले. दोन्ही तुकडे जुळवून नंबर काढता येईल व काच बसवून चौकट बदलून देईन असे त्याने सांगितले तरी उगीच चुकीच्या नंबरचा चष्मा वापरला जायला नको म्हणून आम्ही मुलाला फोन केला व त्याने ईमेलद्वारे चष्म्याचा नंबर पाठवला, त्यानुसार बनवलेला चष्मा आम्ही नंतर स्वतःच बरोबर घेऊन गेलो. थोडक्यात डॉलरच्या वाढत्या भावामुळे चष्म्याला मात्र पृथ्वीप्रदक्षिणा घडली होती.

# ६. दोन ओंडक्यांची ----!

"यथा काष्ठं च काष्ठं च " चे गदिमानी गीतरामायणात रूपांतर करताना

दोन ओंडक्यांची होते सागरांत भेट

एक लाट तोडी दोघां, पुन्हा नाहिं गांठ

असे म्हटले आहे. पण कधीकधी आपल्या आयुष्यात मात्र दुसरी एकादी लाट उठते आणि अगदी वेगळ्या ठिकाणी पुन्हा त्याच दोन ओंडक्यांची भेट घडवते

माझ्या चाकरीच्या पहिल्याच वर्षात मला एक मजेशीर अनुभव आला. त्या काळात अभियांत्रिकी अभ्यासक्रमात सत्र पद्धत नव्हती त्यामुळे संपूर्ण वर्षाच्या अभ्यासक्रमावर वर्षाच्या शेवटी एकदम आठ विषयांची परीक्षा असे शिवाय ए. टी. के. टी. वगैरे पण नसे. पुणे विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांना फक्त एकच आधार असे तो म्हणजे जयकर नियमाचा. बॅ. जयकर एके काळी पुणे विद्यापीठाचे कुलगुरू होते. त्या नियमानुसार कोणत्याही एका विषयात किंवा एकूण गुणांकात कमी पडत असेल तर एक टक्का गुण बहाल करण्यात येत. तरीही एकूण गुणही ४०% असणे आवश्यक असे म्हणजे सर्व विषयात उत्तीर्ण होऊनही जर एकूण गुणांची टक्केवारी ३८% असली तरी तो मुलगा अनुत्तीर्ण म्हणून जाहीर होत असे. ३९% असेल तर जयकर नियमाचा फायदा त्याला

मिळून तो उत्तीर्ण होत असे. तीच गोष्ट एका विषयात ३० गुण मिळाले व त्याची एकूण गुणसंख्या जर ४०% किंवा अधिक असली तर जयकर नियमानुसार तो उत्तीर्ण होत असे. जयकर नियम एक विषय किंवा एकूण गुणसंख्या यापैकी एकालाच लागू होत असे.. अशा कडक नियमामुळे प्रथम वर्षाचा निकाल बहुधा ३०% च्यावर क्वचितच जात असे. याशिवाय प्रथम वर्षाच्या परीक्षेस तीनच वेळा बसण्याची संधी मिळत असे जर तीनदा अनुत्तीर्ण झाला तर त्याला अभियांत्रिकी सोडून दुसरी वाट धरावी लागे.

माझ्या एका मित्राचे असेच झाले होते. माझ्याबरोबरच पुण्याच्या अभियांत्रिकी महाविद्यालयात प्रथम वर्षाला त्याने प्रवेश घेतला. तसे आम्ही फर्ग्युसन कॉलेजलाही दोन वर्षे बरोबरच होतो. अभियांत्रिकीच्या प्रथम वर्षाच्या परीक्षेत तो अनुत्तीर्ण झाला त्यानंतर दोन संधी मिळाल्या व त्यातही तो अनुत्तीर्ण झाल्यावर अभियांत्रिकी पदवीचा नाद सोडून तो कोठे गेला ते मात्र काही कळले नाही व अभ्यासाच्या व्यापात त्याची चौकशीही करता आली नाही. मी अभियांत्रिकी अंत्य परीक्षा उत्तीर्ण झाल्यावर औरंगाबाद तंत्रनिकेतनात प्राध्यापक म्हणून प्रवेश केला व तेथेही एकदम अंत्य वर्षासच शिकवण्यास मला सांगण्यात आले व वर्गात प्रवेश केला तर माझा हा मित्रच समोरच्या बाकावर बसलेला. त्याने अभियांत्रिकीच्या पदवीची शक्यता नष्ट झाल्यामुळे नाद सोडून इकडे तंत्रनिकेतनात प्रवेश घेतला असावा.

आपला अगदी जवळचा मित्र समोर पाहून मी अगदी आचंबित झालो. माझे त्या विषयाचे लेक्चर संपल्यानंतर मी बाहेर पडलो व तो मला "सर एक

शंका आहे " असे विचारू लागला. मला एकदम लाजल्यासारखे झाले मी त्याला प्राध्यापककक्षात घेऊन गेलो आणि हातास धरून जवळ ओढत म्हणालो. " हे सर, सर काय लावले आहेस?मला विसरलास की काय तू?" तो एकदम खजिल होऊन म्हणाला " तस नाही रे पण वर्गात असताना तू सरच आहेस ना? मग तसेच म्हणायला नको का?" "ठीक आहे रे पण वर्गाबाहेर पडल्यावर मात्र आपण मित्र आहोत हे विसरू नको" असे मी म्हटल्यावर त्यालाही बरे वाटले.

अमेरिकेत गेल्यावर तेथे असतानाच पुण्यातीलच एक गृहस्थ काही कारणाने चांगले परिचित झाले. पुण्यातच असल्याने पुढील वेळी आम्ही अमेरिकेस जाणार आहोत हे कळल्यावर आपल्या मुलाला देण्यासाठी काही वस्तु त्यांनी आमच्याबरोबर दिल्या. आम्ही अमेरिकेत गेल्यावर त्यांच्या मुलाला फोन केल्यावर तो लगेचच आमच्याकडे आला. त्याच्याबरोबर जवळ जवळ माझ्याच वयाचे गृहस्थ होते. मित्राच्या मुलाने त्यांची ओळख आपले सासरे म्हणून करून दिली, व तो आमच्या मुलाशी गप्पा मारू लागला. योगायोगाने त्याच वेळी तेथे माझ्या औरंगाबादच्या महाविद्यालयातील सहकारी प्राध्यापक व आमचे कौटुंबिक मित्रही असणाया गृहस्थांचा मुलगा एडिसनला काही कारणाने आला होता तो आम्हाला भेटायला आला व थोड्या गप्पा मारून बाहेर पडला. तो गेल्यावर माझ्याकडे आलेल्या गृहस्थांनी " हा औरंगाबादच्या पॉलिटेक्निकमधील अमुक अमुक सरांचाच मुलगा ना?" असं विचारल्यावर आश्चर्य वाटले व मी "हे तुम्हाला कसे कळले?" असे

विचारल्यावर " अगदी त्यांच्यासारखा दिसतो आहे" असे ते म्हणाले. "पण त्याना तुम्ही कसे ओळखता?" असे मी आणखीच आचंबित होऊन विचारले त्यावर त्यानी उत्तर दिले " अहो मी त्याच पोलिटेक्निकमध्ये शिकलो " हे ऐकून मी त्याना म्हणालो"अहो मी तेथेच प्राध्यापक होतो "आमच्या प्राध्यापक मित्राच्या कधीही न पाहिलेल्या मुलाला ओळखणाऱ्या या गृहस्थाला मी त्याच तंत्रनिकेतनात काम करत होतो याची मात्र माहिती नसावी याचे मला नवल वाटलं पण मग त्या गृहस्थांनी उठून नमस्कार करत, "सर तुम्ही तर आम्हाला शिकवत होता, मी तुम्हाला ओळखले पण एकदम तसे सांगण्याचा धीर झाला नाही " त्याच्या नम्रपणाचे कौतुक करावे की इतकावेळ नुसते गप्प बसल्याबद्दल त्याला चांगलेच झाडावे काही कळेना अर्थात आता या वयात ते शक्य नव्हते.. नंतर मात्र खऱ्या अर्थाने आमच्या गप्पा सुरू झाल्या अनेक जुन्या आठवणी निघाल्या.

तंत्रनिकेतनातील माझा एक विद्यार्थी बराच प्रौढ दिसे. अतिशय नम्र वागत असे. पण तो काही दिवस वर्गात दिसे तर मध्येच एकदम गायब होई. त्याची हजेरी कमी पडेल असे वाटून मी तो हजर असताना त्याला वर्ग संपल्यावर भेटायला बोलावले. तो माझ्या खोलीत आला व नम्रपणे उभा राहिला. त्याला पाहून मी " काय हो भूमकर तुम्ही बरेच दिवस वर्गात दिसत नाही काय अडचण आहे?"

" खरे आहे सर, माझी उपस्थिती कमीच आहे. पण माझी खरोखरच अडचण आहे. आर्थिक परिस्थिती बरी नसल्यामुळे मी लिट्ल फ्लॉवर

विद्यालयात शिकवायला जातो व त्या दिवशी मला वर्गात हजर रहाता येत नाही. "

त्याने स्पष्टपणे खरी परिस्थिती निवेदन केल्यामुळे मी त्याला शक्यतो जास्तीत जास्त प्रयत्न करून उपस्थिती सुधारण्याचा सल्ला दिला. वर्गात कमी मुले असल्यामुळे व आता व्यक्तिशः भेटल्यामुळे तो माझ्या चांगलाच लक्षात राहिला व तोही निदान माझे वर्ग तरी कमीतकमी चुकवण्याचा प्रयत्न करू लागला. वर्षाच्या शेवटी तो बऱ्यापैकी गुण मिळवून उत्तीर्णही झाला. त्यानंतर त्याची गाठ पडण्याचा योग येईल असे वाटत नव्हते.

त्यानंतर किती वर्षे गेली याचे स्मरण नाही. त्या विद्यार्थ्याला मी पूर्णपणे विसरून गेलो. माझ्या धाकट्या बहिणीच्या विवाहाची जबाबदारी माझ्यावर होती म्हणून मी स्थळसंशोधन करत होतो. एका विवाह नोंदणी संस्थेत मला एक पत्ता मिळाला. त्यात तो उमेदवार जालना येथील महाविद्यालयात राज्यशास्त्राचा प्राध्यापक आहे असा उल्लेख होता. पत्ताही दिलेला होता त्याप्रमाणे मी त्या पत्त्यावर जाऊन पोचलो व दारावर टक टक केल्यावर दार उघडणारी व्यक्ती पाहून आश्चर्याचा धक्काच बसला कारण दार उघडनारी व्यक्ती म्हणजे भूमकरच म्हणजे माझा तो विद्यार्थीच होता त्यामुळे मी त्याला व त्यानेही मला ओळखले. त्याने मला आत बोलावले व थोडा वेळ बोलणे झाल्यावर मी त्याला माझ्याकडे असलेल्या स्थळाविषयी विचारले, "अहो मग हे भूमकर कोण?" त्यावर त्याने " तो मीच "असे उत्तर दिल्यावर मी चाट पडलो आणि म्हणालो, "अहो पण तुम्ही तर डिप्लोमाला माझे विद्यार्थी होता आणि यात तर हे गृहस्थ राज्यशास्त्राचे

प्राध्यापक आहेत असे म्हटले आहे" असे मी म्हणाल्यावर"खरे आहे सर, " अशी सुरवात करून त्याने सांगायला सुरवात केली.

" खर तर सर मला डिप्लोमा करण्यात रस नव्हता. पण एस. एस. सी. नंतर कमी कालावधीत पार पडेल म्हणून मी तंत्रनिकेतनात प्रवेश केला पण मला खरा रस शिक्षणक्षेत्रात व इतिहास, राजकारण, साहित्य अशा विषयातच होता त्यामुळे मी डिप्लोमा झाल्यावर काही काळ नोकरी केली पण त्याचबरोबर मी बाहेरून अभ्यास करून राज्यशास्त्रात स्नातकोत्तर पदवी घेतली, त्यानंतर मी जालना महाविद्यालयात प्राध्यापकपदासाठी अर्ज केला व सुदैवाने ती नोकरी मला मिळाली. आता मी आवडीच्या क्षेत्रात काम करत आहे. " त्याच्या घरातील वडील धाऱ्यांना पत्रिका पाहून लग्न करायचे असल्यामुळे व माझ्या बहिणीची पत्रिका त्याना योग्य न वाटल्याने तीच आमची शेवटची भेट ठरली.

अमेरिकेत व भारतातही अनेक विद्यार्थी अनपेक्षितपणे भेटतात व ओळखही दाखवतात पण अश्या काही भेटींची गंमत वाटल्यामुळे त्यांचा हा उल्लेख!

# ७. काचविरहित चष्मा

चष्मा हा शब्द मराठी भाषेत कसा घुसला कळत नाही, कारण मूळ फारसी वा उर्दू भाषेतही या शब्दाचा अर्थ उपनेत्र हा नसून नजर असा आहे. चष्मेबद्दूरचा अर्थ वाईट नजर दूर राहो असा आहे. आणि त्या भाषेत चष्माला शब्द आहे ऐनक. मराठीत पूर्वी वापरात असलेला आरशी वा चाळशी बाद करून आपण हा चुकीचा शब्द स्वीकारला. चाळिशीमागे वय झाल्याची जाणीव अध्याहृत असल्यामुळे तो नाकारला गेला हे समजू शकते पण उपनेत्र हा शब्द तर कितीतरी कर्णमधुर आहे तरीही हा उच्चारायलाही फार सुलभ नसलेला धेडगुजरी शब्द आपण रूढ केला. व तोच फार प्रचारात असल्यामुळे वापरणे भाग आहे.

आपल्याला चांगले दिसावे म्हणजे दृष्टिदोष दूर व्हावा म्हणून आमच्यासारखे लोक चष्मा लावतात पण हॉंगकॉंग मध्ये मात्र इतरांच्या दृष्टीला आपले रूप आपण चांगले दिसावे म्हणून चष्मे लावण्याची फॅशन चालू झाली आहे. लहानपणी वडिलांचा चष्मा घालण्याची खूपच हौस मलाही होती. त्यांची चाळिशी लावून चालू लागलो की आपण मोठे झाल्याचा भास व्हायचा( आता मात्र मोठे झाल्याची खंत वाटते). चालताना काचेतून पाहिल्यावर जमीन उतरती दिसायची व घसरतो की काय अशी भीती वाटायची तरी त्यातही मजा वाटायची. पण तशी मजा या तरुण तरुणींना वाटत आहे म्हणून ते चष्मे वापरतात अशातला भाग नाही. कारण ते जे चष्मे घालतात त्यांना काचाच नसतात

काचांशिवाय नुसत्या चौकटीच डोळ्यावर अडकवून ते चालतात. आपल्या व्यक्तिमत्वात भर घालण्यासाठी ते असे काचविहीन चष्मे वापरतात म्हणे. अगदी ज्यांना दृष्टिदोष आहे तेही स्पर्शभिंगे बसवून वरून ही असली चष्म्याची चौकट वापरतात. त्यामुळे आपण अधिक रुबाबदार किंवा सुंदर दिसतो असे काहींना वाटते.

काहीचा आपण चष्मा लावल्यावर आपण असलेल्या वयाहून लहान दिसतो असा समज असतो तर काहींना आपण अगदीच पोरकट दिसतो आणि चष्मा लावल्यास जरा प्रौढ वाटू अशी कल्पना चष्मा लावण्यामागे असते. त्यामुळे अशा अनेक चौकटी ते जवळ बाळगतात व गरजेनुसार किंवा आपल्या वेषभूषेस शोभून दिसेल अशी चौकट परिधान करतात थोडक्यात चष्म्याची काचविरहित चौकट हा त्यांच्या वेषभूषेचा एक भागच बनली आहे.

चू फून ही ३२ वर्षाची तरुणी हाँगकाँग रेडिओवर सकाळी निवेदिका म्हणून काम करते तिच्या मते आपल्या डोळ्याभोवती निर्माण झालेली काळी वर्तुळे त्यामुळे झाकली जातात. पण मग नुसती चौकट वापरण्या ऐवजी साध्या काचेचा चष्मा ते का वापरत नाहीत? एक कारण म्हणजे नुसत्या चौकटीचे वजन खूप कमी असते त्यामुळे काचेच्या चष्म्यापेक्षा हा चष्मा हलका असते. आणि दुसरे कारण धुक्यात, पावसात, बाष्पयुक्त वातावरणात काचेवर पाणी जमा होऊन समोरचे कमी दिसू लागण्याचीही शक्यता असते. एका तरुणाच्या मते काचेमध्ये आपले प्रतिबिंब दिसलेले त्याच्याकडे येणाऱ्या काही मुलींना आवडत नाही त्यामुळे तो नुसती चौकट वापरणे पसंत करतो.. १९९० मध्ये

जपानमध्ये ही फॅशन आली आणि ती संपुष्टात आली. आता ती हाँगकाँगमध्ये मूळ धरत आहे. या लाटेमुळे ऍंडी युंग चा खिसा मात्र फुगत चालला आहे. कारण हाँगकोंग मधील एका बोळकंडीतील जार्डीन बाजारातील हा विक्रेता एका चौकटीला चार पासून सात डॉलरपर्यंत किंमत लावून अशा वीस फ्रेम्स दररोज विकतो. त्याची खरेदीची किंमत असते फक्त अडीच डॉलर्स. मी आपला वाहत्या गंगेत हात धुवून घेतोय असे तो म्हणतो कारण त्याला माहीत आहे ही लाट काही फार दिवस टिकणार नाही. आपल्याकडे ती आली आहे का? कोण जाणे.

आता गूगलने एक नवीन चष्मा बाजारात आणण्याचा घाट घातला आहे. हाही काचरहित आहे. दोनतीन दिवसापूर्वीच त्यांनी आपले हे गुपित उघड केले आहे. हा चष्मा म्हणजे डोळ्यावर चढवता येण्यासारखे पारदर्शक पटल असणार आहे. दिसायला ते चष्म्यासारखे असले तरी प्रत्यक्षात त्यात काचा नसणार तर तो संगणकाचाच अवतार असणार म्हणजे डोळ्यावरील हा पटल संगणकाचे काम करणार. तो घालणाऱ्या व्यक्तीला त्यावर भूपृष्ठावरील मार्ग किंवा जागा यांचे नकाशे पाहता येणार किंवा आंतरजालासारखीच इतर माहितीही उपलब्ध होणार. त्यावर ध्वनि नियंत्रणही असणार व त्यावरून हे चष्मा वापरणारा संदेश घेऊ वा पाठवू शकेल. थोडक्यात चष्मा वापरणारी व्यक्ती संगणकच डोळ्यावर चढवणार असे दिसते. डोळ्यांवर हे मायापटल असले तरी त्यामुळे सत्य जगताचा विसर मात्र तो घालणाऱ्या व्यक्तीस पडणार नाही असा अनुभव हा चष्मा प्रत्यक्ष वापरणाऱ्यांनी व्यक्त केला आहे. एक तरुण तर या संशोधनावर

फारच खूष आहे. तो म्हणतो एकादी गोष्ट ( की तरुणी ) दिसली आणि तिचे छायाचित्र खेचण्याची मला लहर आली तर उगीच कॅमेरा काढा उघडा तो योग्य अंतरावर व कोनात स्थिर करा इतकी सगळी कटकट यामुळे वाचणार कारण मनात आले की त्या चष्म्याच्या वर असलेले एक बटण दाबले की बस्स निघाला फोटो शिवाय हे गुपित माझ्यापुरतेच राहील हे वेगळेच.

गूगलचे स्पर्धक ऍपल यांनीही असाच संगणक बाजारात आणण्याची तयारी केली आहेच हे उघडच आहे. पाहूया आपल्याकडे पण असे चष्मे केव्हा मिळायला लागतात ते!

# ८. सौंदर्यस्पर्धेत पुरुष?

आजपर्यंत सौंदर्यस्पर्धेत स्त्रियाच भाग घेत व त्यांच्यासाठीच सौंदर्यस्पर्धा असतात ( त्या पाहायला मात्र पुरुष चालतात किंवा लागतातही. ) पण यावेळी मिस युनिव्हर्स कॅनडाच्या स्पर्धेतील अजिंक्यपदाच्या दावेदार जेना टालकोवाने मात्र या स्पर्धेत वादळ निर्माण केले आहे. प्रथम तिला स्पर्धेत भाग घ्यायलाच परवानगी देण्यात आली नव्हती कारण ती जन्माने स्त्री नाही. म्हणजे पुरुष म्हणून जन्माला येऊन नंतर शस्त्रक्रियेने शरीरात बदल घडवून तिचे स्त्रीत रूपांतर करण्यात आले आहे. अर्थात हा उपद्व्याप सौंदर्य स्पर्धेत भाग घेण्यासाठी एकाद्या पुरुषाने केला असेल असे वाटत नाही. पण त्याला स्त्री म्हणून जीवन जगणे पसंत असल्यामुळे त्याने तसे केले व आता स्त्री म्हणूनच वावरू लागल्यावर तिने सौंदर्यस्पर्धेतही एक स्त्री म्हणून भाग घेतला यात तिचे ( की त्याचे )काय चुकले? पण शेवटी आता तिला त्या स्पर्धेत भाग घेऊ देण्यात आला आहे व तिचा अंतिम ( की महा अंतिम? ) फेरीत प्रवेश झाला आहे. पण तरीही या विषयावरील चर्चेला ऊत आला आहे.

काहींच्या मते तो स्त्री म्हणून जन्माला आला नसल्यामुळे त्याला स्त्रियांसाठीच्या सौंदर्यस्पर्धेत भाग घेऊ देणे योग्य नाही. त्यांचा मुद्दा असा आहे की व्यक्तीचे

लिंग हे तिच्या जन्माच्या वेळी जो जनुकांचा मेळ

झालेला असतो त्यावर ठरत असते अर्थातच एकदा तो मेळ निश्चित झाल्यावर ती व्यक्ती स्त्री किंवा पुरुष आहे असे ठरते त्यामुळे नंतर शस्त्रक्रियेने केलेला लिंगबदल ही वरवरची रंगसफेदी ठरते त्यामुळे पुरुष म्हणून जन्माला आलेली व्यक्ती वरून स्त्री सारखी दिसू वा वागू लागली तरी मूलतः तो पुरुषच आहे म्हणून या स्पर्धेत भाग घेण्यास अपात्र ठरतो. त्यांच्या मते केवळ एकाद्या व्यक्तीच्या मानसिक अवस्थेमुळे स्त्रीचे पुरुषात किंवा पुरुषाचे स्त्रीत असे रूपांतर करणेच योग्य नव्हे.

याउलट काहींच्या मते आता जेना ही स्त्री म्हणूनच वावरते त्यामुळे तिला तो हक्कच आहे. त्यांच्या मते पूर्वी समलिंगी संबंधांना समाजाची मान्यता नव्हती पण समाजाने आता ते मान्य केले आहेत. खरे तर हा मुद्दा येथे गैरलागू आहे. कारण खजुराहो येथील मिथुन शिल्पातही समलिंगी संबंध दाखवले आहेत असे खजुराहो येथे जाऊन आलेल्या व्यक्ती सांगतात. अल्बर्ट एलिस या प्रख्यात मानसशास्त्रज्ञाच्या मते अशा संबंधांमध्ये अनैसर्गिक काही नाही. ( संदर्भ "मी अल्बर्ट एलिस" ले. डॉ. अंजली जोशी शब्द पब्लिकेशन )त्यामुळे त्याचा संदर्भ देऊन जेनाचे स्पर्धेत भाग घेणे स्वीकारार्ह म्हणता येणार नाही. स्पर्धेच्या संयोजकांनीही जरी जेनाला स्पर्धेत भाग घेऊ दिला तरी अशा प्रकारे लिंगबदलामुळे रूपांतरित झालेल्या कोणत्याही व्यक्तीला भाग घेता येईल असा नियमातच बदल करण्यात आला आहे का याविषयी मात्र मुग्धता बाळगली आहे.

# ९. परिमार्जन ----?

"माझ्या मुलाचे मी नावच असे ठेवले आहे की त्याला कोणी वेड्यावाकड्या नावाने हाक मारूच शकत नाही. " मास्तर अगदी रंगात येऊन सांगत होते. " असं बघ तुझे नाव विनायक असेल तर पोरे तुला म्हणणार विन्या. मधुकर असेल तर म्हंणणार मध्या तसे राजाचे अगदी राज्या केले तरी ऐकणाऱ्यास ते वाटणार राजाच. ", मास्तरांचा आवेश "सुखाच्या सरींनी --- " असं लांबलचक नाव असणाऱ्या एका मालिकेतील मातृदेवतेसारखा होता तिच्या मुलाचे नाव सिद्धार्थ त्याचे सिध्या असे रूप अगदी त्याच्या बहिणीने केलेले सुद्धा तिला अजिबात खपत नाही, !अगदी तस्सेच

खरोखरीच गुरुजी होते खरं तर मास्तर माझे आणि मी त्यांच्याहून ३०-३२ वर्षांनी तरी लहान होतो तरी ते माझ्याशी मित्रासारख्या गप्पा मारत होते याचे एक कारण त्यांच्या व माझ्या नावाची आद्याक्षरे सारखीच असल्याने कधी कधी त्यांची पत्रे पोस्टमन आमच्या घरी टाकी व मी त्यांना इमाने इतबारे नेऊन देत असे, आणि दुसरे व आता महत्वाचे कारण, त्यांच्या मुलाबरोबर त्यावेळच्या इन्टर सायन्स चा अभ्यास मी करत होतो. व माझ्या संगतीत त्याला चांगले मार्क पडून इंजिनिअरिंगला प्रवेश मिळेल अशी आशा त्याना होती. त्या आदल्या वर्षी त्याने ड्रॉप घेतला होता त्यामुळे त्यांना विशेष काळजी होती. हा राजा हा

त्यांचा धाकटा मुलगा. माझ्याबरोबर अभ्यास करणारा मोठा भाऊ मुकुंद नाव ठेवल्यामुळे "मुक्या" झाला होता त्यामुळे त्यानी ही दक्षता घेतली होती. ।

मास्तर आम्हाला शाळेत शिकवायला होते. अर्थात त्यावेळी अश्या गप्पा ते मारायचे नाहीत कारण तेव्हांचे आमचे नाते वेगळे होते. आणि तसे ते स्वभावाने कडक म्हणूनच प्रसिद्ध होते. तसे ते शिस्तीचे भोक्ते आणि अभ्यासूदेखील. त्यावेळी शाळेत हिन्दी हा विषय नुक्ताच सुरू झाला होता आणि पूर्वीच्या शिक्षकांना हिन्दीचा ओ की ठो माहीत नव्हता पण त्या काळात त्यानी हिंदी राष्ट्रभाषा सनद पर्यंत परीक्षा देऊन हिन्दीत प्रावीण्य मिळवले व हिन्दी या विषयाचे शिक्षक झाले. अर्थात इतरही विषय जरुरीनुसार ते शिकवतच.

त्यांचा स्वभाव जरा मजेशीर होता. काही वेळा ते खरेच विनोदी बोलत स्वत:वरच करायचा त्यांचा एक खास विनोद म्हणजे, "मी एकदा नदीत पोहत होतो आणि अचानक धारेला लागून अगदी बुडण्याच्या बेतात होतो. तेव्हां हा दाम्या (त्याच्याकडे बोट दाखवून ) काठाने चालला होता त्याने लगेच बुडी मारून मला पकडून कांठावर आणले. माझा जीव वाचवणाऱ्या दाम्याला काहीतरी बक्षीस द्यावे असे मला वाटले, त्यामुळे मी त्याला विचारले, "बाळ दामू, माझ्यावर केवढे हे उपकार तुझे, बोल तुला काय बक्षीस देऊ?" त्यावर बाळ दामू हात जोडून म्हणाला, "मास्तर मला काही द्यायचेच असेल तर इतकेच करा की माझ्या मित्रांना हे सांगू नका की मी तुम्हाला वाचवले नाहीतर ते मला जिवंत सोडणार नाहीत. " तसाच त्यांचा दुसरा एक ठरलेला विनोद म्हणजे बाळ्याला विचारले की पांडव किती? यावर बाळ्या काय उत्तर देतो, "मास्तर,

बाजल्याच्या खुराइतके म्हणजे चार आणि हाताने दाखवणार बोटे तीन" येवढ्या वयात हिन्दी भाषा शिकून त्यावर प्रभुत्व मिळवल्याचा अभिमान त्याना होता. त्यावेळी गावातली मुसलमान पोरं जरी मराठी येत असली तरी एकमेकाशी हिन्दीतच बोलायची त्यांच्यावर भाष्य करताना मास्तर म्हणत यांच हिन्दी म्हणजे काय "भागते भागते आया और धबाकदिशी पड्या "

शालेय जीवन संपल्यावर माझा मास्तरांचा आणि मुकुंद व राजा यांचाही संबंध कमीच झाला तसा तो माझ्या खास मित्रापैकी एक होता अशातला भाग नव्हता. माझ्या धाकट्या भावाचा तो वर्गमित्र. पण छोट्या गावात सगळेच एकमेकाला ओळखत असतात तसे आम्ही एकमेकास ओळखत होतो. राजा माझ्या भावाकडे कधी कधी यायचा व त्याच्या मित्राचा मोठा भाऊ म्हणून पुरेसा आदरही दाखवायचा. त्याचा मोठा भाऊ माझ्याबरोबर अभ्यास करायचा तर मोठी बहीण माझ्या बहिणीकडे यायची शिवाय माझे वडीलही त्याच्याच वडिलाचे सहकारी होते त्यामुळे आमच्या दोन्ही कुटुंबातील सगळ्याच भावंडांचे एकमेकाकडे जाणे येणे असे. राजाशी फार काही बोलणे झाले नाही तरी त्याच्याही बोलण्यात वडिलांच्या विनोदबुद्धीचा कधी कधी प्रत्यय यायचा.

पण शिक्षणासाठी बाहेर पडल्यावर गावातली माणसे परत क्वचितच भेटू लागली कारण सुट्टीव्यतिरिक्त गावात जाणे घडत नसे व नंतर नोकरीमुळे प्रत्येकजण अगदीच वेगळया क्षेत्रात व शहरात गेल्यावर आम्ही गाववाले होतो याची आठवणच काय ती उरली. त्यात परत मी औरंगाबादी म्हणजे आमच्या गावापासून जरा आडवळणी ठिकाणी गेल्यामुळॅ मीच गावाकडील दोस्तांपासून

लांब पडल्यासारखा झालो होतो. पण मध्यंतरी महाविद्यालयाच्या कामानिमित्त मला निरनिराळ्या अभियांत्रिकी उद्योगांना भेटी द्याव्या लागल्या. त्या मध्ये प्रशिक्षणासाठी असलेल्या विद्यार्थ्यांची प्रगती पहाणे हा हेतू असे. त्यात एकदा कुर्ल्याच्या कंपनीस कंपनीस भेट देण्याचा योग आला. या कंपनीतच त्यावेळी राजा काम करत होता. तो पुण्याच्याच शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयातून उच्च गुणांसह इंजिनिअर होऊन बाहेर पडला होता व शिवाय नंतर त्याने निटी मध्ये पदव्युत्तर शिक्षणही पार पाडले होते व तेथेच त्याची या उद्योगात निवड होऊन तो सध्या कार्यरत होता या सर्व गोष्टी मला माहीत होत्या त्यामुळे यावेळी त्याची गाठ घेण्याचे मी निश्चित केले होतेच.

त्या कंपनीत असणाऱ्या आमच्या विद्यार्थ्यांची प्रगती पाहून मग मी तेथील पर्सोनेल ऑफिसरकडे चौकशी केली व त्याच्याबरोबरच राजाकडे गेलो. मला पाहून त्याला खूपच आनंद झाला. तसा तो बऱ्याच उच्च पदावर होता त्यामुळे त्याला स्वतंत्र केबिन वगैरे होती. तेथेच त्याने तिघांसाठी चहा व नास्ता मागवला. माझ्याशी बऱ्याच गप्पा मारल्या. आपल्या घरी येण्याचाही आग्रह त्याने केला. पण तो अंबरनाथला रहात होता. त्यामुळे ते मला शक्य झाले नाही.

मधल्या काळात माझ्या धाकट्या बहिणीचे लग्न झाले व योगायोगाने तिचेही घर आता अंबरनाथलाच होते त्यामुळे बहिणीकडे गेल्यावर मात्र राजाकडे जायचे असे मी निश्चित केले आणि अंबरनाथला गेल्यावर बहिणीला मी तसे सुचवले. माझे मेहुणेही आता राजाला ओळखू लागले होते, त्यामुळे त्यांना त्याचे वास्तव्यस्थान माहीत होते त्यामुळे आम्ही सगळेच राजाकडे गेलो.

आम्हाला पाहून त्याला खूपच आनंद झाला. त्याच्यापेक्षाही अधिक त्याच्या वडिलांना, म्हणजे माझ्या गुरुजींना, कारण त्यांच्या सहकाऱ्याचा मी मुलगा शिवाय त्यांच्या मोठ्या मुलाबरोबर अभ्यास करायला मी त्यांच्या घरी जायचो. दुर्दैवाने त्यांना स्वरयंत्राचा कर्करोग झाला होता अर्थात तो आम्ही गाव सोडण्यापूर्वीच झाला होता पण सुदैवाने योग्य वेळी तपासणी झाल्यामुळे लवकर निदान झाले व त्या वेळी ताबडतोब शस्त्रक्रिया केल्यामुळे ते वाचले मात्र स्वरयंत्र काढून टाकल्यामुळे त्यांना बोलता मात्र येत नव्हते पण घशाला लावलेल्या नळीतूनच प्रयत्न करून जरा विचित्र व अगदी हलक्या सुरात बोलून ते आपल्या भावना प्रकट करू शकत होते त्यामुळे तशाही अवस्थेत त्यानी आमच्याशी खूपच गप्पा मारल्या.

राजाचाही स्वभाव थोडाफार वडिलांसारखाच विनोदी होता त्यामुळे त्याने आम्हाला सांगितले, "मी अगोदरच ठरवले होते की बायकॉ नोकरी करणारीच हवी. कारण घरात ती किंवा आई यापैकी एकच राहू शकण्याची शक्यता आहे " राजाचे हे विधान एका म्यानात दोन तलवारी राहू शकत नाहीत या थाटाचे होते आणि तसे खरेही होते कारण राजाची आई फारच कर्तबगार व कामाला अगदी वाघीणच त्यामुळे तिच्या झपाट्यापुढे या नव्या पिढीतील राजाची बायको टिकणार नाही हे त्याचे अनुमान बरोबर होतेच. त्यामुळे त्याने खरोखरच नोकरी करणारीच बायको शोधली होती. पण केवळ तेवढेच कारण त्याच्या या निवडीस होते असे नसून तिला मिळणारा पगार हे कारणही थोडेफार

असले पाहिजे असे माझ्या मेव्हण्यांचे मत. हे मत त्यानी राजाच्या इतर वेळीच्या वागण्यावरून बनवले होते.

पण त्याला स्वत:ला चांगलाच पगार असताना बायकोच्या मिळकतीवर राजाचा डोळा असेल हे मला तरी पटत नव्हते. त्याच्या कद्रूपणाच्या कहाण्या त्यांनी सांगितल्या त्यावरून त्यांचे मत खरेही असेल असे वाटले. त्यावेळी त्याचा मुलगा लहान होता. मी तेथे असताना तो आम्हाला भेटायला म्हणून आला व त्याच्या मुलाच्या हातात ठेवलेली साधी लिमलेटची गोळी तो चोखू लागला आणि ती त्याच्या हातातून खाली पडली. "अरे पडू दे त्याला दुसरी देतो" असे म्हणून दुसरी माझ्या बहिणीने त्याच्या हातात ठेवली, पण राजाने मात्र जाताना ती गोळी उचलून पुसून आपल्या खिशात टाकली ती घरी गेल्यावर मुलाला देण्याचे त्याने ठरवले असावे हे पाहिल्यावर मात्र आमच्या मेव्हण्यांच्या सांगण्यात तथ्य असावे असे वाटू लागले.

तसे पहायला गेले तर त्याला पगार उत्तमच होता शिवाय त्याच्या बायकोचा पगारही घरी येत होता. शिवाय वडिलांची थोडी का होईना पेन्शनही होती. त्यामुळे त्याचा काटकसरीपणा चिकटपणा या सदरात मोडण्यासारखा वाटला. त्याने कधी कोणाला मुद्दाम घरॉ बोलावून चहा पाणी केले असे माझ्या बहिणीला दिसले नाही. भरपूर पैसा मिळत असून कार वगैरे घेऊन मजेत रहावे असे त्याला वाटत नव्हते उलट आणखी पैसे मिळवण्यासाठी त्याने शेअर्समध्ये पैसे गुंतवणे सुरू केले. त्यातही त्याचे अंदाज बरोबर ठरल्यामुळे त्याला भरपूर अर्थप्राप्ती होऊ लागली. त्याची मुलेही-- एक मुलगा व एक मुलगी-- हुषार

असल्यामुळे व पत्नी पण शिक्षिका असल्यामुळे त्यांचेही शिक्षण व्यवस्थित चालू होते.

त्या काळात काही दिवस शेअरमार्केट चांगलेच तेजीत असल्याने राजाने खूपच कमाई केली आणि त्यात त्याला एवढा आत्मविश्वास वाढला की चक्क नोकरी सोडून त्याने शेअरमध्येच सगळे लक्ष द्यायचे ठरवले. त्या काळात त्याने स्वत:च्या, मुलाच्या, मुलीच्या व बायकोच्या नावावर प्रत्येकी पाच लाखाची रक्कम मुदत ठेवीत गुंतवली. पण एक दिवस हर्षद मेहताच्या कारवायांनी शेअर बाजार एकदम कोसळला.

अर्थात राजाला इतके काही घाबरून जायचे कारण होते अशातला भाग नाही. कारण त्याच्या मुदत ठेवी अगदी सुरक्षित होत्या. त्याच्या बायकोची नोकरी चालू होती आणि शेअरचे भाव काही सदैव कोसळत्या स्थितीत रहातील अशातला भाग नव्हता. पण आधीच उल्हास त्यात फाल्गुन मास अशातली परिस्थिती झाली. त्यामुळे त्यानंतर राजाची गांठ पडली तरी तो काही फार नेहमीच्या खेळकर मनस्थितीत दिसला नाही. त्याचा चिकटपणा वाढलाच होता म्हणजे आम्ही कधी बहिणीकडे गेलो तरी आम्हाला बोलवून चहा देण्याचासुद्धा उपचार पाळेनासा झाला. आमच्या मास्तरांना मात्र आम्ही त्यांच्याकडे जावे बोलावे असे वाटे. त्यांना घश्यातून उच्चार करून का होईना आमच्याशी बोलावे वाटे त्यांच्या बोलण्यातील प्रयत्नाचा त्यांच्यापेक्षा आम्हालाच अधिक त्रास व्हायचा कारण आम्हाला ऐकू यावे म्हणून घसा खरडून ते बोलत. तरीही

त्यांच्यावरील प्रेमामुळे व आदरापायी आम्ही त्यांच्याकडे जात असू. राजाची आई पण त्याच्या नाराजीकडे दुर्लक्ष करून आमचे आदरातिथ्य करायची.

पण आश्चर्याची गोष्ट म्हणजे ज्या आपल्या मुलाच्या नावालासुद्धा कोणी वेडेवाकडे करू नये म्हणून जपणाऱ्या मास्तरांच्या त्या मुलाला आपल्या वयोवृद्ध आई वडिलांना मात्र कसेबसे सांभाळणेही नकोसे वाटू लागले हे अर्थात माझ्या मेव्हण्यांकडूनच मला कळले. हे खरे आश्चर्य म्हणावे लागेल कारण त्यानी राजावर जिवापाड प्रेम केलेले. तसा राजाला मोठा भाऊ होता व आई वडिल त्याच्याकडे जाऊन राहू शकले असते. पण त्या जागेचे इतके वर्षे राहून वळण पडलेले त्यांना सोडवत नव्हते. मास्तरांची पेन्शन येत होती त्यामुळे आई वडिलांचा भार राजावर पडत होता अशातला भाग नव्हता तरीही तो भार आपल्यावरच पडतो आहे असे राजाचे मत होते की काय कळत नाही. त्याच्या तश्या वागण्यामुळे मास्तरही हताश झाल्यासारखे वागू लागले. एक दिवस ते घर सोडून गेले आणि परत आलेच नाहीत.

माझ्या मेव्हण्यांचे बारीक लक्ष राजाच्या घरातील सगळया घडामोडीकडे असायचे त्यामुळे ते राजाला घेऊन मास्तरांना शोधायला गेले, त्यामुळॅच राजाला जावे लागले असे वाटते. नाहीतर गेलेत ना बरेच झाले असा विचार त्याने केला असता. अर्थात आईने त्याला स्वस्थ बसू दिले नसते. . आणि शेवटी अंबरनाथ स्टेशनच्या आसपास विमनस्क स्थितीत भटकताना ते सापडले मग दोघे त्यांना घरी घेऊन आले.

आणि एक दिवस मास्तरांची प्राणज्योत मावळली. त्यांचा अंत्यविधी तरी योग्य त्या पद्धतीने व्हावा ही आईची इच्छाही राजाने पुरी केली नाही, पण माझे मेव्हणे फार आग्रही असल्यामुळे व इतरही लोकांच्यापुढे वाईट दिसेल म्हणून त्याने कसेबसे काही विधी उरकले, पण त्यानंतर आईची जणु नजरकैदच सुरू झाली. म्हणजे तशीतीही थकलीच होती पण नंतर तिची अवस्थाही अतिशय केविलवाणी झाली

त्या कालात कुठल्याही उपक्रमात राजा भाग घेत नसे आणि अगदी समोर राहूनही माझ्या बहिणीकडे तो किंवा त्याची बायको फिरकले नाहीत. त्याच्या मित्रांनी एकदा त्यांच्या वर्गमित्रांचा मेळावा शाळेतून बाहेर पडून २५ वर्षे झाली म्हणून केला व त्यासाठी राजाला घेऊन जाऊच असा विडा उचलूनच त्याचे काही मित्र त्याच्याकडे आले पण त्याने त्याना पार धुडकावून लावले, "असल्या गोष्टींमध्ये मला मुळीच रस नाही"त्याने त्यांना धुडकावीत म्हटले. ते अगदी त्याला उचलून नेण्याच्या तयारीने आलेले पण त्यांनाही त्याने दाद दिली नाही.

मास्तरांच्या निधनानंतर आपल्या आईचे त्याने केलेले हाल मला माझ्या मेव्हण्यांच्या कडूनच कळले. तिला त्याने कॉटच्या एका पायाला बांधून ठेवले होते. त्याच्यामागे काय उद्देश होता कळत नाही. शेवटी ती बाई पण एका दिवशी जग सोडून गेली. तिच्या अंत्यविधीसाठी कोणी इतर माणसे यावीत व तिचा शेवटचा प्रवास तरी सुखकर व्हावा असे राजाला मुळीच वाटले नाही. त्याने एक ॲम्ब्युलन्स मागवली व तो माझ्या मेव्हण्यांसह तीमधून आईचे शव स्मशानात घेऊन गेला व विद्युतदाहिनीच्या कर्मचाऱ्यांच्या ताब्यात ते देऊन फक्त त्यांनी

दाहिनीमध्ये शव घालेपर्यंतच तो तेथे थांबला आणि बहुधा माझ्या मेव्हण्यांच्या स्कूटरवरून घरी आला. बस्स तेवढाच त्याचा आणि त्याच्या मातृदेवतेचा शेवटचा संबंध! अर्थात त्यानंतर तिचे दिवस वगैरे करण्याचा प्रश्नच उद्भवत नव्हता.

माझ्या बहीणीसमोरचा तो गाळा राजाने लवकरच सोडला, त्या जागेतील आठवणीही नको असे वाटून की काय कोण जाणे! नंतर मीही कित्येक दिवसात त्याच्याकडे जाऊ शकलो नाही कारण त्याचे घर आता सहज जाण्यासारखे राहिले नाही. पण माझ्या एका मुक्कामात त्याची गाठ रस्त्यावर पडली आणि योगायोगाने त्याचे घर तेथून जवळच होते, त्यामुळे नाइलाजाने त्याला घरी चल असे म्हणावे लागले. हा ब्लॉक पहिल्यापेक्षा खूपच चांगला होता हवेशीर जागी होता आणि त्याने बऱ्यापैकी सुशोभितही केला होता. त्यावेळी राजा घरात एकटाच होता, कारण आता त्याचा मुलगा दिल्लीत कामाला होता, मुलगी कॉलेजला व बायको नोकरीवर गेली होती. तरीही त्याने काहीतरी थंड पिण्याचा आग्रह केला व फ्रीजमधील बाटलीतील रंगीत पेयात पाणी मिसळून मला प्यायला दिले.

त्यानंतर कित्येक दिवस आमचा संबंध नव्हताच म्हटले तरी चालेल. मास्तरांचा तर असण्याचा संबंधच नव्हता त्यामुळे त्यादिवशी राजाचा फोन आल्यावर मला आश्चर्य वाटले, " काय रे आहेस का घरी? यायचेय तुझ्याकडे येऊका?". अर्थातच येऊका असे विचारल्यावर त्याला नको म्हणणे शक्य नव्हते व तसे करण्याचे कारणही नव्हते. राजा आता आपल्या मुलीच्या लग्नाची

पत्रिका द्यायला येणार होता. त्यामुळे त्याचे हे येणे काहीसे अपेक्षितही होते. पण मधल्याकाळातील त्याच्या काही अनुभवामुळे तो येईल की नाही असेही वाटत होते. त्याच्या मुलाची लग्नपत्रिका पोस्टानेही त्याने पाठवली नव्हती. पण यावेळी मात्र तो आला नसता तरच आश्चर्य वाटले असते, कारण त्याची होणारी सून आमच्या दूरच्या नात्यातली होती. अर्थात तिच्याकडील पत्रिका आम्हाला येणारच मग आपण वेगळी कशाला द्यायची असाही विचार तो करू शकला असता म्हणा त्याच्या मुलाच्या लग्नाची पत्रिका नाहीतरी त्याने पाठवली नव्हतीच. पण यावेळी मात्र त्याने ती चूक सुधारण्यासाठी माझ्याकडे प्रत्यक्षच यावयाचा बेत केला असावा. यावेळी मात्र राजा खरोखरच आला. मधल्या काळात आपण असे का वागलो याचे स्पष्टीकरण द्यावे असे त्याला वाटत होते की काय कोणास ठाऊक. पण यावेळी त्याचा चेहरा प्रसन्न व बोलणेही मनमोकळे वाटत होते,

"तुला खरे सांगू का अण्णा, (माझ्या भावासारखे तोही मला अण्णाच म्हणे) शाळेत असताना तुझे दादा जेव्हां आम्हाला बातम्या सांगायचे ( त्यावेळी आमच्या शाळेत शाळा सुरू झाल्यावर प्रार्थनेनंतर ताज्या बातम्या सांगितल्या जायच्या व ते काम माझ्या वडिलांकडे होते. )त्यावेळी भारताचे भावी आधारस्तंभ तुम्ही आहात, तुमच्यातूनच कोणी नेहरू, सुभाष बनतील असे ते म्हणत तेव्हां आम्ही खरेच असे काहीतरी बनणार असे मला वाटायचे. आणि नंतर प्रत्यक्षात तसे काहीच न झाल्यामुळे मी अगदी अस्वस्थ झालो. त्यामुळे मी अगदीच एकलकोंडा बनत गेलॉ " अशी कबुलीच त्याने दिली तरीही नेहरू,

सुभाष होऊ इच्छिणाऱ्या व तसे होऊ न शकल्याबद्दल दु:खी होणाऱ्या मुलाने आपल्या आई वडिलांची आबाळ आणि इतका कंजूषपणा का केला हे मला समजले नाही आणि ते मी विचारण्यात काही अर्थ नव्हता. पण लग्नासाठी त्याने आग्रहाचे निमंत्रण दिले हे मात्र खरे.. पण लग्नानंतर आमचा काही संबंध राहिला नाही कारण त्याचा मुलगा कधी दिल्ली तर कधी बंगलोरला असे व राजा व त्याची बायकोही बरेचदा त्याच्याकडेच असत. माझ्या बहिणींनेही अम्बरनाथ सोडले त्यामुळे राजावृत्त कळेनासे झाले.

अनेक वर्षानंतर राजाने अम्बरनाथ कायमचे सोडले असे मेव्हण्यांनी माझ्या कानावर घातले व शेवटी त्यांनी जे सांगितले त्यामुळे मी अगदी आश्चर्यचकित झालो. राजाने अम्बरनाथ सोडताना आपला भलामोठा फ्लॅट एका वृद्धाश्रमास दान केला होता. संपूर्ण आयुष्यात केलेली काटकसर व वृद्ध आईवडिलांकडे केलेले दुर्लक्ष्य याचे अंशत: तरी परिमार्जन करावे अशी सद्बुद्धी त्याला सुचली असल्यास नकळे. मनुष्यस्वभावाचा थांग लागणे मोठे कठिण असते हे निश्चित!

# १०. गोळी कशी गिळू मी?

प्रत्येक शास्त्रात गेल्या काही शतकातच अतिशय नेत्रदीपक प्रगति झाली आहे. संगणकामुळे तर काही प्रकारचे काम करण्याच्या पद्धति इतक्या बदलल्या आहेत की पूर्वीचे कारखाने, कार्यालये जशी दिसत तशी आता मुळीच दिसत नाहीत. वैद्यकशास्त्रातही प्रशंसनीय प्रगति झाली असली आणि दवाखाना या संस्थेचे स्वरूप मात्र बदलले तरी त्यातील सुटसुटीतपणा जाऊन त्याला अधिकच गुंतागुंतीचे स्वरुप आले आहे. आमच्या लहानपणी गावातला दवाखाना घरापासून फार दूर नव्हता तरी क्षुल्लक दुखण्यासाठी तेथपर्यंत जाण्याचेही कष्ट न घेता घरात आज्जी किंवा आणखी कॉणी वडिलधारे माणूस कसला तरी पाला किंवा चाटण यांचा प्रयोग आमच्यावर करायचा व बहुधा त्याने आजार पळायचा. मी स्वत: व माझ्या लहान भावंडांनी बऱ्याच उंचावरून पडण्याचे प्रकार करून किंवा एकमेकाना ठोसाठोशी करून रक्तपात घडवून आणले असताना आमची सगळ्यात मोठी बहीण कोठूनतरी दगडीचा पाला नावाची वनस्पलि शोधून आणायची व ती ठेचून जखमेवर तिचा रस पिळून ती बांधून टाकायची व चार पाच दिवसात जखम अगदी पूर्ण बरी झालेली असायची

ताप फारच वाढला तर मात्र आम्हाला दवाखान्यात नेले जायचे. आमच्यासारखे काही बळीचे बकरे तेथे बसलेले असायचे. आपला नंबर आला की डॉक्टर जवळ बोलावून प्रथम ताप मोजायची नळी प्रथम जोराने झटकून

माझ्या तोंडात घालून थोडा वेळ ठेवायचे व त्या काळात पुढच्या रोग्याला काहीतरी प्रश्न विचारायचे. त्याचे उत्तर ऐकून माझ्या तोंडातील नळी काढून ताप पाहून आपल्या गळ्यातला स्टेथो माझ्या छातीवर टेकवायचे व एकादा दुसरा प्रश्न आमच्या बरोबर आलेल्या वडीलधाऱ्या माणसास विचारायचे व तेवढ्यावरच बहुधा आमच्या रोगाचे निदान होऊन समोरच्या टेबलावरील कागदावर आम्हाला वाचता न येणाऱ्या अक्षरात काहीतरी फर्कटून तो कागद त्यांच्याकडे द्यायचे व तो घेऊन दवाखान्याच्या एका कोपऱ्यातील खोलीच्या खिडकीतून ज्याचा फक्त चेहरा दिसत असे अश्या कंपाउंडर म्हणविआऱ्या व्यक्तीकडे तो कागद दिला जायचा त्यावरचे अगम्य लिखाण वाचून त्या व्यक्तीच्या खोलीतील टेबलावरील अनेक बाटल्यापैकी लाल किंवा पिवळा किंवा हिरवा द्रव आम्ही नेलेल्या बाटलीत भरून ती बाटली व त्याचबरोबर एकादा छोटा चमचा भरेल एवढे पांढऱ्या रंगाचे चूर्ण पांढऱ्या रंगाच्या छोट्या कागदावर टाकून अगदी यांत्रिक पद्धतीने त्याच्या पुड्या करून ते द्रव औषध व पुड्या ते कितीवेळा कसे घ्यायचे याच्या सूचनांसह आमच्या बरोबर आलेल्या वडीलधाऱ्या माणसाला दिले जायचे व तेथून आमची रवानगी घरी व्हायची.

आता दवाखाना हा प्रकार थोडासाच सुधारला आहे म्हणजे आता त्याला कन्सल्टिंग रूम म्हणतात आणि तेथे गेल्यावर डॉक्टर औषध देण्याच्या भानगडीत पडत नाही तर तपासणी करून गोळ्या अथवा द्रव औषधाचे नाव एका चिठ्ठीवर लिहून देतात व ते आपल्याला दवाखान्याच्या शेजारीच असणाऱ्या औषधाच्या दुकानातून घ्यावे लागते. जर तुमचा आजार

ठरवण्यासाठी डॉक्टरला काही तपासण्या कराव्या लागणार असतील तेथून आपली रवानगी पॅथॉलॉजिस्टकडे किंवा न्युरॉलॉजिस्ट किंवा अश्याच कुठल्यातरी तज्ञाकडे होते. तशी शक्यताच जास्त असते कारण रोग्याकडे पाहून किंवा त्याचे नाडीचे ठोके व ताप पाहून लगेच निर्णय घेणे ही गोष्ट कमीपणाची समजली जाते. .

अमेरिकेत तर त्यासाठी प्रथम तुमचा विमा उतरवला असायला हवा तरच डॉक्टराची भेट ठरवली जाणे शक्य असते तीही लगेच मिळेल असे नाही कधी कधी रोगी शेवटच्या घटका मोजत असला तरी डॉक्टर उपलब्ध होईलच याची खात्री नसते. त्यामुळे आम्ही जितक्या वेळा मुलाकडे गेलो त्या प्रत्येक वेळी पाच ते दहा लाखाचा(डॉलरचा रुपयांचा नव्हे) विमा उतरून मगच विमानात पाऊल ठेवतो आणि पुन्हा तरीही तेथे आजारी न पडण्याची दक्षता घेतो. आणि अश्या प्रकारे तो विमा काढण्यासाठी घालवलेले पन्नास साठ हजार रुपये वाया घालवतो आणि तरीही त्याबद्दल देवाचे (आणि त्या देशाचेही)आभार मानूनच परत येतो. आमच्या परिचितापैकी एकाचे वडील तेथे जाऊन आजारी पडले आणि त्यांना कृत्रिम श्वसन यंत्र(पेसमेकर) बसवावे लागले तर त्यांच्या उपचाराचे हप्ते त्यांच्या दुसऱ्या अमेरिका भेटीपर्यंत तो भरतच होता.

अमेरिकेत जाताना आमच्या नेहमीच्या आजाराच्या म्हणजे माझा उच्च रक्तदाब आणि सौ. चा डायबेटिस व शिवाय इतरही किरकोळ दुखणी अश्या गोळ्यांचा मोठा साठाच घेऊन जातो. पण कधी कधी साध्या दुखण्यासाठी औषधाच्या दुकानात सरळ सरळ नाव सांगितले की विकत मिळणाऱ्याही

गोळ्या तिथल्या औषधांच्या दुकानात मिळतात किंवा त्या ग्राहकाला स्वत:च निवडून घेता येईल अश्या पद्धतीने ठेवलेल्या असतात अश्या पद्धतीने घेतलेल्या टायनेलॉन या वेदनाशामकाच्या पाचशे गोळयांचे डबडे माझ्या मुलाकडे पडलेले असते..

सर्व प्रकारच्या दक्षता घेऊनही अमेरिकेत असताना एकदा मला सर्दी झालीच मला सर्दी झाली असे समजताच लगेच मुलाने ऑफिसमधून येतानाच सर्दीवरील अमेरिकेतील रामबाण इलाज असणाऱ्या गोळया आणल्या, व त्याने त्या काढून मला दिल्या त्या दिवसा वेगळया व रात्री वेगळया अश्या स्वरूपाच्या होत्या. दिवसाच्या डेक्विल व रात्रीच्या नाइक्विल. त्या गोळयांचा आकार पाहून मी एकदम सटपटलोच खरे तर गोळया सटकन गिळण्यात माझा हातखंडा आहे अशी माझी समजूत होती. नाहीतर बऱ्याच लोकांना गोळया गिळताच येत नाहीत आणि मग त्याना गोळीचे चूर्णच करून घ्यावे लागते अश्या लोकांना डेक्विल व नायक्विल म्हणजे रोगापेक्षा उपाय भयंकर म्हणावा लागेल कारण मीसुद्धा डेक्विल कशी बशी गिळली. त्या गोळया तुकडे करून किंवा भुकटी करून घेणेही शक्य नव्हते कारण पारदर्शक आवरणात द्रव औषध (लिक्विकॅप्सूल)असा त्या गोळयांचा प्रकार होता, त्यामुळे पूर्ण गोळी गिळणे हीच एक पद्धत वापरणे शक्य होते. रात्रीची गोळी नाइक्विल तर डॅक्विलपेक्षाही मोठी म्हणजे एकाद्या छोट्या पक्षाचे अंडे असावी तशी! तरी बराच मोठा घसा ताणून मी ती तोंडात सारली व पाण्याच्या घोटाबरोबर गिळण्याचा प्रयत्न केला पण गोळीचे आवरण गुळगुळीत असून व त्यावर पाण्याचा मोठा घोट घेऊनही

गोळी घशातून खाली उतरायला तयार नाही अशी परिस्थिती झाली बरं ती घश्याच्या इतकी आत गेलेली की बाहेर काढावी म्हटले तर तेही शक्य नाही अश्या प्रकारे रोग बरा होण्यासाठी घेतलेल्या गोळीमुळे बरा होण्याऐवजी गोळीने श्वास कोंडून मृत्यू पावणारा जगातील पहिला रुग्ण होण्याचा मान मला मिळून शिवाय ही गोष्ट अमेरिकेत घडल्याने हौडी मोदीसारखीच त्याला प्रसिद्धी मिळणार (आणि मरणोत्तर प्रसिद्धी मिळून मला त्याचा काय उपयोग हे आणखी वर दु:ख) की काय अशी भीती वाटू लागली. खरे म्हणजे बऱ्याच मोठ्या आकाराच्या कॅप्सूल घेण्याचा मला सराव होता तरीही ही कॅप्सूल मात्र रोगहारक न ठरता रुग्णसंहारक ठरणार की काय अशी भीती वाटू लागली. पण बऱ्याच प्रयत्नानंतर कशी बशी ती घश्यातून आत न जाता (कारण ती आशा मी सोडूनच दिली होती)बाहेर पडली व गोळीपेक्षा सर्दी परवडली असा विचार करून मी ती गोळी घ्यायची नाही असे ठरवले व गोळीच्या तावडीतून माझी सुटका करून घेतली.

, नंतर जालावर शोध घेतला असता नाइक्विल आणि तत्सम कॅप्सूल्स गिळण्याविषयी अनेक लोकांनी आपले अनुभव नॉंदवलेले दिसले. त्यात एका प्रकारात गोळी मान वर करून कशी घ्यावी; अगदी ती गोळी ओठावर कोठे ठेवावी व मानेचा कोन कसा करून पाण्याची बाटलीच तोंडाला लावून घोट कसा घ्यावा इतक्या बारिकसारिक सूचनाही त्यात होत्या तर दुसऱ्या प्रकारात मान खाली करूनही अशीच अगदी सुलभतेने गोळी कशी गिळली जाते याचे आकृतीसह वर्णन केलेले आढळले. यावरून ही समस्या केवळ माझ्यापुरतीच

मर्यादित नसून त्याला जागतिक परिमाण आहे हे ध्यानात आले. इतक्या मोठ्या आकाराची लिक्विकॅप्सूल केल्याबद्दल बऱ्याच लोकांनी खास अमेरिकन थाटात कंपनीला शिव्या मोजल्या आहेत असेही दिसले (एका गृहस्थाने तर अगदी वैतागून ही गोळी (शरीराच्या वरील द्वारातून न घेता खालील द्वारातून घ्यावी की काय असाही प्रश्न केला आहे ) तरी कंपनीने एक मोठी गोळी करण्या ऐवजी छोट्या दोन गोळया का केल्या नाहीत समजत नाहीत. या गोष्टीला दोन वर्षे झाली आता कंपनीने कॅप्सूलच्या ऐवजी साध्या गोळया ज्यांचे तुकडे करता येतील किंवा चूर्ण करता येईल अश्या तयार करायला सुरवात केली असून. तेच औषध द्र्वरूपातही उपलब्ध केले आहे असे समजते. एकूण रुग्णग्राहकांच्या टीकेचा परीणाम औषध उत्पादक कंपनीवर झाला म्हणायचा!

# ११. औषध नलगे मजला!

नलाच्या विरहामुळे आजारी पडलेल्या दमयंतीला औषधाची विचारणा केली असता तिने "औषध नलगे मजला" असे उत्तर दिले त्यावरून इतरांनी "तिला औषध नको ( न लगे )"असा अर्थ काढला तर खरे पहाता तिच्या मनातून "मला नल हेच औषध(नल गे)" असे तिला म्हणायचे होते असा श्लेष मोरोपंतांनी काढला आहे "औषध नल गे मजला " हे दमयन्तीने वेगळ्या संदर्भात म्हटले असले तरी निरोगी जीवनासाठी "औषध न लगे मजला" हाच मंत्र प्रत्येकाने शक्यतो जपायला हवा कारण औषधांचे रोगहारक सुपरिणाम होतात तसेच नकळत त्यांचे दुष्परिणामही होतात व ते आपल्याला लवकर कळत नाहीत असे माझे काही अनुभव सांगतात. याचा अनुभव सगळयांनाच आला असणार. योग्य प्रमाणात आणखी निकडीच्या वेळी औषध घेणे आवश्यक आहेच पण अगदी सहजपणे उपलब्ध आहे म्हणून सरसकट औषधांचा वापर करणे योग्य नाही. तशी संवय बऱ्याच जणांना असते यासाठी ही सूचना!

आजच्या काळात आणि पूर्वीही "मला औषध नको " असे लहान मुलांच्या तोंडून अनेक वेळा ऐकायला मिळायचे व मिळते कारण गोळी गिळणे त्यांना अवघड जात असल्याने तिची पूड करून घ्यावी लागते आणि मग तिची कडू चव त्यांना नको वाटते त्यानंतर चॉकलेटच्या गोळीचे आमीष दाखवून

त्यांना औषध घ्यायला लावावे लागते. बऱ्याच मोठ्या व्यक्तींनाही औषधाची गोळी गिळणे कठीण वाटते आणि मग तिची पूड करून घशात लोटावी लागते, पण त्यांना मात्र त्या कडू चवीमुळे "औषध नलगे मजला "म्हणण्याची सोय नसते.

आमच्या लहानपणी आजच्याइतका औषधी गोळयांचा सुळसुळाट झाला नव्हता. कोणी आजारी पडले तर गावातल्या दवाखान्यात औषधासाठी बाटली घेऊन जावे लागे. डॉक्टर " काय होतेय?"असे बरोबरच्या वडीलधाऱ्या व्यक्तीस विचारत व नंतर जवळच्या खुर्चीवर बसवून छातीवर स्टेथो चिकटवून पहात आणि मनगटावर आंगठ्याने दाब देत नाडीचे ठोके मोजत आणि नंतर समोरच्या गठ्ठ्यातील एका पानावर त्यांच्या अगम्य अक्षरात काहीतरी लिहून आमच्या हातात तो कागद देत. तेथून आम्ही उजव्या बाजूला असणाऱ्या खिडकीतून फक्त ज्याचे डोके दिसत असे त्या कंपाउंडरच्या खोलीत जाऊन त्याच्या हातात तो कागद देत असू तो पाहून लगेच आम्ही नेलेल्या त्या बाटलीत निरनिराळया मोठ्या बाटल्यात भरून ठेवलेले निरनिराळया रंगाचे द्रव वेगवेगळया प्रमाणात भरून ती बाटली हलवून त्यांचे मिश्रण व्यवस्थित झाले हे पाहून ते त्या बाटलीवर एक कागदाची उभी पट्टी चिकटवून देत त्या पट्टीवर केलेल्या भागामुळे प्रत्येक वेळी त्या द्रवाचा किती भाग घ्यायचा हे कळत असे. गोळया बहुधा नसतच त्या ऐवजी पूडच मिळे व त्याच्या छोट्या छोट्या पुड्या करून देत. मग त्यातली पूड मधात कालवून चाटावी लागे.

त्या वेळी सगळ्या रोगावर औषध मिळायचेच असे नाही. दाढदुखीचा त्रास मला होई तसा माझ्या आईलाही होई पण त्यावर काही औषध दवाखान्यात मिळत नसे, स्वतंत्र दंतवैद्य गावात नव्हता त्यामुळे दाढदुखीवर औषध म्हणजे दाढ काढणे तेवढेच फक्त दवाखान्यात होत असे. त्यामुळे बहुधा लवंग तेल किंवा असेच काही तरी दुखऱ्या दातावर लावून दाढदुखी थांबण्याची वाट पहाणेच नशिबी असायचे. पण मी महाविद्यालयीन शिक्षणासाठी पुण्यास येईपर्यंत या परिस्थितीत बरीच सुधारणा झाली होती म्हणजे आता गोळ्या सर्रास मिळू लागल्या होत्या व त्यावेळी कोडोपायरीन ( अलीकडील डिस्प्रीन) ही वेदनाशामक गोळी घेतली की माझी दाढ दुखी थांबायची आणि ती मी अगदी दाढदुखी थांबेपर्यंत घ्यायचो.

त्यानंतर पुढे आमच्या मुलांच्या लहानपणी नेहमीच उद्भवणाऱ्या आजाराला तोंड देण्यासाठी आमच्या फॅमिली डॉक्टरनी माझ्या सौभाग्यवतीला सांगूनच ठेवले होते तापासाठी प्रथम क्रोसीन किंवा तत्सम गोळ्या द्यायच्या आणि एक दोन दिवसात बरे वाटले नाही तरच त्यांच्याकडे जायचे कारण माझा एक वर्षाचा मुलगा त्यांच्या दवाखान्यात मोठ्याने रडून सर्व वाट पहाणाऱ्या इतर रुग्णांचा ताप आणखीनच वाढवायचा, शिवाय डॉक्टरांनाही रुग्णाची तपासणी करणे अवघड व्हायचे त्यामुळे आम्हाला बहुधा किरकोळ आजारासाठी करावयाची उपाययोजना माहीतच झाली होती व नंतर भाऊच डॉक्टर झाल्यामुळे ताबडतोब उपाययोजना होत असे पण त्याची पद्धत ही अशीच ठरलेली असायची.

आजच्या काळात बहुधा काही औषधे सर्वांना माहीत असावी अशी अपेक्षा असते आणि त्यामुळे डॉक्टर ताबडतोब उपलब्ध नसल्यास प्राथमिक उपाययोजना आपण करू शकतो. अमेरिकेत जातानाही आम्ही क्रोसिन, एव्हिल, लोमोटील अशी औषधे बरोबर घेऊनच जातो, कारण तेथे बरीच औषधे डॉक्टरच्या चिठ्ठीशिवाय मिळत नाहीत, जी तशी मिळतात त्यांचे over the counter असे वर्गीकरण असते व ती कुठल्याही औषधाच्या दुकानात मांडूनच ठेवलेली असतात. पण त्यांची नावे आपल्याला माहीत असणे आवश्यक असते शिवाय भारतात अगदी स्वस्त मिळणारे औषध तेथे खूपच महाग मिळते. उदा एविल (Avil )भारतात अगदी २० पैशात मिळणारी गोळी घ्यायला मला पाच सहा रुपये (त्यावेळच्या विनिमय दरानुसार १० सेंट म्हणजे अमेरिकेतील भावाने स्वस्तच) मोजावे लागले. त्यामुळे आमच्या बी. पी. मधुमेह या विशिष्ट रोगावरील गोळ्या तर आम्ही नेतोच पण सर्वसाधारण गोळ्यांचाही भरपूर साठा घेऊन जातो.

काही वेळा मात्र औषधाऐवजी काही इतरच युक्तीचा वापर करावा लागला. रात्री आमची सगळ्यांची जेवणे चालली होती अगदी मजेत आणि अचानक एका पापडाचा कडक तुकडा सूनबाईच्या घशात अडकला आणि तो बाहेर येईना की पोटात जाईना आणि घशात तो जणु रुतून बसला आणि तिला तीव्र वेदना होऊ लागल्या. काय करावे कोणलाच काही सुचेना अश्या वेळी केळ खावे असे वाचल्याचे मला आठवले. घरात केळही नव्हते पण सुदैवाने त्यावेळी एक मॉल अगदी घराजवळ होते आणि ते रात्री २ वाजेपर्यंत उघडे असे

त्यामुळे मुलाने तडक जाऊन केळी आणली आणि त्याचे दोन घास जाताच पापडाचा तुकडा पोटात जाऊन सूनबाईचा त्रास एकदम नष्टच झाला. तोवर मी माझ्या डॉक्टर भावालाही फोन लावला होता व त्यानेही हाच उपाय सांगितला.

भारतात असतानाही प्रत्येक औषध आपण डॉक्टरच्या सल्ल्यानेच घेतो असे नाही. मला मलावरोधाचा त्रास असल्याने मी त्यावर वेगवेगळे उपाय करून बघत असे शेवटी धौतियोग हे औषध मला बऱ्याच प्रमाणात लागू पडले आणि त्याचा प्रयोग मी दोन तीन वर्षे केला. अमेरिकेस जातानाही मला दोन तीन बाटल्या घेऊन जाव्या लागत. त्यानंतर इतर काही कारणासाठी डॉक्टर भावाकडे गेल्यावर रक्ताची तपासणी सहज करायची म्हणून केली तर तपासणी करणारा डॉक्टर त्याचा मित्रच असल्यामुळे त्याने "तुझ्या भावाच्या रक्तात बी १२ फारच कमी असे सांगितल्यावर भावाने मला बी १२ ची इंजेक्शन्स घ्यायला लागतील असे सांगितले. त्याच दिवशी रात्री मी धौतियोग घेत असताना त्याने मी काय घेतो हे विचारले मी ते धौतियोग आहे जे सांगितल्यावर एकदम तो म्हणला, "मग बरोबर आहे त्याच्यामुळेच बी १२ एकदम कमी झाले " ते घेणे ताबडतोब बंद करायला सांगितले आणि नंतर इंजेक्शन्स न घेता त्यासाठी पावडर दुधातून घ्यायला सांगितली व धौतियोग बंद करून तो उपाय काही दिवस केल्यावर माझे रक्तातील बी१२ चे प्रमाण सुधारले पण त्यामुळे त्यानंतर मलावरोधावरील औषध घेताना त्याला विचारूनच घेऊ लागलो. अमेरिकेत पुढया वेळी मित्रमंडळीत चर्चा करताना धौती योगचा हा अनुभव त्यातील इतर काहीजणांनीही सांगितला.

कधी कधी डॉक्टर्सनाही औषधाच्या अश्या अन्य परिणामांची कल्पना नसते आणि रोग्याने स्वत:ही त्याविषयी दक्ष रहायला हवे याचाही अनुभव आम्हाला आला. अमेरिकेत जाण्याच्या वेळी तपासणी करताना माझ्या सौ. ला मधुमेह निघाला त्यानंतर रक्तातील शर्करा प्रमाण योग्य तेच राखण्यासाठी नियमित औषधांचा वापर करणे हे ओघाने आलेच. सुरवातीच्या काळात सेमिडायोनिल व ग्लासिफेस या गोळयांनी ते प्रमाण योग्य राहिले पण पुढे ते वाढू लागल्यामुळे सेमिडायोनिलची जागा डायोनिलने घेतली. त्यानंतर ते मर्यादेत रहाण्यासाठी जानुमेटचा वापर करावा लागू लागला. त्याच काळात सांधेदुखीसाठी प्रिगॅबलिन ही गोळी घेण्याची सूचना भावाने दिली. त्यानंतर एकदोनदा ती चक्कर येऊन पडली सुदैवाने घसरून पडताना फारशी दुखापत झाली नाही, पण एकदा झोपेतच बिछान्यावरून ती घसरून खाली पडली हे कसे झाले हेही तिला कळले नाही. त्यामुळे कमरेला थोडी दुखापत झाली मात्र हाडे मोडली नाहीत. पण असे का व्हावे याचा शोध घेता प्रिगॅब्लिनचा हा सहपरिणाम आहे असे शोध घेतल्यावर आढळून आले. त्या कालात जानुमेटचे प्रमाणही वाढवले होते, पण तसा त्याचा परिणाम नाही हे समजले पण त्यानंतर प्रिगॅब्लिन बंद केल्यावर थोड्याच दिवसात तिला अतिसाराचा त्रास होऊ लागला आणि बराच विचार केला असता हा जानुमेटचा परिणाम आहे असे जाणवले व त्याचे प्रमाण कमी केले. त्यापूर्वी हा त्रास न होण्याचे कारण त्यावेळी प्रिगॅबलिन चालू होते व त्याचा सहपरिणाम मलावरोधाचा आहे असे दिसून आले. थोडक्यात औषधांचा उपायाबरोबर होणारा अपाय काय आहे हे रोग्यानेही विचारपूर्वक शोधणे आवश्यक आहे असे दिसून आले. येथे उपाय सुचवणारा डॉक्टर खुद्द

माझा भाऊच होता हे विशेष! आता आंतरजालावर औषधाविषयी माहिति सहज उपलब्ध होते तरी "मी नाही त्यातली/ला" म्हणणाऱ्यांनीही त्या माहितीचा उपयोग करून घ्यावा.

कधी कधी अचानक कोठले तरीच औषध लागू पडते हेही निदर्शनास येते. तसा अनुभव मला एकदा अमेरिकेत असताना आला. माझी दाढदुखी अलीकडे उद्भवली नव्हती त्यामुळे मी त्याविषयी बेफिकीर होतो. अमेरिकेत व भारतातही शक्य तो मी थंड पेये विशेषत: कोका कोला घेणे टाळतो पण त्यादिवशी सर्वांच्याबरोबर तो घेण्याचा मोह झाला आणि पहिल्याच घोटाबरोबर दाढेतून तीव्र कळ आली आणि पुढचा घोटही घेणे अशक्य झाले. त्यानंतर दाढेचा ठणका इतका तीव्र होता की आम्ही बाहेर जाणार होतो ते मला बरोबर न घेताच जावे असे ठरले. त्यनंतर सौ. कडे होमिओपथीच्या गोळया होत्या त्यातील एक पेनकिलर म्हणून दिली होती ती तिने "ही घेऊन पहा" म्हणून मला दिली

माझा होमिओपॅथीवर विश्वास फारच कमी आहे तरी अडला नारायण म्हणून ती गोळी मी तोंडात ठेवली व थोड्याच वेळात दाढेचा ठणका पूर्ण थांबला व मी आनंदाने बाहेर पडू शकलो.

हा माझा अनुभव हा कदाचित योगायोग असेल असा समज काही दिवस माझ्या मनात होता. पण त्यानंतर सौ. चा भाचा अमेरिकेतच आहे तो सपत्निक आमच्याकडे आला. नेहमी बडबड करणारा तो अगदी गप्प गप्प होता त्याचे कारण त्याला विचारले तर आपली दाढ खूप ठणकते आहे असे कारण त्याने

दिले लगेच मी त्यालाही परवा माझ्यावर यशस्वी झालेली गोळी देण्याची सूचना सौ. ला केली अर्थात तिला माझ्या सूचनेची आवश्यकता होती अशातला भाग नाही. तिने लगेच तिचा बटवा उघडून त्या गोळीचा प्रयोग त्याच्यावर केला आणि आश्चर्याची गोष्ट म्हणजे अगदी ताबडतोब त्याच्या चेहऱ्यावर हास्य दिसू लागले आणि त्याची बडबड सुरू झाली अर्थात त्याचाच अर्थ गोळीने आपली जादू केली होती हे उघडच आहे नंतर जेवणावरही त्याने ताव मारला. जाताना तो थोड्या गोळ्या बरोबरही घेऊन गेला,

कधी कधी डॉक्टरचा सल्ला व आपला अनुभव यांचा सुवर्णमध्य साधावा लागतो. मला उच्च रक्तदाबाचा त्रास असल्याने काही पेन किलर्स उदा. व्हॉवेरॉन, नाल्जिस (Nalgis) घेऊ नयेत असा सल्ला माझ्या भावाने मला दिला होता. पण माझ्या दातांचे रूट कॅनाल करताना दंतवैद्याने नाल्जिसचीच शिफारस केली होती व त्याला मी माझी अडचण सांगितल्यावर त्याने अशा वेळी घेण्यास हरकत नाही असे सांगितले. अमेरिकेला जाण्यापूर्वी माझे दात बरेच सुस्थितीत आल्यामुळे ती गोळी अमेरिकेत जाताना मी नेली नव्हती पण त्यामुळे होमिओपॅथीच्या गोळीचा शोध लागला. पण घरातील डॉक्टरच्या सल्ल्याविरुद्ध जावून मी नाल्जिसची गोळी जवळ बाळगल्याचा फायदा एकदा माझ्या मित्राला झाला. तो औरंगाबादहून मला सहकुटुंब भेटायला आला पण आल्यापासून अगदी गप्प त्यामुळे मला आश्चर्य वाटले शेवटी न राहवून मी विचारलेच त्यावर त्याने आपल्या गालावर हात ठेवीत आपली दाढ प्रचंड दुखते असे सांगितले त्यावेळी माझ्यकडे नाल्जिसची गोळी होती व माझ्या मित्राला

बी. पी. नाही हे मला माहीत होते त्यामुळे मी त्याला एक गोळी पाण्यात विरघळवून दिली व पंधरा मिनिटातच तो घडाघडा बोलू लागला.

नाक चोंदणे ही तक्रार बऱ्याच जणांच्या बाबतीत आढळून येते. आमच्या लहानपणी ती तक्रार माझी स्वत:ची होती व त्यावर उपाय म्हणजे तोंडाने श्वास घेणे हाच होता. मोठेपणी नाकात घालायच्या ड्रॉप्सची माहिती झाल्यावर बरीच वर्षे त्यांचा वापर मी करत असे, पण त्यामुळे नाक चोंदणे बंद झाले नाही फक्त ते ड्रॉप्स घातले की नाक मोकळे व्हायचे. त्यामुळे त्या ड्रॉप्सच्या इतक्या बाटल्या लागायला लागल्या की आमच्या घरात त्यांची अगदी माळ तयार झाली. वर्गात शिकवायला जाण्यापूर्वी पुण्याच्या कॉलेजमध्ये आमचे एक प्रोफेसर सिगरेटचा शेवटचा झुरका ओढून ती फेकून देत वर्गात प्रवेश करीत, तसे मला नाकात ड्रॉप्स टाकून वर्गात प्रवेश करावा लागे नाहीतर वर्गात बोलणे अशक्य व्हायचे. माझ्याबरोवर माझ्या एका मित्रालाही हा त्रास होत असे. पुढे एका आयुर्वेदतीर्थ डॉक्टरांनी त्यावर सूत्रनेती हा उपाय सांगितला. तसा तो उपाय कष्टप्रदच होता पण त्यामुळे ड्रॉप्सचा वापर जवळ जवळ बंद झाला. पुढे जलनेती हाही उपाय सापडला व तो सूत्रनेतीपेक्षा कमी कष्टप्रद आहे असे आढळून आले. ड्रॉप्सच्या वापराने नाक चोंदणे बरे होत नाही उलट त्याचा बराच वाईट परिणाम श्वसन संस्थेवर होतो असे आमच्या मित्रमंडळातील एकाने अनुभवांती सांगितले. व माझेही मत अनुभवांती तेच झाले आहे.

सध्या वातावरणातील प्रदूषणामुळे प्रत्येकाचेच आरोग्य धोक्यात आलेले असल्यामुळे त्यासाठी आपली रोगप्रतिकारक शक्ती वाढवणेच आवश्यक आहे

व त्यासाठी सकाळी उठल्यावर गरम पाण्याच्या गुळण्या व नंतर मध लिंबू, तुलसी अर्क गरम पाण्यात मिसळून ते गरम पाणी एक पेलाभर दररोज घेतल्यास प्रतिकारशक्ती वाढते. कोणत्याही प्रकारे (धौतियोग सोडून) पोट साफ राखणे ही गोष्ट फार महत्त्वाची आहे, त्यासाठी सुखसारक वटी व त्रिफळा चूर्ण यांचा वापर मला लागू पडला आहे. या गोष्टी पाळल्यास "औषध नलगे मजला" म्हणणे शक्य होईल असे वाटते.

( हा लेख लिहिण्याचा उद्देश आपल्या अनुभवाचा इतरांना फायदा व्हावा असा आहे! कारण आता उरलो उपकारापुरता )

# १२. संस्कृत दिनाच्या निमित्ताने!

भारतीय परंपरेत नारळीपौर्णिमा हा पवित्र दिवस आहे. रक्षाबंधनाचा म्हणजे भाऊ बहीण या नात्याच्या सन्मानाचाही दिवस आहे. तो जसा रक्षाबंधन म्हणून ओळखला जातो तसाच अलिकडे "संस्कृत दिन" म्हणूनही ओळखला जाऊ लागला आहे,

श्रावणातली पौर्णिमा हा संस्कृत दिन म्हणून पाळला जातो. ही प्रथा वेदकाळी नव्हती कारण त्यावेळी निदान भारतात तरी सर्व किंवा बरेच लोक संस्कृत भाषाच बोलत असावेत, पण आता मात्र संस्कृत बोलणाऱ्या लोकांची संख्या कमी होत असल्यामुळे आपल्या त्या संस्कृतीची ओळख राहावी म्हणून हा दिन पाळावा असा आदेश १९६९ मध्ये जारी करण्यात आला. श्रावण पौर्णिमा हा दिवस ठरवण्याचे कारण असे सांगण्यात आले की त्या दिवशी प्राचीन भारतात शिक्षण सत्र सुरू होत असे.

संस्कृत भाषा हा विषय आमच्या अभ्यासक्रमात होता. त्यावेळी आठवी ते अकरावी ही चार वर्षे तो शिकावा लागे. पण बऱ्याच विद्यार्थ्यांना तो अवघड वाटे त्यामुळे मध्ये काही काळ त्याला वैकल्पिक विषय करण्यात आले. माझ्या मुलांच्या काळात संस्कृत पूर्ण (१००) किंवा हिंदी(५०) संस्कृत(५०) असे विकल्प होते पण त्या काळात मी औरंगाबादला असताना त्याच्या शाळेत पूर्ण

संस्कृत शिकवण्याची सोय नव्हती त्यामुळे माझ्या मोठ्या मुलाला हिंदी संस्कृत असेच घ्यावे लागले. मी शाळेत जाऊन माझ्या मुलाची पूर्ण संस्कृतची तयारी करून घेतो असे सांगितल्यावर त्यासही शाळेव्ह्या व्यवस्थापनाची तयारी नव्हती व त्याला त्यानी दिलेले कारण मजेशीर होते ते म्हणाले, "मग हिंदीच्या तासाला तो काय करणार?" त्या काळात तो हिंदी शिकला असता तर माझी काही हरकत नव्हती पण त्यासही त्यांची हरकत होती असे दिसले व शेवटी त्याला संस्कृत पूर्ण घेता आले नाही. धाकट्या मुलाच्या वेळी मात्र पूर्ण संस्कृत मुलांना अधिक गुण मिळवून देण्यास सहाय्यक होतो व त्यामुळे आपले अधिक विद्यार्थी उच्च गुणांसह उत्तीर्ण होऊ शकतात याची कल्पना शाळेस आली असावी किंवा शाळेतील हिंदीए प्राध्यालक निवृत्त झाले असावेत, त्यामुळे त्याला मात्र पूर्ण संस्कृत घेता आले.

सध्या संस्कृत विषय अभ्यासक्रमात आठवी ते दहावी या तीन वर्षात आहे आणि बहुतेक विद्यार्थी कमी लिहून जास्त गुण मिळवण्याचा विषय म्हणून त्याच्याकडे बघतात आणि दहावीनंतर त्याकडे ढुंकूनही पहात नाहीत याला फक्त संस्कृत विषयात पदवी व पदव्युत्तर शिक्षण घेणारे विद्यार्थी अपवाद. त्यांच्यापैकीही किती जणांना अस्खलित संस्कृत बोलता अगर लिहिता येईल याविषयी शंकाच आहे. प्रयत्न केल्यास ते शक्य आहे पण तशी आवश्यकता व रुची या दोनही गोष्टींचा अभावच दिसतो.

भारतास स्वातंत्र्य मिळाल्यावर राष्ट्रभाषा कोणती भाषा करावी या विषयावर तज्ञांची मते विचारात घेता संस्कृत हीही भाषा सुचवली गेली होती.

११ सेप्टेम्बर १९४९ या दिवशी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी असा ठराव मांडला होता व त्यास डॉ. बाळकृष्ण भगवंत केसकर व निझामुद्दिन अहमद यांनी पाठींबा दर्शवला होता. द. भारतातील अकरा संसद सभासदांनीही मान्यता दिली होती. त्यांच्या मते संस्कृत भाषा एक मूळ भारतीय भाषा आहे जी सर्व भारतीय एका काळी बोलत होते. हिंदीवर जसा द. भारतीयांनी बहिष्कार टाकला (व अजूनही त्रिभाषासूत्रीचा अंगिकार त्यानी केलेला नाही, )तसा बहिष्कार टाकण्याचे कोणालाच कारण नव्हते. संस्कृत ही समजायला व वापरायला अवघड भाषा आहे असे सर्वसामान्य लोकांना वाटले असते पण इस्रायलने हिब्रू भाषेचा राष्ट्रभाषा म्हणून स्वीकार केल्यावर त्या भाषेत सर्व आवश्यक साहित्य निर्मिती केली तसेच संस्कृतचे झालेही असते. अर्थात ही जर तरची भाषा झाली.

मराठी भाषेत मला जाणवलेली उणीव जी संस्कृत भाषेचा वापर करूनच पूर्ण होते ती म्हणजे शब्दाची जोडणी व रूपांतर करण्याची सोय. इंग्रजी भाषेत ती उणीव नाही त्या भाषेत अनेक प्रकारचे जोडशब्द व रूपांतरित शब्द करता येतात पण मराठीत विशेषत: तांत्रिक लिखाण करताना मला ती उणीव फारच भासली व त्यासाठी संस्कृत भाषेचाच आधार घ्यावा लागला. १९६० मध्ये मराठीत अर्थशास्त्राचा अभ्यास करताना अनेक कल्पना व्यक्त करणे संस्कृतमध्येच उदा उपभोक्त्याचे उपभोगाधिक्य (Consumer’s surplus) शक्य आहे असे दिसले. स्वातंत्र्यवीर सावरकरांनी सुचविलेले इंग्रजी साठीचे प्रतिशब्द अभियंता, दिग्दर्शक, महानगर, नगरसेवक, वगैरे सर्व संस्कृत भाषेतूनच घ्यावे लागले व ते नंतर सर्वसामान्य जनतेनेही व्यवस्थित स्वीकारले. अगदी

तुकाराम, चोखामेळा अश्या संस्कृत भाषेचा गंध नसणाऱ्या संतांच्या अभंगात संस्कृतप्रचुर शब्दांचा वापर दिसतो. आता उलटी गंगा सुरू झाली आहे म्हणजे संस्कृत तर सोडाच पण आपल्याच मराठी भाषेतही छोट्या छोट्या कल्पना आपल्याला व्यक्तच करता येत नाहीत आणि त्यासाठी इंग्रजीची मदत घेणे अधिक सोयिस्कर वाटू लागले आहे.

कोणतीही भाषा शिकणे हे आवड, आवश्यकता व निकड यावर अवलंबून आहे त्यापैकी आवड हा मुद्दा विचारात घेतला असता कोणतीही भाषा शिकावी ही आवड फारच कमी लोकांना असते त्यामुळेच महाविद्यालयीन शिक्षणात भाषेचा अभ्यासक्रम फारच कमी विद्यार्थी निवडतात. व काही वेळा अनिवार्य विषय असतानाही काहीतरी थातुरमातुर अभ्यास करून त्यात उत्तीर्ण होतात. माझा नातू तर याचा पुढे काही उपयोग नाही तर त्याचा अभ्यासच कशाला करायचा असे म्हणतो. शिक्षणाचा इतका मर्यादित विचार करायचा नसतो हे त्याला पटवणे मला जमले नाही.

संस्कृतप्रमाणेच इतरही भाषादिन आहेत का याचा शोध घेतल्यावर आपल्या मराठीचा दिन कुसुमाग्रजांचे निधन १९९९ मध्ये झाल्यावर म्हणजे २००० सालापासून सुरू झाला. कुसुमाग्रजांनी मराठीची दीनवाणी अवस्था मांडण्यात पुढाकार घेतल्यामुळे असेक कदाचित! म्हणजे भाषा दीन झाल्यावर असे "दिन " करायची पाळी येत असावी का?तरी त्या अगोदर माधव ज्यूलियन व अलीकडे सुरेश वैद्य यांनी अतिशय जोरकस काव्यात मराठीचे थोरपण वर्णन केले आहे.

इतर भाषांपैकी उडिया भाषा दिन मार्च ११ या दिवशी साजरा करण्याचे ओरिसा शासनाने २०१५ पासून ठरवले आहे. पूर्व बंगाल आताचा बांगला देश)ज्यावेळी पाकिस्तानात असल्यामुळे उर्दूच फक्त राष्ट्रभाषा असा फतवा निघाल्यावर त्याला पूर्व बंगालमधील जनतेने मोठ्या प्रमाणात विरोध केला व २१ फेब्रुआरी या दिवशी अनेक जणांना हौतात्म्य पत्करावे लागले या पार्श्वभूमीवर तो दिवस "बंगाली भाषा दिन" किंवा मातृभाषा दिन किंवा भाषा हुतात्मा दिन म्हणून साजरा करतात. मलयालम दिन १ नोवेम्बर, पंजाबिदा बोलि दिवस २३ फ़ेब्रुआरी, उडिया भाषा दिवस ११ मार्च, आसामी भाषा दिवस १९ मे यासही बंगालीसारखाच इतिहास आहे अशी माहिती जालावर उपलब्ध आहे.

गुजराथी भाषा दिन २३ ऑगस्ट या दिवशी आहे. खरे तर असा दिवस साजरा करण्याचे कारण कळत नाही कारण गुजराती जेथे जातील तेथील भाषा गुजरातीच आहे अश्या पद्धतीने वागतात. मला अमेरिकेत कोणी गुजराती बोलणारा भेटला तर सुरवात, "सूं छे?" नच करत असे. याबाबतीत एका गुजराथी जोडप्याची माहिती वाचून मोठे कौतुक वाटले. राजकोट येथील गौरव पन्डित आणि त्याची पत्नी हे ते जोडपे! गौरवने नडियादमध्ये केमिकल इंजिनिअरिंगची पदवी तर शीतलने कम्प्यूटर ऍप्लिकेशनमधील पदवी त्याच महाविद्यालयात घेतली होते व त्याच काळात परस्परांवर अनुरक्त होऊन त्यांनी विवाह केला होता. त्यांना कन्यारत्न प्राप्त झाल्यावर ती आठ महिन्याची होताच त्यांनी गोल्डमन साक्समधील लठ्ठ पगारच्या नोकऱ्या १५ वर्षाच्या

कार्यकालानंतर सोडून आपल्या आठ महिन्याच्या ताशीला(ताशी तिचे नाव)आपली भाषा शिकता यावी म्हणून आपल्या जन्मग्रामी २०१५ साली भावनगर मध्ये येऊन राहिले व अठरा महिने राहून परत गेले. या काळात तिला सर्व गुजराती परंपरा व भाषा यांचे बाळकडू मिळेल अशी योजना त्यानी केली. आता ते परत अमेरिकेत स्थायिक झाले आहेत.

या जोडप्याला माझे स्वतःचे दोन अनुभव सांगण्यासारखे आहेत. माझा भाचा अमेरिकेतच आहे व त्यालाही एक मुलगी आहे. तिचा जन्म तेथेच झाला. त्यानंतर सतत मराठी ते बोलतात आणि मराठी संस्कार तिच्यावर करतात त्यामुळे ती भारतात येते तेव्हां आमच्याशी अस्खलित मराठीत बोलते. याउलट माझा भारतात जन्मलेला नातू चार वर्षाचा असताना माझ्या मुलास अमेरिकेत जावे लागले. जाण्यापूर्वी हा नातू अस्खलित मराठी बोलत असे. अमेरिकेतही शाळेत जाऊ लागण्यापूर्वीही त्याचे संभाषण मराठीतच चाले पण शाळेत जाऊ लागताच त्याला तेथे व्यक्त होणे सोपे जावे म्हणून मुलाने त्याच्याशी इंग्रजीत बोलायला सुरवात केली आणि काही दिवसांनी तो मराठी बोलणे विसरूनच गेला. म्हणजे आम्ही दोन वर्षानंतर अमेरिकेत गेल्यावर तो आमच्याशीही मराठीत न बोलता इंग्रजीतच बोलू लागला. ती त्याची संवय मोठ्या कष्टाने घालवावी लागली. आता भारतात परत आल्यावर मात्र तो मराठी चांगले बोलू लागला हे आमचे भाग्य! याउलट अमेरिकेत जन्मलेला त्याचा धाकटा भाऊ चार वर्षाचा असताना परत भारतात आल्यामुळे मराठी अस्खलित बोलतो.

# १३. स्वान्त सुखाय!

आजकाल कुठलीही छोटी गोष्ट केली की लगेच ती फेसबुकवर किंवा व्हॉट्सऍपवर टाकण्यात येऊन त्यावर "लाइक्स"चा पाउस पडला की टाकणाऱ्याला धन्य होते. तीच गोष्ट वाढदिवस किंवा कुठल्याही समारंभाची. परवाच कुणीशी आत्महत्या करण्यापूर्वीही फेसबुकवर टाकलेल्या संदेशालाही "लाइक्स " आले होते. म्हणे! आणि कदाचित ते पाहून त्या व्यक्तीचा आत्महत्या करण्याचा विचार अधिक ठाम झाला असावा! अश्या जमान्यात केवळ स्वान्तसुखाय निर्मितीचा आनंद घेणे ही गोष्ट अगदी विरळाच!

एमिली डिकिन्सन या कवियित्रीविषयी मला असेच अचानक वाचायला मिळाले. कविता हा माझ्या फार आवडीचा प्रांत नाही. केशवसुत, कुसुमाग्रज, सुरेश भट, ग्रेस अश्या जुन्या व त्यामानाने अलिकडील म्हणता येणाऱ्या काही कवींचा व पाठ्यपुस्तकामुळे व मंगेशकर भावंडांमुळे व भावगीत प्रकारामुळे तांबे, पाडगांवकर यांचा परिचय! पण मुद्दाम काव्यवाचनच करावयाचे या दृष्टीने कवितांचे पुस्तक घेऊन मी बसत नाही. त्यामुळे एमिली डिकिन्सनचा अचानक शोधच लागला अस म्हणावे लागेल. मार्च २०११ मध्ये कुसुमाग्रज प्रतिष्ठानतर्फे देण्यात येणारा जनस्थान पुरस्कार स्वीकारताना श्री. महेश एलकुंचवार यांनी केलेल्या भाषणात " एकांत साधनेविषयी मी बोलतोय तेव्हां एमिलीची आठवण होते. या बाईने जन्मभर कविता लिहिल्या आणि एकही कविता प्रसिद्ध केली

नाही. (प्रत्यक्षात तिच्या १०-१२ कविता प्रकाशित झाल्या होत्या ) वयाच्या ५२ व्या वर्षी ती गेली तेव्हां तिच्या कविता कुठे कपाटाच्या खनात, गादीखाली, उशीखाली, कपड्यांच्या खिशात-- अशा कुठेतरी सापडल्या. त्यानंतर ती चिटोरी, चिटोरी एकत्र करून छापली गेली. त्यानंतर सगळ्या पिढ्या आज एमिलीच्या कवितांनी भारल्या आहेत " असा उल्लेख आढळल्यामुळे उत्सुकता निर्माण होऊन अश्या कविता आहेत तरी कश्या म्हणून मी जालावर शोध घेतला. त्यात तिच्या कविता खरोखरच वाचून वेगळाच आनंद झाला. तिचं जीवनविषयक तत्त्वज्ञान म्हणण्यापेक्षा दृष्टिकोन वेगळाच वाटतो.

अमेरिकेत मॅसेच्यूसेट्स प्रांतात डिसेंबर १०, १८३० यादिवशी जन्मली एमिली एलिझाबेथ डिकिन्सन! तिचे वडील एडवर्ड हे ऍम्हर्स्ट या त्यांच्या शहरातील एक नावाजलेले वकील. भव्य म्हणता येईल अशा बंगल्यात त्यांचे कुटुंबरहात होते. एमिलीला विल्यम ऑस्टिन नावाचा मोठा भाऊ व लॅविना नॉरक्रॉस या नावाची धाकटी बहीण पण होती. लहानपणापासून एमिली एक शांत व शिस्तबद्ध वागणुकीची मुलगी म्हणून सर्वांना ज्ञात होती. शिक्षणासाठी उत्तम शाळेत तिला वडिलांनी तिच्या भावंडांबरोबर घातले होते आणि अतिशय हुशार व अभ्यासू असा लौकिकही तिने संपादन केला होता. पण तिची चुलत बहीण व अगदी जिवलग मैत्रिण सोफिया हॉलंड इच्या विषमज्वराच्या आजाराने झालेल्या मृत्यूचा तिच्या बालमनावर इतका तीव्र आघात झाला की त्यातून सावरण्यासाठी तिला बोस्टन या ठिकाणी तिच्या दुसऱ्या परिचित कुटुंबात पाठवण्यात आले व त्यानंतर तिची मानसिक स्थिती सुधारली. तिच्या

वयाच्या अठराव्या वर्षी बेंजामिन फ्रॅन्कलिन न्यूटन या तरुण वकिलाशी तिचा परिचय झाला व त्याने विल्यम वर्ड्स्वर्थ च्या काव्याशी तिचा परिचय करून दिला.

१८५० पासून म्हणजे एमिलीच्या वयाच्या २० व्या वर्षी तिच्या आईने जे अंथरूण धरले ते अगदी शेवटपर्यंत व त्या काळात तिला साथ देण्यातच एमिलीने काळ व्यतित केला. त्यानंतर तिने बाह्य जगाशी संबंध अगदी कामापुरताच ठेवला व याच काळात तिने अनेक कविता लिहिल्या. फिलिप्स लॉर्ड या न्यायाधीशाशी तिची झालेली मैत्री आयुष्याच्या उतरणीस लागलेल्या दोन जिवांचा प्रेमयोग म्हणता येईल. त्यानंतरही अनेक लोकांच्या मरणाचे धक्के तिला सहन करावे लागले त्यात १८७४ मध्ये वडील, त्यानंतर आई, त्यानंतर लॉर्डची पत्नी १८८४ मध्ये खुद्द लॉर्ड्स यांचे मृत्यू तिला पहावे लागले त्यामुळे शरीराने खंगलेली एमिली मनानेही खचली व तिचा मृत्यू १५ मे १८८६ मध्ये झाला.

ती हयात असताना तिच्या १०-१२ च कविता प्रकाशित झाल्या होत्या. पण तिच्या मृत्यूनंतर तिच्या लहान बहिणीने शोध घेतला तेव्हां तिच्या इथे तिथे पसरलेल्या १८०० कविता तिला सापडल्या.. त्या कवितांचे मोल तिच्या ध्यानात आले. पण या गोष्टीची वाच्यता झाल्यावर तिच्या भावाची विधवा पत्नीही त्या कवितांवर आपला हक्क सांगू लागली व या कौटुंबिक वादात एमिलीच्या सर्व कविता प्रसिद्ध होण्यास तिच्या मृत्यूनंतर अर्धशतकाचा तरी कालावधी लोटला मध्यंतरी तिच्या भावाच्या बायकोने आपल्या ताब्यात

असलेल्या तिच्या काही कवितांचा पहिला संग्रह तिच्या मृत्यूनंतर ४ वर्षांनी प्रकाशित केला. पण त्यात बरेच फेरफार केले होते तरीही अश्या ११५ कबितांच्या पहिल्याच संग्रहाचे आश्चर्य म्हणजे अभूतपूर्व स्वागत झाले व दोनच वर्षात त्याचे ११ वेळा पुनर्मुद्रण करावे लागले. १८९१ मध्ये तिच्या कवितांचा दुसरा संग्रह बाहेर पडला, त्याच्याही ५ आवृत्या निघाल्या व तिसरा संग्रह १८९६ मध्ये बाहेर पडला. "तिचे अगदी शेवटचे चिटोरेही प्रकाशित झाल्याशिवाय आम्हाला बरे वाटणार नाही"असे एका समीक्षकाने म्हटले होते. १९४५ पर्यंत जवळ जवळ १२ आव्रूत्या तिच्या संग्रहांच्या प्रकाशित झाल्या..

१९५५ मध्ये तिन्ही खंडांचे एकत्रिकरण करून थॉमस ए जॉन्सन याने त्या मूळ स्वरुपात प्रकाशित केल्या. तिच्या मूळ लिखाणात पहिल्या लिपीतली (कॅपिटल) अक्षरे व विरामचिन्हांचा वापर अगदी वेगळ्या प्रकारे केलेला आढळतो उदा:,

I am Nobody! Who are you?

Are you --- Nobody --- Too?

Then there’s a pair of us!

Don’t tell! They would banish us --- you know!

How dreary --- to be -- Somebody!

How public --- like a Frog

To tell one’s name --- the live long June --

To an admiring Bog!

प्रसिद्धी तिला मुळीच आवडत नव्हती हेही वरील कवितेवरून समजते आणि त्यामुळेच इतक्या कविता लिहूनही त्या प्रकाशित करण्याचा तिने विचारच केला नाही.

केवळ स्वान्तसुखाय लेखन करणारी मराठी साहित्यातील एक लेखिका म्हणजे दुर्गा भागवत. सुरवातीला त्यानी अनेक कविता लिहिल्या पण त्या नंतर त्यानाच आवडल्या नाहीत म्हणून त्यांनी फाडून टाकल्या. त्यांचे नंतरचेही बरेच लिखाण त्यानी फाडून टाकले. त्यामुळे संशोधनपर लिखाणच काय ते उरले.

याव्यतिरिक्तही स्वान्तसुखाय लेखन करणारे आणखीही काही असतीलही पण त्यांचे लेखन प्रसिद्धच झाले नाही तर कळणार कसे?

नाही म्हणायला माझ्या एका मित्राच्या सन्त प्रवृत्तीच्या वडीलांनी अनेक अध्यात्मिक ग्रंथांचे काव्यबद्ध रूपांतर केले आहे, त्यात "योगवासिष्ठ " सारख्या ग्रंथाचा समावेश आहे. ते माझ्या मित्राने त्यांच्या मृत्यूपश्चात कुटुंबियांसाठी संगणकावर लिखित स्वरूपात आणल्यामुळे मला समजले

# १४. मूक वसन्त!

गेल्याच महिन्यात दिल्लीत रहाणारी माझी भाची माझ्याकडे आली होती. घेऊन! ती परत जाताना प्रथमच आलेल्या तिच्या छोट्या मुलीला विचारले, " काय आवडलं का पुणं?" अपेक्षेप्रमाणे तिने "हो" असे उत्तर दिले आणि काय आवडले हे विचारल्यावर त्या एवढ्याश्या पोरीने अगदी अनपेक्षित उत्तर दिले, "इथे मला खूप ऑक्सिजन मिळाला, श्वास घ्यायला खूप छान वाटत होते, दिल्लीत तसे नाही" दिल्लीपेक्षा पुण्यातील हवा शुद्ध आहे म्हणून पाठ थोपटून घ्यायची की देशातील वायुप्रदूषण इतक्या उच्च पातळीला पोचले आहे की मिनिटाला दोघांचा बळी जात आहे या लॅन्सेट या नियतकालिकातील प्रदूषण अहवालात उल्लेखलेल्या गोष्टीकडे दुर्लक्ष करायचे याचा विचार करण्याची पाळी आता आली आहे. दिल्ली व पाटणा ही सर्वात जास्त दूषित शहरे भारतात आहेत. चीनमध्ये माझे मित्र त्यांच्या मुलाकडे जाऊन आले तेथे तर श्वासोच्छवास करायला अवघड जाते असे त्यांनी सांगितले त्यामुळे घरातच ए. सी. तून गाळून येत असलेली हवा घेत बसावे लागते.

"सायलेन्ट स्प्रिंग" या अमेरिकेत प्रसिद्ध झालेल्या पुस्तकाची लेखिका, रेचेल कार्सन इने आपल्या आयुष्यात दिलेल्या महान लढ्यामुळे निदान अजून काही प्रमाणात तरी शुद्ध हवा आपल्याला उपलब्ध आहे. ती २७ मे १९०९ मध्ये जन्मली. १४ एप्रिल १९६४ मध्ये मरण पावली त्या वेळी अमेरिकेतील

अग्रगण्य वृत्तपत्राने प्रकाशित केलेल्या व्यंगचित्रात तिच्या समाधीपाशी दोन टोळ आपापसात बोलताना दाखवले आहेत त्यातील एक टोळ दुसऱ्याला म्हणतो, " देव आपल्या आईवडिलांचं भलं करो, त्यानी आपल्याला जन्म दिला आणि हे सुंदर विश्व पहाण्याची संधी मिळाली"यावर दुसरा टोळ म्हणतो, "--- आणि रेचेल कार्सनचेसुद्धा, कारण तिच्यामुळे आपल्याला जगायला मिळालं" दुसऱ्या एका व्यंगचित्रात फुलपाखरं, भुंगे, मधमाश्या असे अनेक छोटे छोटे कीटक तिच्या समाधीवर जंगली फुलं वाहून आपली कृतज्ञता व्यक्त करताना दाखवलेले होते. कारण कदाचित तिच्या प्रयत्नाअभावी ते कीटक आणि ती फुलंही पृथ्वीतलावरून दिसेनाशी झाली असती.

रेचेल कार्सनचे निसर्गावर निरतिशय प्रेम होतं. सागरी जीवनाची ती अभ्यासक होती. पण त्याचबरोबर निसर्गाच्या वैज्ञानिक अभ्यासामुळे तिला ज्ञात झालेलं दाहक सत्य समाजाला समजेल अश्या भाषेत ओरडून सांगून जागे करण्याची हाडाच्या कार्यकर्त्याची आणि समाजसेवकाची तळमळही तिच्यापाशी होती. त्याचमुळे सागरी अभ्यासावरील तिची पुस्तकें अतिशय लोकप्रिय झाल्यावरही वैज्ञानिक प्रगतीचा उपयोग अणुबॉम्ब सारखी विध्वंसक निर्मिती करून सर्व जगासच वेठीस धरणाऱ्या मानवी प्रवृत्तीवर भाष्य करताना "वारा, पाऊस आणि ढग यांवर माणसाची सत्ता चालणार नाही ही माझी श्रद्धा आता ढासळू लागली आहे"असे ती म्हणते.

दुसऱ्या महायुद्धात व नंतरही चाललेल्या शीतयुद्धात अमेरिकन व रशियन सैनिक जगाच्या निरनिराळया भागात असताना डासांमुळे मोठ्या प्रमाणात

मलेरियाला बळी पडू लागले व त्यावर उपाय करण्यासाठी केलेल्या संशोधनातून निर्माण झालेले डी. डी. टी. हे महान कीटकनाशक सापडल्यावर स्विस शास्त्रज्ञ म्यूलरला या संशोधनाबद्दल नोबेल पारितोषिकही प्राप्त झाले अश्या कीटकनाशकाच्या निर्मितीमागे अमेरिकन भांडवलदार एकदा लागल्यावर त्यातून होणाऱ्या फायद्यासाठी कितीही प्रमाणात त्याची निर्मिती करायला आणि त्यातून भरमसाट नफा उकळायला ते तयारच होते त्यांच्या पैशावर निवडून येणारे सिनेटर त्यांना उत्पादनासाठी व नंतर त्यांनी केलेले भरमसाट उत्पादन खपवण्यासाठी कोणत्याही हद्दीपर्यंत जात असत. डी. डी. टी. हे कीटकनाशक म्हणून हाती लागल्यावर कोणत्याही प्रमाणात जिथे तिथे त्याचा वापर करण्यात आला. त्याचबरोबर इतर उत्साही संशोधकांनी फायर ऍन्ट या घातक कीटकाच्या निर्मूलनासाठी शोधलेल्या डाय आल्ड्रिन व हेप्टॅक्लॉर या कीटकनाशकांचा अगदी हेलिकॉप्टर वापरून फवारणी करण्यासाठी वापर अमेरिकन शासकीय यंत्रणेकडून करण्यात येऊन मोठ्या प्रमाणात पैशांचा चुराडा करण्यात आला. (आपल्याकडे इतका पैसा नसल्यामुळे अश्या फवारणीतून आपण वाचलो. तरीही पालिका ग्रामपंचायतीच्या कर्मचाऱ्यांना या फवारणीच्या कामास जुंपून जनतेच्या आरोग्याची काळजी शासनास आहे हे दाखवण्यात येतेच)

या फवारणीस पर्यावरणवाद्यांचा विरोध होता कारण त्यामुळे त्रासदायक कीटकच मरतात असे नाही तर इतर पर्यावरणास उपयोगी (उदा:भुंगे मधमाश्या, फुलपाखरे) असे कीटकही मरतात येवढेच काय मानवी जीवितासही धोका

संभवतो असे पर्यावरणवाद्यांचे मत होते. पण हे मत व्यक्त करणाऱ्या त्यानी लिहिलेल्या लेखांकडे व इशाऱ्यांकडे अमेरिकन सरकारने आपल्या उद्योजकांच्या फायद्यसाठी संपूर्ण दुर्लक्ष करून मलेरिया निर्मूलनाच्या मोहिमा आपल्या देशात तर राबवल्याच पण त्याचवेळी स्वतंत्र झालेल्या इतर देशांनाही या मोहिमा राबवण्यास उद्युक्त केले. कारण उघडच होते युद्धानंतर मिलिटरीची कीटकनाशकांची मागणी कमी झाली होती तर कारखानदारांनी त्याची निर्मिती मात्र पाचपटीने वाढवली होती मग हा इतका माल खपणार कोठे?मग त्यामुळे होणाऱ्या दुष्परिणामांकडे कोण लक्ष देणार? आपल्यासारख्या आधीच उल्हास तशात फाल्गुनमास असणाऱ्या देशांचे तर विचारायलाच नको. अमेरिका देतीय ना मग घ्या पदरात अश्यातला प्रकार. व आपली प्रजा तर काय "मुकी बिचारी कुणीही हाका " डांस निर्मूलन मोहीम सरकार काढतेय ना वा! वा! किती कळवला आपल्या आरोग्याचा सरकारला असेच नगरसेवक प्रजेच्या मनावर बिंबवणार व वर बघा आम्ही तुमच्यासाठी किती कष्ट करतोय हेही सांगणार. (आयजीच्या जिवावर बायजी उदार! )

पण अमेरिकेत खाबू उद्योजक व त्यांना साथ देणारे सिनेटर्स (आपल्याकडे त्यांना नगरसेवक की भक्षक? म्हणतात) यांच्याशिवाय आणखीही एक जमात असते ती म्हणजे जागृत नागरिक तसेच सद्सद्विवेकी संशोधक व पर्यावरणवादी. (आपल्याकडेही पर्यावरणवादी बांधलेले रस्ते उखडून काढायला लावतातच). त्यांनी अश्या मोहिमांना विरोध करायचा प्रयत्न केला पण सरकारने त्यांच्याकडे सोयिस्करपणे दुर्लक्ष केले इतकेच काय विरोधी मत व्यक्त करणाऱ्या

जीवशास्त्रज्ञाची सुद्धा खात्यातून उचलबांगडी केली (या बाबतीत त्यांनी भारताचा आदर्श समोर ठेवला की आपण त्यांचा यावर वाद होऊ शकेल). रेचेलचे लक्ष या समस्येकडे तिच्या ओल्गा हकिन्स या मैत्रिणीमुळे गेले. तिच्या घरामागील तळ्यातील मासे व तिच्या बागेत नेहमी येणारे पक्षी या फवारणीमुळे मरण पावले असे तिने "बोस्टन हेरल्ड"या वृत्तपत्रात पत्र लिहून सरकारच्या या फवारणीविरुद्ध तक्रार केली. आम्हाला डास नकोत पण त्याचबरोबर बागेतले पक्षी व मासे मरू लागले तर ते चालणार नाही असे तिने शासनाला बजावले.

त्याच वेळी सरकार जिप्सि मॉथ या आणखी एका कीटकनिर्मूलनाची मोहीम (पुन्हा विमानातून फवारणी) हाती घेणार होते. तसा हा कीटक नागरी वस्तीत नसतोच पण अमेरिकेतही "आले सरकारच्या मना तेथे कोणाचे चालेना" कारण ही मोहीम डाय आल्ड्रिन व हेप्टॅक्लॉर या कीटकनाशकांच्या उत्पादक कंपन्यांच्या फायद्यासाठीच राबवण्यात येत होती. या मोहिमेविरुद्ध जागतिक कीर्तीचे पक्षीतज्ञ रॉबर्ट कुशमन मर्फी व काही जबाबदार नागरिकांनी न्यायालयात धाव घेतली होती पण न्यायालयानेही सरकारलाच साथ दिली "पुरेश्या पुराव्याअभावी" या फवारणीस मनाई देण्याचे नाकारले व या फवारणीमुळे पर्यावरणास धोका आहे असे गुळमुळीत मत शास्त्रज्ञ जरी व्यक्त करत असले तरी त्यांचे मत मान्य करायचेच नाही असे जणु उत्पादकांच्याच कच्छपी लागलेल्या सरकारने ठरवले होते उलट असे व्यक्त करणाऱ्यांनाच धमक्या देण्यास सुरवात केली.

अश्या परिस्थितीत युद्धोत्तर कालात प्रचंड प्रमाणात रसायन निर्मिती करून निसर्गचक्रात जी ढवळाढवळ अमेरिकेतील तथाकथित पुढारलेल्या सरकारने चालवली होती व आपला माल खपवण्यासाठी इतर देशांनाही त्याच प्रकारच्या मोहास बळी पाडण्याचा त्या सरकारचा प्रयत्न चालू होता याविरुद्ध आपणच लेखणी उचलली पाहिजे असा विचार करून या सर्व मोहिमांचा किती भयानक परिणाम संपूर्ण जीवसृष्टीवर होत आहे व त्यात सर्व जीवसृष्टी व अखेर स्वत: मानवाचीही आहुति पडण्याची कशी शक्यता आहे ही गोष्ट जाहीर करण्याचा विडाच जणु रेचेलने उचलला पण त्यासाठी तिने लिहिलेले लेख छापण्यालाही "रीडर्स डायजेस्ट""लेडीज होम जर्नल""विमेन्स होम कंपॅनियन "व "गुड हौसकीपिंग" या मासिकांनी असमर्थता व्यक्त केली. त्यातील एकाच मासिकाने "तिने व्यक्त केलेल्या मतांना पुरेसा पुरावा नाही" हे कारण दिले तर इतरांनी तेही दिले नाही. शेवटी तिने परिणामाची पर्वा न करता या विषयावर पुस्तकच लिहायचे ठरवले व हॉटन मिफ्लिन या प्रकाशिकेने ते प्रसिद्ध करण्याची तयारी दाखवली.

या पुस्तकासाठी देशी परदेशी संशोधकांकडून पुरावे गोळा करताना प्रत्यक्षात तिला वाटत होते त्याहूनही या कीटकनाशकांचा परिणाम भयानक आहे, दु:ख, दारिद्र्य, पीडा आणि उपासमार यापासून मानवास मुक्ती देणारा विज्ञान हा मार्ग असला तरी त्याची विध्वंसक बाजूही त्याहूनही अधिक शक्तिशाली आणि भयानक आहे. या विध्वंसाच्या तडाक्यातून हवा, पाणी, सूर्यप्रकाश, समुद्र या पर्यावरणाचा एकही घटक सुटलेला नाही आणि

दिवसेदिवस कीटकनाशके, अणु उत्सर्ग अश्या मानवी कृती त्याचे स्वरूप अधिक अधिक विषारी बनवत आहेत ही गोष्ट तिच्या लक्षात आली.

१९६२ मध्ये प्रकाशित झालेल्या "Silent Spring"(मूक वसन्त) या तिच्या अतिशय शास्त्रशुद्ध व काटेकोर पण तितक्याच ओघवत्या भाषेत लिहिलेल्या पुस्तकाचे वाचकांनी मोठ्या प्रमाणात स्वागत केले इतकेच नव्हे तर आपल्या मतदारसंघातील आपापल्या लोकप्रतिनिधींना धारेवर धरले (आपल्याकडे हे फारच कमी प्रमाणात घडते). तिला त्यामुळे साहित्यिक व वैज्ञानिक लेखनाबद्दल अनेक पुरस्कार मिळाले अगदी नोबेल पारितोषिकासाठीही तिचे नाव सुचवण्यात आले. त्याचबरोबर कीटकनाशक उत्पादकांच्या जहरी हल्ल्यासही तिला तोंड द्यावे लागले. त्यावेळी ती स्वत: कॅन्सरग्रस्त होती ही बाब आणखी लक्षात घेण्यासारखी. अर्थात त्या जहरी प्रचाराने ती मुळीच कचरून गेली. नाही तिच्या लिखाणामुळे आलेल्या दबावामुळे त्यावेळी राष्ट्राध्यक्ष असणाऱ्या केनेडींना या मोहिमांबद्दल विचार करण्यास भाग पडले आणि त्यांना कीटकनाशकांच्या संहारकतेच्या परीक्षणासाठी स्वतंत्र समिती नेमावी लागली आणि त्या समितीचेही निष्कर्ष तिच्या पुस्तकातील निष्कर्षांशी मिळते जुळते असल्यामुळे कीटकनाशक मोहिमा रद्द कराव्या लागल्या.

कीटकांचा नाश करण्यासच तिचा विरोध आहे आणि त्यामुळे सर्व जग कीटकांच्या हल्ल्यास कसे बळी पडणार आहे असे चित्र तिने लिहिलेल्या पुस्तकाचाच आधार घेऊन उत्पादकांनी रंगवण्यास सुरवात केली पण त्यांचा

दावा चुकीचा असून कीटकांचा नाश करणे तिला मान्यच आहे पण तोही पर्यावरणास हानी न वेगळ्या पोचवणाऱ्या उपायांनी करणे कसे शक्य आहे हेही तिने दाखवून दिले.

आज थोडीफार तरी शुद्ध हवा मिळू शकते याचे संपूर्ण श्रेय रेचेल कार्सनकडे जाते. त्याचबरोबर प्रत्येकाने व प्रत्येक लोकप्रतिनिधीने ते पुस्तक वाचावयास हवे आणि आपल्या परिसराचे पर्यावरण रक्षण कसे करता येईल याचा विचार करणे आवश्यक आहे. आजही पुणे आणि इतरही सर्व शहरात सर्रास रस्त्यावर कचरा जाळण्यात येतो. शौचालयांचा फक्त आग्रहच धरण्यात येतो प्रत्यक्षात स्त्रियांसाठीच काय पुरुषांसाठीसुद्धा स्वच्छतागृह गल्लीबोळात तर राहोच पण मोठमोठ्या रस्त्यावरही नसते. घरातले दूषित पाणी बिनदिक्कत रस्त्यावर सोडण्यात येते आणि रासायनिक व इतर कारखान्यांचे दूषित पाणी व गाळ नद्यांमध्ये सोडून गंगा नदीसारखी पवित्र नदी सांडपाण्याची नदी होते या सर्व गोष्टींचा विचार करणे आवश्यक आहे.

रेचेलने "सायलेन्ट स्प्रिंग" या पुस्तकापूर्वी "Under the Sea wind" "The Sea around us""The Edge of the sea" ही तिच्या आवडीच्या सागरी संशोधनावर आधारित आणि "Sense of Wonder" हे लहान मुलांसाठी अशी चार पुस्तके लिहिली व तीही तितकीच गाजली.

(लक्ष्मण लोंढे यांच्या "आणि वसंत पुन्हा बहरला" या पुस्तकावरून)

# १५. घोणेसरकार

गाव सोडून कितीतरी वर्षे लोटली आणि तिकडे जाण्याची ओढ असण्याचे कारणच काही उरले नाही त्यामुळे केवळ कोल्हापूरला जाताना मध्ये एक मुक्काम करता येतो व सौ. ला गाव दाखवावे म्हणून औंधाला जाण्याचे ठरवले. पुण्याहून साताऱ्याला बऱ्याच गाड्या असतात व सातारहून औंधाला जायलाही बऱ्याच गाड्या असतात. सातारला गाडीत बसले की काहीजण तरी औंधाला जाणारे भेटतीलच असा अंदाज होता. पण गाडीत चढल्यावर माझा अंदाज खोटाच ठरणार असे दिसू लागले. कारण गाडीत एकही चेहरा ओळखीचा दिसेना. अर्थात गाव सोडून २०- २२ वर्षे लोटल्यावर त्यावेळी सगळॅ गाव ओळखीचे असले तरी त्यापैकी किती माणसे शिल्लक आहेत याचीच शंका होती आणि वयात फरक पडल्यामुळे चेहरे इतके बदललेले असण्याची शक्यता होती की परिचय असला तरीही एकमेकास ओळखण्याची शक्यता कमीच होती.

अचानक माझ्या मागील आसनावर बसलेल्या व्यक्तीने माझ्या खांद्यावर हात टाकून " काय श्याम, अरे श्यामच ना तू?"असे मला गदागदा हलवून म्हटल्यावर मी मागे पाहिले. मागील बाकावर एक काळी सावळी व्यक्ती बसलेली होती. आणि एकदम खप्पड! चेहऱ्यावरची हाडे उठून दिसत होती. मलमलचा सदरा अंगात होता पण त्याला अगदी पोतेऱ्याची कळा होती. तोंडाचे

बोळके झाले होते आणि त्यातून शिल्लक उरलेले दोन तीन दात डोकावत होते. मला तर त्या व्यक्तीला ओळखणे शक्य झाले नाही. "काय विसरलास ना गरिबाला, तुला तरी दोष कशाला द्यायचा म्हणा, लक्षात रहाण्यासारखं आहे तरी काय माझ्याकडे. "

आणि अचानक माझ्या डोक्यात प्रकाश पडला आणि मी जवळ जवळ ओरडलोच,

"घोणे? घोणेच ना, काय बरोबर आहे ना?" त्याला अहो म्हणावं की अरे याचा माझ्या मनात गोंधळ उडाला होता. कारण मी त्याच्याहून बराच म्हणजे काय अगदी त्याचा मुलगा शोभावा इतका लहान होतो. पण लहानपणी त्याला सगळे "ए घोणे, ए चंदू" अश्याच हाका मारलेल्या आठवत होते. पण मी त्याला ओळखल्यामुळे तो खूष झाला होता एकदम त्याचा चेहरा उजळला

" हाय म्हणायची आठवण आमची अजून, गावाकडल्या माणसाला विसरला नाहीस तर " बाकी शुद्ध बोलला तरी 'आहे' ऐवजी 'हाय' म्हणायची त्याची सवय तशीच होती.

"खर सांगू तुमच्यात इतका फरक झालाय की ---"

"बरोबर हाय तुझं " त्याने लगेचच मान्य केलं

घोणे मला आठवत होते तसा एकदम गब्दुल म्हणावा असा होता. मध्यम उंचीचा आणि त्या वेळीही डोक्यावर दाट केस असले तरी त्यातील बरेचसे पांढरे झालेले असा. दाढी बहुधा वाढलेली त्यातील केसही थोडे बहुत पांढरे. त्यावेळी त्याचा वेष बरेच पांढरे दिसणारे धोतर व त्यावर मलमलचा अर्ध्या किंवा लांब

बाह्यांचा शर्ट असा असे. सदा हसत असल्यासारखा चेहरा आमच्या घरापासून अगदी जवळच त्याचे हॉटेल होते आणि बहुधा चहा आणि शेवचिवडा या दोनच गोष्टी त्याच्याकडे मिळायच्या. राजवाड्यासमोरून आमच्या शाळेकडे जाणाऱ्या गावातील एकमेव मोठ्या रस्त्यावर त्याचं हे हॉटेल होतं वडिलांकडे जर त्यांच्या शिक्षक मित्रांची बैठक असली आणि आईला चहा करणे शक्य नसले तर "जारे घोणेच्या हॉटेलात चहा सांगून ये " अशी ऑर्डर मला मिळायची. आणि मी पळत तेथे जाऊन आज्ञापालन करायचा.

घोणेला माझ्या वडिलांनीही शिकवले असणार त्यामुळे "मास्तरांना सांग आणतोच पाच मिनटात "म्हणून लगेच तो भरा भरा स्टोव्हला पंप मारून चहाचं आधण चढवायचा.. त्याच्या दुकानात सबकुछ तोच असे त्यामुळे चहा तोच करत असे आणि किटलीत चहा आणि कपबशा तोच घरी घेऊन येत असे. तो नसताना कदाचित एकादा पोरगा हॉटेलात असे.

दिवसभर हॉटेलात काढून संध्याकाळी मात्र घोणे वाड्यासमोरील मैदानावर हॉलिबॉल खेळताना दिसे. त्याचे शॉट्स अगदी जोरात बसत. त्यावेळेपर्यंत घोणे ही व्यक्ती. म्हणजे चहा आणि हॉलिबॉल एवढ्यापुरतीच परिचयाची आणि आताही गाडीत गाठ पडल्यावर तीच आठवण जागी झाली. तस बघायला गेलं तर आमच्या दोघात मी गावात असताना दोघांना जोडणाऱ्या तेवढ्या दोनच गोष्टी होत्या त्यामुळे "मग कसे काय चाललेय?" असा प्रश्न मी विचारला आणि "चाललय कसंतरी "एवढेच त्याचे उत्तर यापलीक्डे काही फारसा संवाद झाला नाही. अश्या वेळी सुस्थितीत असणाऱ्या माणसाला

दुर्दशावस्थेतील माणूस काही मदत मागतो की काय अशी वाटणारी भीती थोडीफार माझ्याही मनात चमकून गेली. पण त्यानंतर अनेक वर्षानंतर आपल्या मनात असा विचार आल्याची मला लाज वाटली त्याला कारण असे झाले.

त्या गोष्टीला अनेक वर्षे लोटली आणि अगदी अलीकडे. मधुकर पाठक ("प्रपंच"चे दिग्दर्शक) लिखित "गदिमांच्या सहवासात " या पुस्तकात "घोणेसरकार "असा उल्लेख वाचून थबकलो. कारण ज्या व्यक्तीला मी हॉटेलवाला चंदू घोणे म्हणून ओळखत होतो ती व्यक्ती गदिमांच्या वर्गात शिकत होती आणि त्यावेळी घोणे अगदी श्रीमंत असामी होती इतकी की गदिमा त्याला "घोणेसरकार" अशी हाक मारायचे हे समजल्यावर दैवाच्या विचित्र लीलेचे आश्चर्य वाटले.

गदिमा औंध सोडून गेल्यावर घोणेनेही शाळा सोडली व दुर्दैवाच्या दशावतारात सापडून लक्ष्मीने घोणेकडे पाठ फिरवली इतकी की माझ्यासारख्या त्याचा पूर्वेतिहास माहीत नसणाऱ्यांसाठी तो हॉटेलवाला चंदू म्हणुनच आठवत होता पण गदिमाच्या आठवणीतील आणखी हृद्य भाग म्हणजे गदिमा प्रख्यात व्यक्ती झाल्यावर घोणे त्यांना भेटायला गेला. घोणेच्या परिस्थितीतील बदल गदिमांना माहीत नव्हता. पण त्याचा अवतार पाहून त्याची परिस्थिती वाईट झाली होती हे दिसत होते. पण तरीही घोणेना पाहून आनंदाने उठून गदिमानी "घोणेसरकार " असे म्हणत त्याला मिठीच मारली.

नंतर गदिमांनी त्याची चौकशी केली व घोणेनेही आपली सद्यस्थिती त्याना सांगितली. आपला बालमित्र इतक्या दिवसांनी आला आहे आणि

त्याच्या अश्या परिस्थितीत त्याची काहीतरी अपेक्षा असेल असे वाटून गदिमांनी घोणे निघताना शंभर रुपयाची नोट त्याच्या हातात ठेवण्याचा प्रयत्न केला, पण ती त्यांच्याच हातात परत ठेवत घोणे त्याना म्हणाला,

"गजानन, इतक्या दिवसांनी भेटलास आणि तू एवढा मोठा झालास तरी या चंदूची ओळख ठेवलीस आणि घोणेसरकार अशी मला हाक मारलीस हेच माझ्यासाठी पुरेसे आहे " एवढे म्हणुन घोणेसरकारनी गदिमांचा निरोप घेतला.

आता मधुकर पाठक, गदिमा आणि घोणे तिन्हीही व्यक्ती हयात नाहीत. पण ही आठवण कोणालाही गंहिवरून टाकणारी आहे असे वाटून येथे सादर केली.

# १६. मांबा, सिंबा, मांबा

रोआल्ड डाल याचे आई वडील नॉर्वेजियन. त्याचा जन्म १९१६ मध्ये इंग्लंडमध्ये झाला व शिक्षणही तेथेच झाले. तो वयाच्या अवघ्या १८ व्या वर्षी शेल ऑइल कंपनीत कामाला लागला आणि कंपनीने त्याला एकदम आफ्रिकेतच पाठवले. "गोइंग सोलो" हे त्याचे त्या काळातील अनुभवावर आधारित पुस्तक अगदी भन्नाटच म्हणावे असे आहे. रोआल्ड हा त्याच्या मुलांसाठी लिहिलेल्या पुस्तकाबद्दल जास्त प्रसिद्ध आहे. "गोइंग सोलो" हे मधील हे अनुभव तसेच भन्नाट म्हणता येण्यासारखे आहेत. ते अनुभव त्याच्याच शब्दात देत आहे. कंसातील टिप्पणी माझी.

" आफ्रिकेमध्ये दार एस सलाम बंदरातील एवढ्या मोठ्या शेल कंपनीचा कारभार पहाणारे आम्ही फक्त तिघे इंग्रज होतो आणि त्यात सगळयात कनिष्ठ व वयाने लहान मीच होतो. आमच्या हाताखाली एक स्वयंपाकी त्याला आम्ही पिग्गी म्हणत असू तर सलिमु हा माळी कामासाठी देण्यात आला होता. त्याशिवाय प्रत्येकास एक स्वीय सहाय्यक दिलेला होता. माझ्या सहाय्यकाचे नाव एमदिशो असे होते. तो चांगला उंचापुरा, तगडा आणि मृदू बोलणारा होता. आफ्रिकेतील ही जमात अतिशय शूर समजली जात असे कारण अतिशय

ताकदवान "मसाई" जमातीच्या टोळयांनाही त्यांनी टोळीयुद्धात हरवले होते. एमदिशो माझ्यावर जिवापाड प्रेम करत असे अर्थात माझेही त्याच्यावर तेवढेच प्रेम होते. या मंडळींना इंग्लिशचा गंधही नसे अर्थातच त्यांच्याशी संवाद साधण्यासाठी स्वाहिली मलाच शिकणे भाग होते. आणि तशी ती भाषा सोपी असल्याने स्वाहिली-इंग्लिश कोशाच्या सहाय्याने व थोड्याफार मेहनतीने मी त्यावर बऱ्यापैकी प्रभुत्व मिळवले.

शेल कंपनीच्या ग्राहकांना भेटण्यासाठी मला बरेच वेळा दौऱ्यावर जावे लागे आणि एम्दिशो त्यावेळी माझ्याबरोबरच असे. त्या खाचखळग्यांनी भरलेल्या रस्त्यावरून स्टेशन वॅगनमधून प्रवास करणे म्हणजे एक दिव्यच होते. पण तरीही हे दौरे मला आवडत कारण प्रवासात अनेक प्राणी पहायला मिळत. त्यात अगदी निर्भयपणे आमच्या पाठोपाठ झाडांचे शेंडे कुरतडत येणारे जिराफ असत तर कित्येक वेळा मोठमोठे हत्ती, पाणघोडे, झेब्रे, काळवीट आणि क्वचित रुबाबदार सिंहांचे कळपही दिसत. फक्त एका प्राण्याला मात्र मी वचकून असे आणि तो म्हणजे येथील भयानक साप. त्या गचाळ रस्त्यावर कधी कधी ते अचानक आमच्या गाडीसमोरून सरपटत जाताना दिसत. त्यावेळी चुकूनही गाडी वेगाने नेऊन त्याच्यावरून जाऊ न देणे हा एक अगदी महत्त्वाचा नियम पाळणे शहाणपणाचे असे. विशेषत: जर गाडीला वर छप्पर नसेल तर हे फारच महत्त्वाचे कारण गाडीच्या पुढील चाकाच्या धक्क्याने साप उडून अगदी पुढ्यात येऊन पडण्याचा धोका असे.

टांगानिकामधील काळा माम्बा हा साप तर फारच भयानक असतो. (सापाविषयी साधारण समजूत अशी आहे की त्याला दिसत नाही आणि आपण होऊन कोणावर हल्ला करत नाही पण) हा असा एकच साप आहे की तो माणसाला मुळीच घाबरत नाही आणि स्वत: होऊन हल्ला करण्याची शक्यता असते आणि त्याच्या चाव्यात सापडणे म्हणजे केवळ मरणच. ही माहिती एमदिशोकडून मिळाल्यामुळे मी त्याविषयी फारच दक्ष असे. एक दिवस आमच्या दार एस सलाममधील घराच्या स्नानगृहात मी दाढी करत उभा होतो. आणि तोंडाला फेस चोपडून खिडकीतून सहज बाहेर बागेत नजर टाकली. बागेत सलिमू पोर्चमधील वाळू सारखी करत होता. आणि त्याच्या मागे माझे लक्ष गेले आणि मी एकदम गारठलोच, कारण त्याच्या मागच्या वाळूवरून चांगाला सहा फूट लांब आणि माझ्या मनगटाच्या जाडीचा मांबा विलक्षण चपळाईने येत होता. त्याने सलिमुला पाहिले होते आणि त्याच्यावर हल्ला करण्याच्या तयारीनेच तो येत होता.

मी धावतच खिडकीपाशी गेलो आणि बाहेर डोकावत स्वाहिलीमध्ये जवळ जवळ किंचाळलोच, "सलिमू सांभाळ, तुझ्यामागे मोठा साप आहे" साप अगदी एकाद्या धावपटूच्या वेगात पुढे येत होता आणि सलिमूने मागे वळून पाहिले तेव्हां तो त्याच्यापासून साधारण पंधरा पावलांच्या अंतरावर होता. मला काही करता येणे तर शक्यच नव्हते आणि सलिमूलाही फारसे काही करता येईल असे दिसत होते कारण त्याने पळण्याचा प्रयत्न जरी केला असता तरी मांबाने त्याच्या मागे अगदी शर्यतीत भाग घेणाऱ्या घोड्याच्या वेगाने धावत त्याला

केव्हांच गाठले असते. आताही तो पाच सेकंदातच त्याला गाठण्याची शक्यता दिसत होती.

मी अगदी जीव मुठीत धरून पहात राहिलो. सलिमू वळून माम्बाकडेच पहात होता. आता त्याने खूप वाकून एक पाय मागे घेऊन धावण्याच्या शर्यतीत भाग घेणाऱ्या धावपटूप्रमाणे पवित्रा घेतला होता वाळू सारखी करण्यासाठी त्याच्या हातात असलेले लांब दांड्याचे दाताळे त्याने वर, पण खांद्याच्या वर जाणार नाही अशा बेताने उचलले होते आणि ते चार पाच सेकंद तो अगदी स्तब्ध राहून त्याच्याकडे अगदी वेगाने येत असलेल्या त्या काळसर्पाकडे अगदी निश्चलपणे पहात राहिला. सापाचे त्रिकोणाकृती डोके वर उचललेले मला दिसत होते आणि पोर्चच्या जमिनीवर तो सरपटत असताना बारीक दगडगोट्यांवर घासणाऱ्या त्याच्या सरपटणाऱ्या शरीराचा अस्पष्ट आवाजही मला ऐकू येत होता.

अजूनही ते दृष्य माझ्या डोळ्यासमोर जसेच्या तसे उभे आहे. बागेत पडलेली ती सकाळची कोवळी उन्हे, पार्श्वभूमीला असलेले भरभक्कम बाओबाब (आफ्रिकेतील विशेष प्रकारचे) वृक्ष, सलिमू त्याच्या खाकी अर्धी चड्डी आणि सदरा या वेषात अनवाणी पण मुळीच न घाबरता निश्चलपणे दांताळे उगारून उभा आणि समोरून आपला फणा उभारून रोरावत येणारे ते कृष्णवर्णी सापाचे धूड. सलिमू थांबून पहात होता, अगदी मुळीच न हालता आणि आवाजही न करता. माम्बा त्याच्यापासून पाच फुटापर्यंत येईपर्यंत तो तसाच थांबला आणि तो येताक्षणीच "धडाम" करुन फावड्याचा प्रहार त्याने

माम्बाच्या लांबीच्या बरोबर मध्यावर त्याने केला आणि त्याच अवस्थेत त्याने आपल्या शरीराचा सर्व भार टाकत फावडे धरून ठेवले. आणि नंतरही उड्या मारत त्याने फावड्यावरील दाब वाढवण्याचा प्रयत्न केला. त्या सापाच्या शरीरात फावड्याचे दात घुसून तेथून रक्ताची धार वहाताना दिसत होती. माझ्या अंगावर कपडे नाहीत याचीही पर्वा न करता मी तसाच माझी गोल्फची काठी घेऊन बाहेर धावलो.

मी बाहेर पोचलो तेव्हां तो त्याच अवस्थेत सापाला तडफडत ठेऊन उभा होता, "मी काय करू (तुला मदत करण्यासाठी)?" असे मी स्वाहिलीत त्याला विचारल्यावर "मुळीच काही करू नका, साहेब आणि जवळही येऊ नका जे काय करायचे ते मलाच करू द्या "असे तो म्हणाला आणि त्याने फावड्याचे दात सापाच्या शरीरातून उपसून काढून जरा दूर उडी मारली. त्याच्या आघातामुळे साप त्याच जागी वळवळत राहिला पण माझ्यावर हल्ला मात्र करू शकला नाही. पुन्हा एक जबरदस्त पवित्रा घेत सलिमूने दुसरा घाव त्वेषाने बरोबर सापाच्या टालक्यात घातला आणि त्याची वळवळ एकदम बंद झाली. सलिमूने एक मोठा हुंकार भरला आणि स्वत:च्या कपाळाला हात लावला आणि तो माझ्याकडे पाहून म्हणाला, "असान्ति ब्वाना (धन्यवाद मालक) असान्ति साना( खूप खूप धन्यवाद)" एकाद्याचा प्राण वाचवण्याची अशी संधी क्वचितच मिळते त्यामुळे पुढे कधीही सलिमूला पाहिल्यावर मला त्या आठवणीने मोठा आनंद मिळत असे. "

डालचा दुसरा अनुभव सिंहासंबधीचा आहे.

" काळ्या माम्बाच्या त्या प्रसंगानंतर महिन्याभरातच मला एका दौऱ्यावर एमदिशोबरोबर जावे लागले. त्या दौऱ्यात माझा मुक्काम तबोरा शहरात पडला. तबोरा दार एस सलामपासून अंतर्भागात ४५० मैल अंतरावर आहे. आणि १९३९ मध्ये ती अगदी लहान वसाहत होती पण टांगानिकाच्या संदर्भात ते महत्त्वाचे ठाणे असल्यामुळे ब्रिटिश डिस्ट्रिक्ट ऑफिसरची तेथे नियुक्ती केलेली होती. तबोरा शहरात त्यावेळी रॉबर्ट सॅनफोर्ड हा डिस्ट्रिक्ट ऑफिसर होता. त्यादिवशी माझा मुक्काम त्याच्याकडेच होता. संध्याकाळच्या वेळी रॉबर्ट व त्याची पत्नी यांच्याशी घराच्या व्हरांड्यात बसून मी गप्पा मारत बसलो होतो व जवळ रॉबर्टची दोन मुले खेळत होती. अचानक त्याचा सहाय्यक एमदिशो "सिंबा मालक सिंबा "असे ओरडत धावत आला. स्वाहिली भाषेत सिंहाला सिंबा म्हणतात. (सिंहा व सिंबा या उच्चारसाम्यावरून स्वाहिली संस्कृतपासून तयार झाली की संस्कृत स्वाहिलीपासून?कारण सर्व मानवजातीचा उगम आफ्रिकेपासून झाला असे म्हणतात. ) "मालक बघा बघा भला मोठा सिंबा आपल्या स्वयंपाक्याच्या बायकोला खातोय "

रॉबर्ट तडक घरात जाऊन आपली शक्तिशाली बंदूक काढून त्यात गोळी बसवत बाहेर आला. आणि मला घेऊन व्हरांड्यातून बाहेर पडत "त्या पोरांना आत घेऊन जा" असे बायकोकडे पहात म्हणाला. एम्दिशो बाहेर उड्या मारत घराच्या मागील बाजूस बोट दाखवत, "स्वयंपाक्याच्या बायकोला सिंबा उचलून घेऊन गेला. तो तिला खातोय आणि तो त्याचा पाठलाग करून तिला वाचवण्याचा प्रयत्न करतोय. " असे सांगत होता. घराच्या मागील बाजूस

नोकरांना रहाण्यासाठी जागा दिलेली होती आणि नोकरांपैकी चार पाचजण त्याच्याच सुरात सूर मिळवून मागील बाजूस बोट दाखवून "सिंबा सिंबा"असा गिल्ला करत होते. "कोठे आहे सिंबा?" रॉबर्टने विचारले पण त्यांनी काही उत्तर देण्यापूर्वीच त्याला शे दीड्शे पावलावर एक भलामोठा पिंगट रंगाचा सिंह दिसला. स्वयंपाक्याच्या बायकोच्या कमरेला त्याने आपल्या जबड्यात पकडले होते. त्यामुळे तिचे डोके व हात एका बाजूस लोंबत होते तर पाय दुसऱ्या बाजूस. तिच्या अंगावरील पोषाक लाल पांढऱ्या रंगाच्या ठिपक्यांचा होता. आमच्या इतक्या जवळून चालला होता तरी अगदी शांतपणे आपल्या धीर गंभीर चालीने तो आमच्यापासून दूर जात होता. आणि त्याच्यामागे वीस पंचवीस पावलांवर स्वयंपाकी पळत मोठ्या धीराने उड्या मारत दोन्ही हातांनी जोरात टाळ्या वाजवत व तोंडाने "सिम्बा, सिम्बा सिम्बा माझ्या बायकोला सोड, माझ्या बायकोला सोड "असे ओरडत त्याचा पाठलाग करत होता.

ते दृश्य जसे कारुण्यपूर्ण होते तसेच विनोदीही दिसत होते. तेवढ्यात रॉबर्ट बंदुक हातात घेऊन वेगाने स्वयंपाक्याच्या पाठोपाठ पळत पळत जाऊ लागला आणि मोठ्याने ओरडून त्याला, "पिंगो ( स्वयंपाक्याचे नाव), पिंगो, बाजूला सरक जमिनीवर पड म्हणजे मला गोळी घालता येईल" असे सांगत होता पण पिंगो काही तिकडे लक्ष देत नव्हता आणि सिंहही कोणाकडेच लक्ष न देता आपल्याच चालीने मोठ्या ऐटीत कुत्र्याने एकादे आवडलेले हाडूक तोंडात पकडून धावावे तसा त्या बाईला तोंडात धरून चालत होता.

रॉबर्ट आणि स्वयंपाकी दोघेही सिंहापेक्षा अधिक वेगाने धावत होते आणि सिंह मात्र अगदी आरामात या कसल्याच गोष्टीचे भान नसल्यासारखे आपल्याच धुंदीत चालला होता. त्या सिंहाला गोळी घालण्याचे धाडस रॉबर्टला होत नव्हते कारण त्याच्या तोंडातील बाईलाच ती लागण्याची भीती त्याला वाटत होती सिंह जंगलाने वेढलेल्या डोंगराळ भागाकडे चालला होता आणि जंगल इतके दाट होते की एकदा का तो त्यात शिरला की त्याचा पत्ता लागणे शक्य नव्हते. धाडशी स्वंयंपाकी सिंहाच्या अगदी जवळ पोचला होता तर रॉबर्ट त्याच्यामागे तीस चाळीस पावलांवर होता. शेवटी त्याने बंदूक वर उचललीच. सिंहाच्या तोंडात बाई असल्यामुळे तो बार भरणार नाही असे मला वाटत होते, पण गोळी झाडल्याचा आवाज आला आणि सिंहाच्या पुढेच थोड्या अंतरावर ती आपटून धूळ उडाली. गोळीचा आवाज सिंहाने ऐकला आणि धूळ उडाल्याचे पण पाहिले आणि आपल्यामागे शस्त्रधारी माणसे येत आहेत ही जाणीव त्याला झाली आणि तोंडातल्या बाईला सोडून त्याने एकदम जोरात पळ काढला. हळू चालणाऱ्या सिंहाच्या वेगात एकदम एवढी वाढ झाल्याचे मी प्रथमच पहात होतो. त्यामुळे रॉबर्टच्या बंदुकीतून दुसरी गोळी सुटण्यापूर्वीच तो जंगलात पार दिसेनासा झाला होता.

"प्रथम स्वयंपाकी, त्याच्या पाठोपाठ रॉबर्ट आणि त्याच्या मागून मी असे आम्ही तिघेही त्याच्या बायकोपर्यंत पोचलो आणि आमच्या नजरेस जे दृष्य पडले त्याच्यावर माझा विश्वासच बसेना. सिंहाच्या जबरदस्त जबड्यात सापडून तिच्या कमरेचे व पोटाचे अगदी दोन तुकडे झाले असण्याची भीती मला वाटत

होती, पण अगदी सहजपणे उठून बसत ती आपल्या नवऱ्याकडे हसून बघत होती.

"कुठंकुठं इजा झाली आहे तुला?" काळजीयुक्त स्वरात रॉबर्टनं विचारलं, "त्या म्हाताऱ्या सिंहाने मला जराही इजा पोचवली नाही. मी अगदी मेल्यासारखी त्याच्या तोंडात राहिले आणि त्याने माझे कपडेदेखील फाडले नाहीत. 'असे म्हणून ती सिंहाच्या लाळेने ओले झालेले आपले कपडे झटकत उभी राहिली. स्वयंपाक्याने आपल्या बायकोला मिठीच मारली आणि दोघांनी आनंदाने आफ्रिकी पद्धतीने थोडे नृत्यही केले.

"तुला थोडा ओरखडाही नाही उठला?"रॉबर्टने विश्वास न बसून पुन्हा विचारले, "खरच नाही मालक आपल्या पिलांना जसे तोंडात पकडून नेतात अगदी तसेच त्याने मला पकडले होते. "

रॉबर्ट आणि माझी या विषयावर बरीच चर्चा झाली. प्रथम त्या सिंहाला शोधून ठार मारावे असे रॉबर्टला वाटत होते, इतर शिकाऱ्यांनाही त्यानी विचारले पण सिंहाने स्वयंपाक्याच्या बायकोला अगदी ओरखडाही काढला नाही यात हे काय गूढ होते हे कोणीही उकलू शकले नाही आणि म्हणून त्या दयाळू सिंहाला सोडून द्यावे असा विचार त्याने केला. (पुढे चालू)

लचा तिसरा अनुभव हिरव्या माम्बाविषयी आहे. डाल लिहितो,

"एका रविवारी फुलर नावाच्या माझ्या इंग्लिश मित्राने संध्याकाळी मला घरी बोलावले होते. तो दार एस सलामच्या कस्टम्स ऑफिसमध्ये काम करीत असे. एका दुमजली घरात आपली पत्नी व दोन मुले यांच्या समवेत तो रहात

असे. हे त्याचे पांढऱ्या रंगाचे लाकडी घर एका हिरवळीच्या मैदानावर उभारलेले होते आणि सभोवताली नारळाच्या झाडांनी ते वेढलेले होते. मी त्या हिरवळीवर चालू लागलो आणि घरापासून जेमतेम वीस पावलांवर होतो तोच एक चांगलाच लांब हिरवा साप त्याच्या व्हरांड्यातून घरात प्रवेश करताना मला दिसला. त्याची चमचम करणारी हिरवीगार त्वचा आणि लांबी बघूनच काळ्या माम्बाइतकाच खतरनाक असा हा हिरवा माम्बा आहे हे ध्यानात आले आणि मी क्षणभर जागच्या जागी गोठूनच गेलो पण लगेचच सावरलो. आणि पळतच घराच्या मागच्या बाजूस गेलो. आणि फुलरला हाका मारल्या.

फुलरच्या बायकोने वरच्या मजल्यावरील खिडकीतून डोके बाहेर काढीत विचारले, "काय झाले?"

' तुमच्या घरात आत्ताच एक लांबलचक हिरवा माम्बा व्हरांड्यातून आत शिरताना शिरताना मला दिसला"मी ओरडून म्हणालो. भांबावून गेलेल्या बायकोने "फ्रेड फ्रेड "अशा हाका मारल्या आणि फ्रेडचा चेहरा खिडकीतून डोकावला. आणि त्यालाही मी तीच बातमी दिली. पण फुलर मात्र थोडेही विचलित न होता माझ्याकडे पहात म्हणाला, "तू आता तिथेच थांब, मुलांना एक एक करत मी खाली सोडतो आणि तू त्यांना उतरवून घे. "त्याने चेहरा अगदी शांत ठेवला होता आणि आवाजही मुळीच चढवला नव्हता

प्रथम त्याने लहान मुलीच्या एका हाताच्या मनगटास पकडून खाली सोडले त्याबरोबर तिचे पाय पकडून मी तिला खाली घेऊ शकलो. तसाच त्यापाठोपाठ त्याने आपल्या मुलाला सोडले. नंतर फ्रेडने आपल्या बायकोलाही

तसेच खालील बाजूस सोडले आणि मी तिच्या कमरेस पकडून तिला खाली घेतले. सगळयात शेवटी खिडकीच्या कडेस धरून खाली लोंबकळत त्याने खालच्या हिरवळीवर उडी मारली. आता त्याचे सर्व कुटुंब खाली आले होते. फुलरची बायको आपल्या मुलांना आपल्या बाजूला घेत उभी होती. कॉणाच्याच चेहऱ्यावर भीतीचे चिन्हही नव्हते.

"आता काय करायचे?" मी विचारले

"तुम्ही सगळे जण रस्त्यावर जा" फुलर म्हणाला, "मी सापपकड्या(snake-man)ला घेऊन येतो.

"हा सापपकड्या कोण?"मी कुतूहलाने विचारले. तोही आपल्यासारखा इंग्रजच आहे. वयस्कर आहे, आणि बरीच वर्षे इथेच स्थायिक झाला आहे. "मिसेस फुलर म्हणाल्या. "त्याला सापाचे वेडच आहे आणि तो कोणालाही ते मारू देत नाही. तो साप पकडतो आणि प्राणिसंग्रहालये आणि प्रयोगशाळा यांना विकतो. इथल्या सगळ्या रहिवाशांना तो माहीत झाला आहे. त्यामुळे कोणालाही कोठेही साप दिसला की कितीही अंतरावरून जाऊन ते त्याची खबर त्याला देतात, आणि तो मग त्याला पकडतो. त्याचा कडक कायदाच आहे की इतर कोणीही पकडलेला साप तो विकत घेत नाही"

"असे का?"मी विचारले.

' त्यानी स्वत: साप पकडण्याचा प्रयत्न करू नये म्हणून" मिसेस फुलर म्हणाल्या.

"पूर्वी तो इतरांनी पकडलेले साप विकत घेतही असे पण बरेच रहिवासी त्या प्रयत्नात साप चावून मेले, त्यामुळे ही गोष्ट थांबवायला हवी असे त्याच्या मनाने घेतले आणि तसा नियमच त्याने केला. आता एकादा रहिवासी साप पकडून तो घेऊन त्याच्याकडे गेला तरी तो त्याला परतवून लावतो. "

"हे बरोबरच आहे" मी म्हणालो आणि पुढे विचारले "या माणसाचे नाव काय?"

"डोनाल्ड मॅक्फर्लेन, मला वाटते तो स्कॉटिश आहे"

" आपल्या घरात साप आहे का मम्मी? "छोट्या मुलीने विचारले.

"होय गं, पण घाबरू नकोस आता डोनाल्ड अंकल त्याला पकडणार आहे"आईने उत्तर दिले.

"साप जॅकला चावेल ना पण?"मुलगी म्हणाली.

"अरे देवा, "मिसेस फुलरने कपाळावर हात मारून घेतला "जॅक (कुत्रा) आत आहे हे मी पारच विसरून गेले"आणि ती हाका मारू लागली, "जॅक, जॅक इकडे ये बर. "तिनं जॅकच्या नावाने बऱ्याच हाका मारल्या. पोरांनीही उड्या मारत कुत्रा जॅकच्या नावाने हाका मारण्याचा सपाटा लावला.

"साप त्याला चावला बहुतेक"छोट्या मुलीनं गळा काढत म्हटले. आणि तिच्या सुरात तिच्या भावानेही सूर मिसळला. तो तर तिच्याहून एक वर्षाने लहानच होता. मिसेस फुलरचाही चेहरा उतरला.

"जॅक बहुधा वर जाऊन लपला असेल, तुम्हाला माहीत आहे तो किती हुशार आहे, " त्यांना धीर देत त्या म्हणाल्या पण त्याना व पोरांनाही समजून

चुकले की त्यांच्या कुत्र्याला साप चावला असणार. त्यामुळे डोनाल्डला घेऊन फ्रेडची कार तेथे आल्यावर त्या दोघांनीही आपल्या बापाकडे जाऊन, "जॅकला साप चावला"असे रडून सांगायला सुरवात केली. अर्थात त्याच्याकडे फार लक्ष देण्यात काही अर्थ नव्हता. त्यामुळे आम्ही फ्रेड व डोनाल्डकडे लक्ष द्यायचे ठरवले.

डोनाल्ड बराच वयस्कर लहानखुऱ्या बांध्याचा होता. त्याचे वय सत्तर पेक्षा जास्तच असेल. गाईच्या कातड्यापासून बनवलेले बूट त्याने घातले होते आणि त्याच प्रकारच्या कातड्याचे हातमोजे त्याने हातावर चढवले होते आणि ते अगदी कोपराच्याही वरपर्यंत लांब होते. त्याच्या उजव्या हातात एक वेगळ्याच प्रकारचे हत्यार होते. ती एक आठ फूट लांबीची लाकडाची दंडगोलाकार काठी होती व त्याच्या एका बाजूस चिमटा तयार केलेला होता. त्या चिमट्याची दोन टोके काळया रबराची एक इंच जाडीची व अतिशय लवचिक होती त्यामुळे चिमटा जमिनीवर टेकून दाबला असता ती दोन टोके दूर सरकून चिमट्याचा मध्यभाग जमिनीच्या कितीही जवळ जाऊ शकेल असे वाटत होते.

डोनाल्ड वयस्कर असला तरी प्रभावी व्यक्तिमत्वाचा दिसत होता. त्याचे डोळे निळसर तर गोल चेहरा रापलेला आणि अक्रोडासारखा सुरकुतलेला होता. निळया डोळयावरील जाडसर भुवया अगदी स्वच्छ पांढऱ्या होत्या त्याच्या डोक्यावरील केस मात्र बरेच काळे होते. पायात जाड चामड्याचे बूट असूनही

त्याच्या हालचाली एकाद्या मांजरासारख्या सावध पण चित्त्यासारख्या चपळ होत्या. तो सरळ माझ्याकडे आला आणि त्याने विचारले, "तुम्ही कोण?"

" तो शेलमध्ये कामाला आहे. , आणि नुकताच माझ्याकडे आला आहे. "फ्रेडने उत्तर दिले.

"तुम्हाला पहायचे आहे का?"डोनाल्डने मला विचारले.

"पहायचे आणि ते कसे शक्य आहे?" दबकत मी विचारले, "म्हणजे मला असं विचारायचं आहे की कुठून पहाणार घरातून नाहीना?"

"तुम्ही व्हरांड्यात उभे राहून त्या खिडकीतून पाहू शकता "व्हरांड्यातील खिडकीकडे बोट करत तो म्हणाला,

"चल तर मग आपण दोघेही पाहूया"फुलर म्हणाला

"हं उगीच काहीतरी वेडेपणा करू नका "मिसेस फुलर म्हणाली.

मुले बिचारी अगदी दीनवाणी होऊन उभी होती त्यांच्या डोळयातील पाणी त्यांच्या गालावरून ओघळत होते.

डोनाल्ड आणि आम्ही दोघे हिरवळीवरून घराकडे जाऊ लागलो. आणि जसे आम्ही व्हरांड्याच्या जवळ आलो तसे डोनाल्डने अगदी हलक्या आवाजात सांगितले, "लाकडी फळयांवरून अगदी हलक्या पावलांनी चाला नाहीतर हादऱ्याने सापाला चाहूल लागेल. मी आत जाईतोवर वाट पहा आणि नंतर हलक्या पावलांनी खिडकीपाशी जाऊन आत नजर टाका.

डोनाल्ड अगदी खरोखरच मांजराच्या पावलांनी पायऱ्या चढून वर गेला आणि तसाच व्हरांड्यातून पुढे जाऊन आत गेला आणि त्याने याबडतोब दार बंद करून घेतले पण तेही मुळीच आवाज न करता. त्याने दार बंद केल्यावर मला हायसे वाटले पण ते स्वत:पुरतेच कारण डोनाल्डचे आत कसे काय होणार ही भीती मनात होतीच. मला तर वाटत होते तो या प्रकारे आत्मघातच करतो आहे. फुलरबरोबर हलक्या पावलांनी व्हरांडा पार करून आम्ही खिडकीपाशी जाऊन उभे राहिलो. खिडकी उघडीच असली तरी बारीक तारेची जाळी तिच्यावर होती. त्यामुळे मला आणखीनच सुरक्षित वाटले.

दिवाणखाना अगदी साधा होता. जमिनीवर काथ्याचा गालिचा अंथरलेला होता, एक लाल रंगाचा सोफा, कॉफी टेबल आणि दोन तीन खुर्च्या इतकेच जुजबी फर्निचर दिसत होते. कॉफी टेबलाखाली एक मोठा एअर्डेल जातीचा कुत्रा पाय ताणून मरून पडलेला होता. डोनाल्ड दिवाणखान्याच्या दारापाशी अगदी पुतळ्यासारखा स्तब्ध उभा होता. त्याच्या डाव्या खांद्यावर तपकिरी रंगाचे पोते टाकून लांब काठी त्याने दोन्ही हातात त्याच्यासमोर जमिनीस समांतर पकडलेली होती. साप मला कुठेच दिसत नव्हता आणि डोनाल्डलाही दिसत असेलसे वाटत नव्हते.

एक मिनिट --- दोन मिनिटे----तीन---चार---पाच–कोणीच हालत नव्हते. त्या खोलीत मृत्यू जणु दबा धरून बसला होता.. खोलीतील हवाही मृत्यूच्या अस्तित्त्वाने जडशीळ झाल्यासारखी वाटत होती. आणि डोनाल्ड लांब

दांडा समोर हातात धरून एकाद्या दगडी खांबासारखा स्तब्ध उभा होता. आणि तो अजूनही थांबला होता वाट पहात. आण्खी एक मिनिट—आणखी—आणखी.

आणि आता तो आपल्या गुढघ्यात वाकू लागल्याचे माझ्या ध्यानात आले. अगदी हळू तो गुडघ्यातून वाकत वाकत तो अगदी उकिडवा झाला. त्या स्थितीत राहून तो सोफा आणि खुर्चीखाली शोध घेत होता आणि तरीही त्याला काही दिसले असे वाटत नव्हते. सावकाश तो पुन्हा सरळ उभा राहिला आणि आपली मान वळवून तो सर्वत्र पाहू लागला. उजवीकडे दूरच्या कोपऱ्यात वरच्या मजल्यावर जाणारा जिना दिसत होता. आणि आता त्याच्या डोक्यात काय विचार आहे हे मी समजलो. अचानक एक पाऊल त्याने पुढे टाकले आणि तो थबकला.

पण काहीच घडले नाही!

पुढच्याच क्षणात एकदम सापाचे दर्शन मला झाले. उजव्या भिंतीच्या किनाऱ्यावर तो पूर्ण पसरून पडला होता पण सोफ्याच्या मागे असल्यामुळे डोनाल्डला मात्र तो दिसत नव्हता. हिरव्या रंगाच्या सुंदर काचेच्या लांबसड्क पण भयानक दंडासारखा तो तेथे पसरला होता. अगदी हालचाल न करता, त्याला झोप लागली असावी. त्याचे त्रिकोणाकार छोटे मस्तक जिन्याच्या खालील पायरीवरील चटईवर विसावलेले होते.

फुलरला कोपराने ढोसत बोटाने दाखवत मी पुटपुटलो, "तो त्या भिंतीपाशी आहे. "त्याबरोबर फुलरने एकदम आपल्या हाताच्या पंजाच्या मागे पुढे हालचाली करून डोनाल्डचे लक्ष वेधून घेण्याचा प्रयत्न सुरू केला. पण

त्याचा काही उपयोग झाला नाही त्यामुळे त्याने अगदी हलक्या आवाजात "शुक शुक"केले मग मात्र डोनाल्डने चटकन वर पाहिले. फुलरने बोट दाखवले आणि डोनाल्डच्या डोक्यात प्रकाश पडला. आणि त्याने मान हलवून तसे सूचित केले.

आता त्याने अगदी हळू हळू त्या खोलीच्या मागील भिंतीकडे जाण्याचा प्रयत्न सुरू केला त्यामुळे सोफ्याच्या पलीकडील साप त्याच्या नजरेसमोर येईल असा त्याचा अंदाज होता. आपल्यासारखा अंगठ्यावर तो कधीच चालत नव्हता, त्याचे पाय नेहमी जमिनीला समांतर रहात. गायीच्या चामड्याचे त्याने घातलेले बूट अगदी सपाट तळ असलेले होते.. हळू हळू त्याने मागील भिंत गाठली आणि तेथून सापाचे डोके आणि त्याची दोन तीन फुटाची लांबी त्याला दिसू लागली.

पण सापानेही त्याला पाहिले आणि क्षणार्धात त्याने अगदी वेगात हालचाल केली आणि त्याचे डोके हवेत दोन फूट वर गेले आणि शरीराचा पुढचा भागाचा आकडा करून हल्ला करण्याच्या पवित्र्यात तो समोर आला. आणि त्याचबरोबर आपल्या संपूर्ण शरीराचे वळसे तयार करून पुढे येण्याच्या बेतात होता. डोनाल्ड आपल्या लांब दांड्याने त्याच्यापर्यंत पोचू शकत नव्हता म्हणून तो वाट पाहू लागला. पण त्याची दृष्टीसापावर रोखलेली होती सापही आपल्या दोन दुष्ट काळ्या डोळयांनी त्याच्याकडेच पहात होता. आणि मग डोनाल्डने सापाशी संवाद सुरू केला, "ये ये माझ्या सोनुल्या, "अगदी हलक्या आणि लडिवाळ स्वरात चुचकारत तो बोलत होता. , "अरे किती चांगला मुलगा आहेस तू. तुला कोणी अजिबात धक्का लावणार नाही, काहीही इजा करणार

नाही, माझ्या लाडक्या, छकुल्या शहाणा आहेस तू. अगदी शांत रहा, अगदी निश्चिंत रहा"सापाच्या दिशेने चिमटा समोर धरून एक पाऊल त्याने पुढे टाकले.

सापाची त्यानंतरची हालचाल इतकी वेगवान होती की कॅमेऱ्याचा फ्लॅश त्या वेगात उडतो. एक शतांश सेकंदातच तो एकदम दहा फुटाचे अंतर हवेतच कापून डोनाल्डच्या पायाला डसला. त्या उडीतून कोणीही वाचू शकला असता असे वाटत नाही. सापाचे डोके डोनाल्डच्या गाईच्या कातड्याच्या बुटावर आपटल्याचा स्पष्ट आवाज मला ऐकू आला आणि लगेच त्याने डोके मागे वळवून घेऊन पुन्हा हल्ला करण्याच्या स्थितीत नेले.

"हा इथे तर चांगला मुलगा आहे, शहाणा मुलगा आहे "डोनाल्डने चुचकारणे सुरूच ठेवले. गाईच्या कातड्याच्या बुटामुळे सापाचा दंश त्याला होत नव्हता. "अरे किती चांगाला आहे हा. उगीच खवळू नकोस रे बाळा, शांत रहा"असे म्हणतच चिमट्याचे तोंड तो सापाच्या जवळ आणत होता. ते जवळपास फुटभर अंतरावर त्याने आणले, ""अगदी गोडुला आहेस तू, इतका शहाणा मुलगा आम्ही पाहिलाच नाही, किती सुंदर, शांत रहा माझ्या पिला, डॅडी तुला मुळीच दुखापत करणार नाही. "

डोनाल्डच्या उजव्या पायावर जिथे सापाने दंश केला होता त्या पायाच्या बुटाखालून गडद बारीक विषाची चिळकांडी वहात असलेली मला दिसली. साप एकाद्या ताणलेल्या स्प्रिंगसारखा पुन्हा दंश करण्याच्या तयारीत होता, "हलू नको बाळा, "डोनाल्ड म्हणत होता आणि "व्हॅम"अशा आवाजात चिमट्याची दोन टोके खाली गेली आणि सापाच्या लांबीच्या जवळपास मध्यभागी तो

आकडा हवेत फिरला आणि त्या सापाला डोनाल्डने जमिनीला खिळवून ठेवले. मला दिसत होते साप विजेच्या वेगाने वळवळ करत त्या चिमट्यातून स्वत:ला सोडवून घेण्याचा प्रयत्न करत होता पण डोनाल्डने त्याला असे काही जखडून ठेवले होते की तो सुटूच शकत नव्हता.

पण आता पुढे काय होणार मला समजेना. कारण त्या विजेच्या वेगाने वळवळणाऱ्या हिरव्या स्नायूंच्या लांबीला आपल्या हातात पकडून पोत्यात घालणे डोनाल्डलाच काय अगदी किंगकॉंगलाही शक्य नव्हते, आणि तसे करण्याचा प्रयत्न त्याने केलाच असता तर त्या सापाने त्याच्या डोक्यालाच दंश केला असता यात शंकाच नव्हती.

डोनाल्डने थंडपणे चिमट्याचा दाब कायम ठेवत सापाच्या भोवती आपली हालचाल चालू ठेवली व सापाच्या शेपटीकडील भागाकडे तो गेला आणि नंतर त्याच्या वळवळीकडे दुर्लक्ष करत दाब कायम ठेवून चिमट्याची टोके त्याने त्या सापाच्या डोक्याच्या दिशेने सरकवायला सुरवात केली. दाब कायम ठेवत अगदी शांतपणे अगदी एक एक मिलिमिटर चिमट्याची टोके तो पुढे सरकावत होता. तो पांढऱ्या शूभ्र भिवयांचा आणि डोक्यावरील केस काळे असणारा छोट्या चणीचा माणूस अगदी काळजीपूर्वक आणि शांतपणे आपल्या हातातील दांड्याची अगदी योग्य पद्धतीने हालचाल करत मिलिमिटर मिलिमिटरने अगदी त्वेषाने वळवळ करणाऱ्या सापाच्या तोंडाकडे तो पुढे सरकावीत आहे हे दृश्य जितके आकर्षक तितकेच भयकारी पण होते. खालच्या गालिचावर सापाच्या शरीर आपटण्याचा इतका जोराचा आवाज येत होता की

वर असणाऱ्या माणसाला दोन अगदी शक्तिशाली मल्लच कुस्ती खेळत आहेत असे वाटावे. चिमट्याची दोन टोके सापाच्या तोंडापाशी आल्यावर मात्र त्याने आपल्या उजव्या हातमोजे असलेल्या हाताने सापाची मान अगदी घट्ट पकडली आणि त्यानंतर त्याने चिमटा बाजूस टाकला आणि खांद्यावरचे पोते डाव्या हातात घेऊन सापाचे तोंड त्यात ढकलत त्याने त्याला पोत्यात सोडले आणि ताबडतोब पोते बंद करून सुतळीने त्याचे तोंड बांधले. बांधलेल्या पोत्यातही सापाची तडफड इतक्या जोरात चालू होती की त्यात पाचपन्नास दांडगे उंदीर चिडून उड्या मारत आहेत असा भास होत होता. डोनाल्डने मात्र अगदी किलो दोन किलो बटाटे भरलेले पोते असावे इतक्या शांतपणे ते पोते पकडले होते. आपला चिमटा त्याने उचलला आणि आम्ही उभ्या असलेल्या खिडकीकडे तोंड वळवून तो म्हणाला, "बिचारा कुत्रा, मुलांनी त्याला तश्या अवस्थेत पहाण्यापूर्वी त्याला येथून हलवायला हवे"

# १७. अर्धी चड्डी

टी. व्ही. या विषयावर दोन परस्परविरोधी मते आहेत आणि तसे असणे स्वाभाविकच आहे. काही जणांच्या मते टी. व्ही. पहाणे हा वेळेचा पूर्णपणे अपव्यय आणि त्यात मुळीच वेळ वाया घालवू नये. याच्या विरुद्ध मत असणारे मात्र बऱ्याच मालिका पहात वेळ घालवतातच शिवाय त्यावर अगदी दातओठ खाऊन चर्चा करण्यात आणखीही वेळ घालवतात. मी या दोन्हींचा आदर करतो व वेळ वायाच जात आहे असे वाटत असल्यास काही मालिका पहातो त्यात पहावीशी वाटणारी अशी एक मालिका " उंच माझा झोका " आहे. त्यातील वैशिष्ट्य म्हणजे त्यातील वेषभूषा. लहान मुलींना फ्रॉक, परकर पोलके हे पर्याय थोड्या दिवसात बाद होऊन एकदम नऊवारीत प्रवेश करावे लागते तर अगदी लहान मुलगेदेखील धोतर नेसून अगदी सहजपणे तो बोंगा संभाळतात याचे कौतुक वाटते. अर्थात त्याना धोतराला पर्याय केवळ लंगोटीचाच असल्यामुळे ते अपरिहार्य होते. आणि त्या काळात वयाच्या सातव्या आठव्या वर्षापर्यंत मुले लंगोटीवरच वावरत होती असे आचार्य अत्र्यांच्या आत्मचरित्राची साक्ष देऊन सांगता येईल

सुदैवाने आमच्या लहानपणापर्यंत मात्र काळानुरूप वेषभूषेत बराच बदल झाला होता. त्या आमच्या बालपणी घालावयाचा पोषाक सदरा चड्डी या नावाने ओळखला जाई. हाफ पॅंट ह्या शब्दाचा अर्थ मराठी भाषेत सापडत नाही अर्थात पॅंट यालाही मराठी पर्याय नाही. ही दोन्ही वस्त्रप्रावरणे भारतीय नाहीत त्याचा हा परिणाम असावा कदाचित इतर भारतीय भाषातही त्याना समानार्थी

शब्द नसावा. त्यामुळे आम्ही सदऱ्याखाली जे काही परिधान करत असू त्याला चड्डी असेच म्हणत. चड्डीचा रंग सहसा मळखाऊ म्हणजे खाकी किंवा गडद निळा. सातवी पास होऊन आठवीत म्हणजे हायस्कूलमध्ये गेला की विजारीची बढती मिळायची अर्थात ती पांढरीच असायची. म्हणजे शिवताना तिचा रंग तसा असे. पण जास्त विजारी शिवणे परवडत नसल्याने अर्धी चड्डी काही दिवस तरी कापड कमी व धुण्याचा खर्च कमी (मेहनत जरा जास्त) शिवाय टिकाऊ या सर्व गुणधर्मामुळे चालू असायचीच. आमच्या वर्गातल्या पोरी मात्र एकदा साडीत (त्यावेळी पातळात) प्रवेश केल्यावर त्यांच्यावर मात्र परत फ्रॉक किंवा परकर वापरण्याची पाळी येत नसे उलट तसा परतीचा प्रवास न करण्याचे बंधनच असे म्हणाना!

एकदा विजार वापरायला लागल्यावर मग परत हाफ पॅंट घालण्याचे आमच्या जरा जिवावरच येई. पण विजारच घालण्याच्या या हट्टापायी एकदा माझ्यावर चांगलाच अनचस्था प्रसंग ओढवला. त्यावेळी शाळेत शाईची दौत व टाक घेऊन जावे लागे. तसा मी घेऊन जात असताना एका मित्राच्या वात्रटपणामुळे शाईची दौत माझ्या पांढऱ्या विजारीवर जी पालथी झाली ती अगदी खिशाच्या खालच्या जागेवर व विजारीच्या त्या भागावर अगदी भला मोठा शाईचा डाग पडला. त्याच दिवशी शाळेत रवींद्रनाथ टागोरांची जयंती साजरी करण्याचा कार्यक्रम होता व त्याप्रीत्यर्थ माधव ज्यूलियन यांची आमच्या पाठ्यपुस्तकात असलेली " मी पाहूनि विभूति दोन " ही कविता म्हणण्यास मला शिक्षकांनी आज्ञा केली. घरी जाऊन विजार बदलून येण्यास वेळ तर नव्हताच पण असलाच तरी घरात दुसरी विजार तरी असायला हवी. अर्थात त्याच

परिस्थितीत मला कविता सादर करणे भाग पडले. विजारीवरील डागामुळे मी इतका संकोचलो होतो ( त्यावेळी दाग अच्छे होते है ही समजूत आली नव्हती) की सभामंचाजवळ जाऊन कविता म्हणताना माझे जास्त ध्यान कवितेपेक्षा खिशात हात घालून विजारीचा डाग पडलेला तेवढा भाग पकडून श्रोतृवर्गाचे त्या डागाकडे लक्ष जाऊ नये याकडेच होते. (खरेतर श्रोतृवर्गाचे दोन्हीकडेही लक्ष नव्हते. ) खिश्यातून हात घालून तो भाग पकडणे तसे अवघड जात असल्याने थोड्याच वेळात तो हातातून निसटायचा व पुन्हा पकडण्यासाठी हाताचा चाळा करावा लागायचा त्यामुळे पहाणाऱ्याना वेगळाच भास व्हायचा तरी मी कशीबशी कविता म्हणून टाकली. पण काही चाबरट मित्रांनी नंतर " काय रे कविता म्हणत असताना खिशात हात घालून तुझ्या विभूतींना फारच कुरवाळत होतास " अशी माझी फिरकी घेऊन मला चांगलेच हैराण केले.

शाळेतून कॉलेजला आणि तेही पुण्यासारख्या शहरात गेल्यावर मात्र अर्ध्या चड्डीला कायमचा रामराम ठोकला म्हटले तरी चालेल, तरी असावी एक म्हणून एक अर्धी चड्डी बरोबर घेतली होती पण ती घालण्याचे धाडस वसतीगृहात रहात असताना होत नसे मग कॉलेजात घालण्याचे तर नावच नको. आमचे वसतीगृह मित्रही इतके सभ्य की अंडरपॅंट घालून व्हरांड्यात फिरत असले आणि माझी पुण्यातली बहीण माझ्याकडे आली की लगेच झटकन खोलीत शिरून पायजमा घालूनच बाहेर यायचे. इतकेच काय एकदा तर माझा एक मित्र मला म्हणाला"अरे श्याम्या तू शेजारच्या खोलीतल्या देशपांड्याकडे आलास तर लगेच मी अंडरपॅंटीवर विजार चढवून बाहेर आलो " मी आश्चर्यचकितच झालो ते ऐकून. त्याला कारण विचारता तो म्हणाला "अरे मला

वाटले कोणीतरी पोरगीच आली आहे त्याच्याकडे "त्यावेळी माझा आवाज फुटला नसल्यामुळे मी बोलायला लागल्यावर एकादी पोरगीच बोलत आहे असा भास व्हायचा. बरे ते वय असे की पोरगी शेजारच्या खोलीतल्या विद्यार्थ्याकडे आली म्हटल्यावर पहाण्याची उत्सुकता दांडगी पण विजार घालून बाहेर आल्यावर पोरीच्या ऐवजी माझे दर्शन झाल्यावर चांगलाच हिरमोड व्हायचा.

आमच्या वर्गात काही पुण्यातील गुजराती मुले होती त्यातील एक शहा बराच स्मार्ट होता तो मात्र कधी कधी सॅटिन डकची हाफ पॅंट घालून यायचा आणि ती त्याला शोभतही असे. त्याचे पाहून वसतीगृहातील माझ्या एका मित्रालाही तशी स्फूर्ती झाली. म्हणून तोही त्याची ट्रंकेतली अर्धी चड्डी काढून एक दिवस घालून आला, पण त्याला फारशी कोणी दाद दिली नाही म्हणजे कौतुकही केले नाही किंवा नावे पण ठेवली नाहीत. त्यामुळे दुसऱ्या दिवशी मी पण माझ्या हाफ पॅंट्ला उजाळा द्यावा असा विचार केला पण आमच्या गुजराती भाईंनी माझा पुरताच मामा केला, "अबे क्या तुम हसमुख (त्या स्मार्ट शहाचे नाव) बनने जा रहे हो जरा आइनेमे देख" असे म्हणून त्यानी माझी पार खिल्ली उडवली त्यावेळपासून अर्धी चड्डी मी जी काही बॅगेच्या तळाशी टाकली ती एकदम आमचे संघशाखा दोस्त शाखेत येण्याचा हट्टच धरून बसले त्याचवेळी बाहेर काढली. नंतर त्यांचाही हाफपँट्च घातली पाहिजे हा आग्रह कमी झाल्यावर शाखेतही आम्ही पॅंट घालूनच जाऊ लागलो.

त्यानंतर मात्र अर्धी चड्डी कमीच वापरली गेली. केरळ ट्रिपमध्ये किंवा अमेरिकेतही बीचवर जाताना नाइलाज म्हणून मी अर्धी चड्डी घातली तरी ती उतरवून नेहमीची पॅंट केव्हां चढवतो असे मला होते. अमेरिकेत गेल्यावर तेथील बरेच पुरुषही हाफपॅंट किंवा बर्म्युडा वापरताना दिसले. एकदा तर उन्हाळ्यात संध्याकाळी मी फिरायला जाताना एक पुरुष फक्त हाफ पॅंट घालूनच (शर्ट किंवा बनियनही नाही) पळत चालला होता अर्थात त्यावेळी रस्त्यावर तो व मी याशिवाय एकादाच माणूस असेल. स्टीव्ह जॉब्ज तर अगदी त्याच्या नव्या संगणकाच्या उद्घाटनालाही अर्ध्या चड्डीत येत असे म्हणे. तेथे तर काय स्त्रियाही हाफच काय पाव पॅंटीतही वावरतात आणि तरीही त्यांच्याकडे कोणीच फारसे लक्ष देत नाहीत. आता आपल्याकडेही आमच्यासारखे ज्येष्ठ नागरिकही बर्मुडा म्हणजे अर्ध्या चड्डीची सुधारित आवृत्ती घालून आपल्या फुल पॅंट घातलेल्या नातवाला फिरायला बरोबर घेऊन बाहेर पडलेले दिसतात. तर आमच्या चिरंजीवांसारखे मध्यमवयीनही बिनधास्त अर्ध्या चड्डीत वावरताना दिसतात. (अर्थात तरीही अमेरिकेतील काही स्त्रिया घालतात इतकी आखूड नाही) अंगभर कपडे वापरण्याकडे आपल्याकडील बऱ्याचश्या स्त्रियांचा अजूनतरी कल आहे. अर्थात त्याविषयी मी अधिक काही म्हटल्यास एकादा मोर्चा निघण्याची शक्यता आहे. कदाचित सगळे पुरुष पूर्णपणे अर्ध्या चड्डीचा अंगिकार करतील तेव्हां त्याही त्याना तोडीस तोड उत्तर देईल अशी वेषभूषा करतील यात शंकाच नाही.

# १८. वजने, मापे काही जुने काही नवे!

कालच एक मित्र भेटले. त्यांच्याशी बोलताना सोन्याचा भाव किती वाढलाय याविषयी बोलताना ( आता फक्त बोलणेच शक्य आहे. ) पूर्वी शेराशेराने सोने घालायचे असा उल्लेख निघाला. पण मित्राच्या मते शेर हे वजनाचे परिमाण नसून मापनाचे होते असे आले, पण मला निश्चित माहीत होते की शेर त्यावेळी दोन्ही पद्धतीने वापरला जायचा. आमच्या गावच्या बाजारात मी खरेदीच्या भानगडीत पडत नसलो तरी बहिणींनी खरेदी करायची व आम्ही भारवाहक म्हणून काम करायचे अशी श्रमविभागणी होती त्यामुळे आपण किती वजन उचलत आहोत याची कल्पना असे. व ते वजन शेरात असे.

पण मजेची गोष्ट म्हणजे तेव्हा आमच्या भागात धान्यही वजनाऐवजी मापाने विकले व खरेदी केले जायचे व त्यासाठी सर्वात मोठे माप खंडीचे होते. त्याहून लहान मण व त्याखालोखाल पायली, अडिसरी, शेर, मापटे, चिपटे, कोळवे व निळवे अशी उतरंड होती. एका खंडीत वीस मण बसत. मणात मात्र दोन प्रकार होते त्यातील एक चाळीस शेरी तर दुसरा सोळा पायल्यांचा म्हणजे चौसष्ट शेरी त्याला बंगाली मण म्हणत काही प्रांतात तो बारा पायल्यांचाही असे म्हणे. पायली हे परिमाण चार शेराचे तर अडिसरी(अडशेरी) जरी अडीच शेराचे

असावयास हवे तरी प्रत्यक्षात दोन शेराचे असे. म्हणजे एका पायलीचा निम्मा भाग. मापटे, चिपटे, कोळवे व निळवे ही शेरापासून अर्ध्या पटीने कमी होत जाणारी मापे होती. धान्य जसे मापाने घेत असू तसे दूध, तेल असे द्रव पदार्थही अर्थातच मापाने घेत असू व त्यामुळेच मेल्या म्हशीला मणभर दूध हा वाक्प्रचार निघाला होता. या वाक्प्रचारावरून एकदा मला एका दैनिकाच्या वाचकांच्या पत्रव्यवहारात भाग घ्यावा लागला होता

दैनिकाच्या एका संपादकीयाला शीर्षक होते " गाभण गाईला खंडीभर दूध. " असे शीर्षक वाचून मी अगदी चक्रावून गेलो. कारण त्यातून त्या संपादकाचे मूळ म्हणीचे अज्ञान तर प्रकट होत होतेच त्याशिवाय व्यावहारिक ज्ञानही शून्य होते असे दिसले. त्यावर लगेचच एका वाचकाचे पत्र प्रकाशित झाले पण त्यात त्याने आणखीनच घोळ घातला होता कारण त्याने खंडी हे मापनाचे परिमाण नसून वजनाचे होते असे पुन्हा अज्ञानमूलक विधान केले होते. शेवटी मी एक पत्र पाठवून "गाभण गाय व्याल्यानंतर तिला दूध येते शिवाय मूळ म्हण मेल्या म्हशीला मणभर दूध (म्हणजे एकादी गोष्ट नष्ट झाल्यावर ती फार थोर होती असा गवगवा करणे) अशी आहे हे संपादकांच्या निदर्शनास आणले. त्यानंतर थोड्याच दिवसात त्या संपादक महाशयांनी त्या वृत्तपत्राचा निरोप घेतला अर्थात त्याला "गाभण गाय"कारणीभूत झाली असे काही म्हणता येत नाही. दुधाची म्हणजे द्रवमापनाची मापे मात्र शेर, अर्धा शेर, पावशेर व अदपाव अशीच होती. छटाक पण असावे, कारण त्यावरूनच छटाकभर दारू ढोसली

की कोणीही तत्त्वज्ञान सांगू लागते अशा अर्थाचे वाक्य एकच प्याला नाटकात आहे. अर्थात त्या वयात ते मला कळणे अशक्य होते.

त्यावेळी चार पैशांचा एक आणा, १६ आणे एक रुपया ही नाणी असल्यामुळे जेवढे पैसे शेरास तेवढे आणे पायलीस आणि तेवढे रुपये मणास असा तोंडी हिशेब करण्याचा सोपा उपाय असे. पाच शेरांचे एक परिमाणही होते व त्याला पासरी म्हणत. त्यावरूनच एकादी गोष्ट सहज उपलब्ध असेल तर " अशा गोष्टी पैशापायली पासरी मिळतात उगीच दिमाख दाखवू नको. " म्हण वापरण्यात येत असे. धडा म्हणून एक पासरीहून मोठे परिमाण पण होते आणि ते दोन पासरींएवढे होते. तो कदाचित दहाडा( दहा पदार्थ)चा अपभ्रंश असावा. रुपया सोळा आण्याचा असल्यामुळे पिकाचे प्रमाण सोळा आणे म्हणजे उत्तम व त्याहून कमी प्रतीचे म्हणजे दहा आणे, आठ आणे, चार आणे या पद्धतीने करण्यात येई. एकादे काम उत्तम पार पडल्यास " अगदी सोळा आणे काम झालं बघा" असेही म्हणण्याची प्रथा होती.

वजनातही खंडी, मण, शेर ही परिमाणे असत व त्याखालोखाल रत्तल म्हणजे अर्धा शेर, पावशेर म्हणजे शेराचा एक चतुर्थांश भाग, तर सव्वाशेर हे अधले मधले माप होते कारण ते रत्तलपेक्षा लहान होते तर पावशेरापेक्षा मोठे होते. म्हणजे पावशेर वीस तोळ्यांचा तर सवाशेर बत्तीस तोळ्यांचा. म्हणजे शेरास सव्वाशेर ही म्हण खऱ्या अर्थाने अयोग्यच होती. पावशेरापेक्षा छोटी

परिमाणे अदपाव, छटाक, औंस अशी होती. एक छटाक पाच तोळयांचा अर्थात एका शेरात १६ छटाक बसत.

सोने जरी शेराने घालणारी ( आताही किलोने घालणारी आहेतच) माणसे असली तरी खरेदी तोळयाच्या भावानेच व्हायची व त्यात सगळयात लहान परिमाण गुंज हे असे. हे परिमाण गुंज या वनस्पतीच्या बारीक गोळीसारख्या फळाच्या वजनाचे होते. या गुंजेच्या लालभडक रंगावरून रागावलेल्या किंवा आजारलेल्या माणसाचे डोळे गुंजासारखे लालभडक झाले आहेत म्हणत. आठ गुंजांचा एक मासा, बारा मासे एक तोळा अशी ती उतरंड होती. गुंजेला काही ठिकाणी रत्ती असेही म्हटले जाई व ते सगळयात कमी वजनाचे परिमाण असल्याने एकाद्याच्या बोलण्यात तथ्य नसल्यास "त्याच्या बोलण्यात रत्तिभर अथवा गुंजभरही सत्य नाही" असे म्हटले जाई.

वजनी शेर ऐंशी तोळयाचा असे. बडोद्यात भाजीपालाही वजनी शेराच्या परिमाणात मिळे व मोठ्या प्रमाणात भाजीपाला घेणाऱ्यांसाठी खंडेराव मार्केट या प्रमुख बाजारात बाजाराचा स्वतंत्र भागच होता त्या बाजारास पाच शेरी बाजार म्हणत. (अजूनही ते नाव चालूच आहे म्हणतात) तेथे कमीतकमी पाच शेर तरी भाजी घ्यावीच लागे.

इंग्रजांचा अंमल असून वजनात पाउंड कसा शिरला नाही हे आश्चर्यच आहे. मात्र माणसाचे वजन मात्र पौंडात असे. (शेरात नसे)पण त्या पद्धतीचे शेराशी तुलनात्मक मूल्य त्यावेळी आम्हांस माहीत होते. शेर पाउंडच्या जवळ जवळ दुप्पट वजनाचा म्हणजे पाउंडाला भारीच होता. त्यानंतर नवी परिमाणे वापरात येऊ लागल्यावर आलेला किलो मात्र शेरालाही भारी होता. त्याचे जुन्या परिमाणाशी तुलनात्मक मूल्य एक किलो शाण्णव तोळ्यांचा असे होते. ब्रिटिश वजनांचा परिणाम मण या परिमाणावर दिसतो कारण तो शब्द Mound या ब्रिटिश परिमाणाचे अपभ्रष्ट रूप आहे. तसेच ब्रिटिश औंस (Ounce) पण वजनात शिरला व तो पौंडाचा १६वा भाग होता तर एक छटाक दोन औंसाचा होता

मात्र आम्ही अभियांत्रिकी महाविद्यालयात शिकताना ब्रिटिश पद्धतीची वजने मापे आम्हाला अभ्यासक्रमात वापरावी लागली व त्यात प्रामुख्याने पौंड हे वजनाचे, तर गॅलन हे मापनाचे परिमाण होते. त्या पद्धतीला एफ. पी. एस. ( म्हणजे फूट पौंड सेकंड) पद्धती असेच म्हणत. वजनाचे सर्वात भारी परिमाण टन होते व ते २२४० पौंडाचे होते. या दोन्हींच्या मधले हंड्रेडवेट ११२ पौंडाचे. त्यावेळी वजन करण्याच्या यंत्रांवर वजन स्टोन व पौंड मध्ये मिळे व त्यामागे "आपका भाग्य जल्दही खुलेगा" वगैरे आपल्याला आनंदित करणारे भविष्य असे. त्या भविष्यावर अं. नि. स. ने बंदी घातली नव्हती (आता तरी कुठे आहे म्हणा?) हा स्टोन म्हणजे दगड १४ पौंडाचा असे. त्यानंतर मेट्रिक परिमाणे

व्यवहारात आली तरी शासकीय धोरणानुसार काही काळ दोन्ही पद्धती चालू राहिल्यामुळे विद्यार्थ्यांना व त्यांना शिकवणाऱ्या आम्हाला या दोन पद्धतींची तीन पायांच्या शर्यतीची कसरत बरीच वर्षे करावी लागली. त्यानंतर अभ्यासक्रमात आणखी एक बदल घडून आला व त्यात मेट्रिक पद्धतीची जागा एस. आय. पद्धतीने घेतली पण त्याचा वजनामापावर फारसा परिणाम झाला नाही.

आश्चर्य म्हणजे ब्रिटिश मापन पद्धतीचा ब्रिटनने त्याग करून मेट्रिक पद्धत अवलंबली तरी अमेरिकेत मात्र अजून पौंड, औंस व गॅलनच आहेत. (अर्थात त्यामागे आम्हीच तेवढे शहाणे हे दाखवण्याचा अमेरिकी बाणाच आहे) त्या तुलनेत दशमान पद्धतीतील नाणेपद्धत, वजने व मापे यांच्याशी आपल्याकडील खेड्यातील लोकांनीही अतिशय झपाट्याने जुळवून घेतले असे म्हणावे लागेल.

अभियांत्रिकी आकडेमोड करताना ब्रिटिश आणि एसआय एककांत गल्लत झाल्याने यान मंगळावर उतरण्याऐवजी कोसळले होते, ते सगळयांना आठवत असेलच.

अमेरिकेतील पाठ्यपुस्तकांत मापनपद्धतीतील फरक सांगताना हे उदाहरण दिलेले दिसले. साधारणपणे सत्तरच्या दशकाच्या उत्तरार्धात आमच्या कार्यालयात ’पास्कल’ ह्या प्रोग्रामिंग लॅंग्वेजचे वारे वाहू लागले होते.

पास्कलचे पुरस्कर्ते फोर्ट्रानमधील मर्यादा किंवा त्यांच्या मते चुका वगैरे दाखवून पास्कल कशी चांगली आहे हे पटवून देत असत. तेव्हा एक नुकताच महाविद्यालयातून बाहेर पडलेला मुलगा अगदी तावातावाने सांगत असे की अमेरिकेच्या अपोलो आघाड्यांपैकी एक केवळ प्रोग्राम मधील चुकीमुळे अयशस्वी झाली होती. त्यासंबंधीचा प्रोग्राम फोर्ट्रान मध्ये होता आणि एक वेरिएबल डिक्लेअर केलेला नव्हता त्यामुळे असे झाले. त्याचे खापर अर्थातच फोर्ट्रान वर फोडले गेले कारण 'वेरिएबल डिक्लेअर करणे' ही गोष्ट फोर्ट्रान ने वैकल्पिक ठेवली होती. ती आवश्यक केली असती तर असे झाले नसते. Hideएक विमान इंधन अचानक कमी झाल्याचे....... प्रे. सुधीर कांदळकर (गुरु, २९|०३|२०१२ - स ६:३०)

लक्षात आल्यामुळे संकटकालीन उपाय योजून भलतीकडे उतरवावे लागले. ते विमान अखेर कोसळलेच. नंतर झालेल्या चौकशीत आढळून आले की इंधन भरणाऱ्या कर्मचाऱ्याने मीटरवरील वाचन गॅलनमध्ये आहे असे गृहीत धरून इंधन भरले. प्रत्यक्षात ते लिटर्समध्ये होते. ही कथा डिस्कव्हरीवर दाखवली होती. काम केलेल्यांच्या, चौकशी करणाऱ्या तज्ञांच्या मुलाखती देखील त्यात होत्या. एवढे इंधन भरले तरी दर्शकाचा काटा 'फूल्ल' का दाखवीत नाही असा प्रश्नही त्या विमानचालकाला पडला होता. पण दुर्दैवाने परिस्थितीचे अचूक निदान झाले नाही. विमानातल्या दर्शकात चूक असेल असेच गृहीत धरले गेले आणि अपघात घडला. इंधन स्थानकातले अभिलेख तपासून पाहिल्यावर तज्ञांना चूक कळली. अशी चूक पुन्हा होऊं नये यासाठी आता योग्य

ती खबरदारी घेतली जाते. मी चित्रवाणीवर ते पाहिल्याला एकदोन वर्षे झाल्यामुळे आता विमान केव्हा कुठून कुठे चालले होते, अपघात कुठे घडला वगैरे बरेचसे तपशील बरोबर आठवत नाहीत. पण फारशी जुनी गोष्ट नसावी.

अमेरिकेत अंतरे जास्त असल्यामुळे प्रवास करतांना दीर्घ अंतराचा मानसिक दबाव येऊ शकतो. तो येऊ नये म्हणून मैल आणि गॅलन ही परिमाणे वापरली जातात असे नेहमी वाचायला मिळते. ऑस्ट्रेलिया, ब्राझील, चीन, हे देश पण आकाराने मोठे आहेत. तिथे कोणती मापनप्रणाली आहे ठाऊक नाही.

पासरी या शब्दाचा अर्थ प्रथमच ठाऊक झाला. 'धडा' ही माहिती नवीनच कळली. नमनाला तेल असते ते घडाभर की धडाभर असा देखील प्रश्न पडू शकतो. बंगाली मण हा शब्द चालीसेक वर्षापूर्वी किराणा दुकानदार चुलतभावाने सांगितला होता. १९६४ साली कोकणात ब्रिटीश आणि दशमान अशा दोन्ही पद्धतीत माल मागितला जायचा. पण दिला जायचा दशमान पद्धतीतच.

स्कूटरच्या, गाडीच्या रबरी चाकात हवा भरायच्या ठिकाणी दाबमापकावर अजूनही किग्रॅ. /चौसेमी तसेच पौंड/चौइंच दोन्ही पद्धतीतले आकडे आढळतात.

एक माहितीपूर्ण पण रंजक लेख वाचायला मिळाला. बंगाली मण ही शब्दयोजना वाचतांना त्याच्या दुकानातल्या गूळ, तेल, धान्य, इ. च्या संमिश्र गंधासहित अचानक आठवल्या. धन्यवाद.

Hideपाउंड आणि रत्तल प्रे. शुद्ध मराठी (शनि, २१|०४|२०१२ - रा १०:५८)

इंग्रजांचा अंमल असून वजनात पाउंड कसा शिरला नाही हे आश्चर्यच आहे. शिरला होता. चहा-कॉफी -कोको पौंडात मिळायचे. तसेच हॉर्लिक्स, ओव्हलटिन, बार्ली यांच्या बाटल्या किंवा डब्यांवर आतील मालाचे वजन पाउंडात लिहिले असायचे. बिस्किटाचे किंवा इतर वस्तू ठेवण्याचे पत्र्याचे डबे यांचे माप पाच-पौंडी डबा, ३५-पौंडी डबा असे पौंडात सांगितले जायचे. माणसाचे वजन पौंडात असे. लहान बाळाचे वजन तर अजूनही पौंडात सांगतात. छापखान्यासाठी लागणाऱ्या कागदाचा दर्जाही अजून पौंडात मोजतात. २४ पौंडी कागद म्हणजे कागदाची प्रत अशी की, ठरावीक मापाच्या त्या कागदाच्या ५०० तावांचे वजन २४ पौंड असेल. (चू. भू. द्या. घ्या. ).

मुंबईत तर वजनी शेर जवळजवळ नव्हताच. पौंड हेच तिथले वजन होते. मात्र त्याला मुंबईत रत्तल म्हणत. अगदी किलो आला तरी काही वर्षे रत्तल हे वजन व्यवहारात होते. दादरच्या भाजी बाजारातून रत्तल गेल्यावर त्याची जागा

'अर्ध्या किलो'ने घेतली. (मुंबईच्या काही उपनगरांत ४०० ग्रॅमने! ) नक्की माहीत नाही, पण कदाचित अजूनही दादरला भाजी अर्ध्या किलोत मोजत असतील.

पुण्यातले भाजीवाले ५०ग्रॅमला छटाक म्हणतात, आणि १०० ग्रॅमला अदपाव. अगदी आजही!मला वाटते की एक अडिशेरी म्हणजे वजनी अडीच शेर परंतु मापी दोन शेर. पायली हे माप होते आणि पासरी हे वजन, हे वर आलेच आहे. मण आणि खंडी ही एकके वजनांत आणि मापांतही होती हेही वर आले आहे. मापटे, चिपटे, कोळवे, निळवे येऊन गेले, पण निठवे आले नाही.

मापटे(= मापी अर्धा शेर) म्हणजेच निठवे. म्हणजे, एक निठवे = ८ निळवे.

याशिवाय टाक नावाचे एक वजन/माप होते. ९ मासे = १ टाक. १ नवटाक(म्हणजे ९ टाक) = अर्धा पावशेर. ८ नवटाक = ७२ टाक = १ शेर. अर्थात हा शेर, ८० तोळ्याच्या पक्क्या शेरापेक्षा लहान होता.

गुंज किंवा रत्तीपेक्षा हलके वजन होते. ३ बार्लीचे दाणे किंवा ४ तांदळाचे दाणे म्हणजे एका गुंजेचे वजन. म्हणून ४ धान = १ रत्ती(गुंज) आणि

६ गुंजा = १ आणा.

याशिवाय मुंबई बाजारात पुढील वजने चालत. : ४ सिकी = १ तोळा; ५ सिकी= १ कांचा; ४ कांचा=१ छटाक.

बंगाली वजने आणखी वेगळीच होती. ५ छटाक= १ कुंक; २ कुंक = १ खुंची; २ खुंची = १ रेक; २ रेक =१पाली; २ पाली = १ दोण; २ दोण = १ काटी; ८ काटी= १अरबी; २० अरबी = १ बिश; १६ बिशी = १ कहान.

१६ पाली = १ मण; ८ दोण=१मण; ३२ रेक = १ मण; २० दोण =१ साली. वगैरे. वरील वजनांमध्ये अधोलीचा उल्लेख झालेला दिसला नाही. अधोली म्हणजे अर्धी पायली(दोन शेर).

बंगालमधल्या वजनांचा निर्देश वर झाला आहे. अशीच विविध नावांची वजने-मापे भारतात होती. मद्रास राज्यात पालम आणि वीस नावाची वजने आणि ओळळक, पड्डी, मरकळ, फरा आणि गारी नावाची मापे होती. महाराष्ट्रात चिमूट, मूठ, पसा(ओंजळ), फुलपात्र, सूप आणि परात हीही अंदाजे मापण्याची मापे होती, आणि अजूनही आहेत. ब्रिटिशांनी चहाचा चमचा, टेबलस्पून, डेझर्ट स्पून आणि चहाचा कप ही मापे आणली. एक चहाचा चमचा म्हणजे पाच मिलिलिटर. एक कप म्हणजे चार औंस. रेल्वेतला मोठा कप ७ औंसाचा होता. तो आता कुठे दिसत नाही.

पाणी मोजण्यासाठी, भांडे, तांब्या, पातेले, बोगणे, कळशी, हंडा आणि घंगाळे ही मापे पूर्वापार चालत आली आहेत, आणि आता त्यांत बादलीची आणि पिपाची भर पडली आहे. तेल किंवा आमटी-पातळ भाजी वगैरे मोजण्यासाठी पळी हे माप प्रचलित आहे.

माती, वाळू वगैरे घमेल्यांनी मोजतात. जास्त माती-वाळू असेल तर ती टेंपो आणि ट्रक या मापांनी मोजतात. सदतीस घमेली बागेची माती म्हणजे एक टेंपो माती. बांधकामाचे मोजमाप ब्रासमध्ये होते. पाच फूट उंच आणि दहा फूट लांब अशा एकेरी विटेच्या भिंतीचे बांधकाम म्हणजे एक ब्रास बांधकाम. (चूभूद्याघ्या)

धरणाचे पाणी घनफूट, घनमीटर किंवा दशलक्ष लिटरमध्ये मापतात, तर पाण्याचा उत्सर्ग क्यूसेक्समध्ये. प्रख्यात भारतीय गणिती भास्कराचार्यांच्या 'सिद्धांतशिरोमणी'मधला ‘लीलावती' हा प्रथम खंड ६००हून अधिक वर्षे भारतभर पाठ्यपुस्तक म्हणून अभ्यासला गेला. त्यातले पहिलेच प्रकरण ‘परिभाषा, म्हणजेच तत्कालीन एकके व त्यांची कोष्टके यांसंबंधी आहे.

अंतर मोजण्यासाठी, आठ यवांचे (एकमेकांना टेकवलेल्या आठ जवसाच्या दाण्यांचे) एक अंगुळ, २४ अंगुळांचा एक हात, चार हातांचा एक दंड, २००० दंडांचा एक कोस - ही एकके भास्कराचार्यांनी सांगितली आहेत.

घनफळासाठी ‘खारीचा १६वा भाग द्रोण, द्रोणाचा ४था भाग आढक, आढकाचा चौथा हिस्सा प्रस्थ आणि प्रस्थाचा चौथा भाग कुडव.

४ मुष्टी (मुठी) = १ निष्टिका

२ निष्टिका = १ अष्टिका

२ अष्टिका = १ कुडव

४ कुडव= १ प्रस्थ

४ प्रस्थ = १ आढकी

४ आढकी = १ द्रोण

१६ (कधीकधी २०) द्रोण = १ खार (कैली)

शिवाय ‘गुंजा- मासा- कर्ष- पल- ही सोने तोलण्याची एकके होती.

भास्कराचार्यांच्या काळी,

५ गुंजा = १ मासा

१६ मासे = १ तोळा (कर्ष)

४ कर्ष = १ पल

पुढे पेशवाईत,

८ गुंजा= १ मासा

१२ मासे = १तोळा

८० तोळे= १ पक्का शेर ही प्रमाणे झाली.

भास्कराचार्यांनी दिलेली कवड्या-काकिणी-पण-द्रम्म’ ही चलनातील नाणी :-

२० कवड्या = १ काकिणी ( दमडी)

४ दमड्या = १ पण (पैसा)

४ पण = १ द्रम्म (पावली-चार आणे)

# १९. दा. मि. ट!

दा. मि. ट. म्हणजे काय बुवा या उत्सुकतेने तरी लेख वाचायला सुरवात केलीत ना? तर मग माझा एक हेतु सफल झाला. हल्ली "मनोगत" वरील प्रतिसादांच्या दुष्काळामुळे आपला लेख कोणी वाचते का नाही याची शंकाच असते. (मनोगत एक )आणि सगळेच काही एमिली डिकिन्सनसारखे "स्वान्तसुखाय" लिहिणारे नसतात. लेख कोणीतरी वाचावा ही इच्छा असणारच ना!

तर आता लेख वाचायला सुरवात केल्यावर सांगायला हरकत नाही हे एक लघुरूप आहे. पण खरे तर हल्ली व्हॉटस् ॲप किंवा फेसबुकवरच विहार करणाऱ्या वाचकांपैकी सर्वांनीच हे कश्याचं तरी लघुरूप आहे हे नक्कीच ओळखले असणार. त्यातीलही काही लघुरूपे तर अगदी सर्वज्ञात झाली आहेत. लंबेचवडे शब्द लिहिण्यामागील आळसामुळे किंवा आता वेळच फार कमी असल्यामुळे किंवा संदेश लवकर पाठवला जावा या मानसिकतेमुळे असे होणे अपरिहार्य आहे. असो तर दा. मि. ट. हे आहे केवळ पुरुषाला लाभलेल्या दाढी, मिशा आणि टक्कल या तीन अलंकारांचे पहिले अक्षर घेऊन केलेले लघुरूप!

दाढी, मिशा हे पुरुषाचे अलंकारच नाहीत का? नाहीतर विराट कोहली ते अगदी अमिताभ बच्चन अश्या नामवंतांनी इतक्या निगुतीने त्यांची काळजी

उगीचच का घेतली असती?अब्राहम लिंकन ते राष्ट्राध्यक्ष होण्यापूर्वी त्यांना एका छोकरीने दाढी वाढवण्याचा आग्रह केला, त्यामुळे त्याच्या व्यक्तिमत्त्वात सुधारणा होऊन अमेरिकन अध्यक्ष म्हणून त्यांची निवड होण्याची तिनं ग्वाही दिली होती. आणि खरेच तसे घडले. अर्थात त्यात त्याच्या दाढी मिशांचा वाटा किती यावर वाद होऊ शकेल. मध्ययुगीन काळात दाढी आणि मिश्या हा पुरुषाच्या अभिमानाचा विषय समजण्यात येत असे. छ. शिवाजी महाराज, त्यांचे पिता शहाजी महाराज व पुत्र संभाजी राजे यांची दाढी मिशांशिवाय कल्पनाही आपण करू शकत नाही. पु. ल. देशपांडे यांनीही खेड्याच्या ठिकाणी नाटक बसवताना त्यात श्रीचे काम करणाऱ्या पुरुषपात्राने मिश्या काढण्यास नकार दिल्याचा किस्सा सांगितला आहे त्याचे कारण विचारता त्याने "माझा बा जित्ता आहे असे दिले होते आणि प्रेक्षकानीही त्याचा बा जित्ता आहे याची जाणीव राखून त्याच्या कामाचे कौतुक केले होते.

आपल्या दाढी मिश्यांच्या लांबीमुळे वा विशिष्ट आकारामुळे गिनेस च्या जागतिक विक्रमात नोंद करणारे बहाद्दरही आहेत. अश्या व्यक्तींच्या दाढी मिश्यांचे अगदी प्रदर्शन घडवून त्यातील उस्तादांचा गौरवही करण्यात येतो. दाढीमिश्यांच्या आकार व प्रकाराची स्पर्धा दर दोन वर्षांनी भरते. तिचा प्रारंभ इटालीमध्ये १९७० मध्ये झाला व त्यानंतर जर्मनी, नॉर्वे, स्वीडन, अमेरिका, ब्रिटन अश्या सर्व देशांमधून एक वर्षा आड या स्पर्धा भरत आल्या आहेत. या वर्षीही ती स्पर्धा १ ते ३ सेप्टेंबर या काळात अमेरिकेतील ऑस्टिन या टेक्सास स्टेटमधील शहरात होणार आहे.

ज्या आपल्या देशात दाढी मिश्यांना शिवकालात इतका मान होता त्याच भारतात मधल्या काळात त्या गोष्टीकडे दुर्लक्षच झाले म्हणावे लागेल पण आता पंतप्रधानानीच मनावर घेतल्यावर मग काय विचारता? निरनिराळ्या क्षेत्रातील नामवंतांनीही ही बाब चांगलीच मनावर घेतलेली दिसतेय. त्यात क्रिकेटपटूंचा प्रामुख्याने उल्लेख करावा लागेल. मॅच हरल्यावर मिशा पाडण्याची व जिंकल्यास त्या वर उचलून पिरगाळण्याची सोय त्यात आहे.

दाढी मिश्यांच्या बाबतीत भारत अजून विकसनशील देशांतच जमा होत असला तरी अगदी कोवळ्या वयात ( वयाच्या २४ व्या वर्षी )अधिक लांबीच्या दाढी मिश्या असणारी युवती मात्र तिच्या हरनाम कौर या नावावरून जरी ती अमेरिकेत बर्कशायर येथे रहात असली तरी भारतीय वंशाची असावी असे वाटते आणि ही बाब भारतातील दाढी मिश्यांवाल्यांनी मिशा ताठ कराव्या अशीच नाही का? अर्थात त्या युवतीच्या दाढी मिश्यांची लांबी तिच्यासारख्याच दाढी मिश्या असणाऱ्या जगातील स्त्रियांच्या तुलनेमधील आहे. हो! जगात अश्या स्त्रिया आहेत की ज्यांना दाढी आणि मिश्याही आहेत. आणि २१ व्या शतकात त्यांची संख्या वाढत्या प्रमाणात आहे. स्त्रियांना दाढी मिश्या आल्या तरी त्यामुळे लाज वाटून त्या शक्यतो दिसू नये या दृष्टीने त्यांनी त्यांची विल्हेवाट लावणे हे अपरिहार्य होते पण काही स्त्रियांना ते शक्य न झाल्याने त्यांना त्या वाढू देणेच इष्ट वाटलेले दिसते आणि सुदैवाने त्या दाढी मिश्यांसह स्वीकारणारे पुरुषही काहींना लाभले हेही कौतुकास्पद! ओरेगॉनमधील ४३ वर्षाच्या रोझ गेल या स्त्रीने २५ व्या वर्षापर्यंत दाढी करून आपला चेहरा गुळगुळीत ठेवून आपला हा

कमीपणा झाकण्याचा प्रयत्न केला. अनावश्यक केसांच्या या वाढीमुळे तिचा आत्मविश्वास कमी झाला, समाजात वावरणे अवघड झाले पण तिची त्वचा अतिशय नाजुक होऊन त्यावर कुठलाही धातूचा स्पर्श करणे कठीण झाल्यावर तिला नाइलाजाने दाढी मिश्या वाढवण्याचा निर्णय घ्यावा लागला व तिने त्या मिरवायला सुरवात केल्यावर तिचा आत्मविश्वास वाढला. तिच्या आईने तिला याबाबतीत खूपच पाठिंबा दिला.

पण टक्कल या खरे तर व्यंगास केवळ पुरुषाचा अलंकार म्हणणे कितपत योग्य आहे असा सवाल कोणीही करेल. टक्कल हे फक्त पुरुषांनाच पडते आणि स्त्रियांना नाही का असाही प्रश्न काही पुरुष विचारतील. पण टक्कल स्त्रियांना फार कमी पडते ही गोष्ट खरी. जन्मत: डोक्यावर मुळीच केस नसलेल्या बालिका असू शकतात पण पुढे त्यांना (डोक्यावर)भरघोस केस उगवतात.

पुरुषाचे टक्कल बहुधा शिरोभागाशी सुरू होऊन हळू हळू ते पसरत पूर्ण मस्तकाचा ताबा घेते. बहुधा टक्कल पडायला लागण्याची वर्दी आपण ज्याच्याकडे आपला केशभार हलका करण्यासाठी आपले मस्तक देतो तो कारागीरच देतो. आपले डोके प्रेमाने कुरवाळताना एकदम चमकल्यासारखे दाखवून आणि खरे तर आपल्यालाच चमकायला लावून तो "साहेब वरचे केस कमी व्हायला लागलेत. "असा हलक्या आवाजात इशारा देतो तेव्हां लगेचच त्याच्यावर विश्वास ठेवणे आपल्याला जड जात असते कारण नुकतेच आपण आपल्या दाट केसावर कंगवा फिरवलेले आपल्याला आठवत असते. पण मग तो आरसाच डोक्यामागे फिरवून अल्प स्वरूपात दिसणाऱ्या गोलघुमटाचे दर्शन

आपल्याला घडवतो तेव्हां या अलंकाराचे उच्चाटण करण्याच्या पद्धतींचा आपण विचार करू लागतो. पूर्वी दररोजच्या पेपरमध्ये कधीच लक्ष दिल्या न जाणाऱ्या केशवर्धक व टक्कलनाशक औषधांच्या किंवा उपायांच्या जाहिराती आपले लक्ष वेधून घेऊ लागतात, त्यात पूर्वी म्हणजे गोलघुमटदर्शक मस्तक व नंतर म्हणजे अगदी भरघोस केसाने व्यापलेले असे दोन फोटो हटकून असतात ते एकाच व्यक्तीचे असतात पण ते फक्त पूर्वी व आत्ता या शब्दांची फिरवाफिरव करून छापलेले असतात ही गोष्ट ध्यानात आली तरी ती मनावर घेण्याची आपली इच्छा नसते आणि एका अनावश्यक आणि परिणामी व्यर्थ ठरणाऱ्या खर्चाची टाच आपल्या खिशाला बसते आणि खिशाला लागलेल्या गळतीमुळेच की काय डोक्यावरील केसांची गळती आणखीच वाढते आणि प्रत्येक वेळी आपल्या केश कर्तन कारागिराचे काम आपण अधिकाधिक हलके करत आहोत याची जाणीव त्याच्याकडूनच आपल्याला मिळत रहाते.

कधी कधी टकलाची सुरवातच समोरून झाल्यावर बरेचजण मागे वाढणारे केसच अधिक वाढवून त्यांचे आवरण या केशविहीन मस्तकावर चढवून आपल्या टकलाचे गुपित काही काळ उघड होऊ देत नाहीत पण जसजसे त्याचा विस्तार वाढू लागतो तसतशी ही त्यांची क्लुप्ती लागू होण्याची शक्यता मावळते. काही पुरुष मात्र आपल्या टक्कलाला अलंकारासारखे मिरवतात. अगदी भरघोस केस असूनही डोक्याचा तुळतुळीत गोटा करण्याची पद्धत टिळक, आगरकर काळात होतीच की. आणि सध्याही काही नट सिनेमासृष्टीत आपल्या टक्कल या वैशिष्ट्यामुळेच अधिक मागणी असलेले आहेतच ना

टक्कल हे अलंकार आहे या माझ्या समजुतीला केवळ माझे टक्कलशोभित शिरकमल हेच कारण असावे असे समजणाऱ्या वाचकांना माझा एक अनुभव सांगितल्यास माझ्यावर हा आरोप होणार नाही. माझ्या एका मित्राच्या मुलाचे नुकतेच लग्न बरेच लांबले. खरे तर त्याला कारण त्याचे शिक्षणासाठी अमेरिकागमन हे होते. पण त्याच्या आई वडिलांना मात्र आपल्या मुलाला टक्कल आहे म्हणूनच चांगली बायको मिळत नाही असे वाटत होते त्यामुळे त्या मुलापेक्षाही तेच त्याचे टक्कल नाहीसे व्हावे म्हणून अधिक प्रयत्नशील होते. त्याच काळात केशारोपण हा उपाय त्यांच्या निदर्शनास आला व त्या उपायाने आपल्या मुलाच्या डोक्यावर भरघोस केस उगवलेले पहावे असा त्यांचा मनोदय झाला. परदेशी असणारा त्यांचा मुलगा भारतात आल्यावर त्याला मुली दाखवणे या कार्यक्रमाबरोबरच केशारोपणाचा प्रयोग त्याच्या (डोक्या)वर करण्याचेही नियोजन त्यांनी केले होते. त्यांनी पाहून ठेवलेल्या मुलीच्या स्थळांना त्याने भेटी दिल्या आणि योगायोगाने त्यातील त्याला एक पसंत पडली आणि तिलाही तो!

लग्न ठरले पण आईवडिलांनी अगोदरच ठरवल्याप्रमाणे लग्नापूर्वी त्याचे केशारोपण करायचे ठरवलेले पूर्वनियोजनाप्रमाणे त्यानी पार पाडले. केशारोपण नाही म्हटले तरी बरेच त्रासदायक होते. (एक प्रकारची शस्त्रक्रियाच ती, शिवाय त्यासाठी मुलीकडून हुंडा मागणेही योग्य नसते. ) लग्न पार पडले आणि नववधू व त्यांचा मुलगा एकमेकांस प्रथम एकांतात भेटले तेव्हां तिने पहिला प्रश्न टाकला " हे काय तू केस कशाला लावून घेतलेस? " यापुढील तिचे उद्गार ऐकल्यावर

मात्र त्याला "हेचि फळ काय मम तपाला" असे वाटले कारण ती म्हणाली, "मी त्यापूर्वी तुला पाहिले तसाच तू चांगला दिसत होतास. " थोडक्यात टक्कलही कधी कधी आणि काही काही जणांना शोभून दिसू शकते म्हणजे त्याला अलंकारच म्हणायला नको का? दामिट (डॅम इट ) म्हणून लेख वाचणे तुम्ही बंद करण्यापूर्वी आणि लेख आणि पुस्तकही संपवणेच इष्ट ठरेल. नाही का?

# २०. सुबत्ता की (आणि ) चंगळवाद

सुबत्ता की चंगळवाद? याचबरोबर सुबत्ता आणि चंगळवाद अश्या दोन पद्धतीने या द्वयीविषयी विचार होऊ शकतो. पहिल्या पद्धतीनुसार सध्या जी परिस्थिती दिसते ती सुबत्ता म्हणता येईल की चंगळवाद आहे तर दुसऱ्या पद्धतीने विचार केल्यास सुबत्ता ही चंगळवादाला कारणीभूत आहे का असा विचार करता येतो.

चंगळ या शब्दाचा आपण कसा अर्थ करतो यावर हे अवलंबून आहे तीच गोष्ट सुबत्तेविषयी म्हणता येईल. अगदी साधे अंघोळीचे उदाहरण घेतले तर ज्या काळात मुंबईत पाणी मुबलक मिळत असे (आताही काही भागात ते मुबलक मिळते) त्या काळात डॉक्टर ह. वि. सरदेसाई यांचे वडील मोजून एक बादली पाण्याने अंघोळ करायचे कारण पाणी जरी भरपूर असले तरी आवश्यकतेपेक्षा जास्त वापरणे ही पाण्याची उधळपट्टी (म्हणजे आजच्या भाषेत चंगळवादच आहे ) असे त्यांचे मत होते. अंघोळीसाठी मोठा टब भरून पाणी वापरणे किंवा शॉवरबाथखाली तासभर अंघोळ करणे ही तर चंगळवादाची हद्दच झाली.. त्यामुळे इतरत्र पाण्यासाठी टॅन्कर लावावे कागत असले तरी पुण्यातील सोसायट्यामध्ये मात्र दररोज गाड्या पाण्याने धुतल्या जातात हे चंगळवादाचेच उदाहरण आहे. पाण्याची सुबत्ता असल्याचे नाही. म. गान्धींचे याबाबतीत आचरण म्हणजे अगदी टोकाचा आदर्शवाद म्हणता येईल कारण एक कागदाचा कपटाही ते जपून ठेवत व त्याचा कच्चे लेखन करण्यासाठी उपयोग करत.

चंगळवाद की सुबत्ता या शीर्षकाचा अर्थ चंगळवाद चालू असेल तर सुबत्ता असते असे समजायचे का?असतेच असे नाही कारण सुबत्ता ही सर्वसमावेशक असेल तरच तिला सुबत्ता म्हणता येईल. सर्वांना पोटभर अन्न मिळत असेल तर जेवणाच्या पंक्ती उठवणे यास दातृत्व असे गोंडस नाव तरी देता येईल पण एकीकडे शेतकरी आत्महत्या करत असताना जेवणावळी, लग्नसमारंभ यावर अलोट पैसा खर्च करणे हा चंगळवादच आहे यात काही संशय नाही त्यामुळे त्यांचे प्रमाण वाढणे हे सुबत्तेचे लक्षण आहे असे म्हणता येणार नाही. ज्यांच्याकडे पैसा आहे ते अंगाखांद्यावर सोन्याचे दागिने घालून इतकेच काय पण सोन्याचा उपयोग केलेला पोषाख अंगावर घालून त्या संपत्तीचे जे किळसवाणे प्रदर्शन करतात ते तर उबग आणणारे असते. या बाबतीत समाजाकडूनही हटवादी भूमिका घेतली जात असल्यामुळे लग्नच काय पण मर्तिकासारख्या गोष्टींवरही बऱ्याच मोठ्या प्रमाणात खर्च करावा लागून कर्जबाजारी होऊन आत्महत्या करणारे शेतकरी चंगळवादी आहेत असे म्हणता येणार नाहीत पण ते सुबत्तेचेही चित्र दर्शवत नाहीत. हे निश्चित त्यामुळे समाजातील काही व्यक्तींकडून होणाऱ्या उधळपट्टीकडे बोट दाखवून या प्रकारास सुबत्ता म्हणणे हा परिस्थितीचा विपर्यास आहे.

नुकताच एका मित्राकडे गेलो त्यावेळी त्याच्या आलिशान घरात गेलो त्यापूर्वी तो ज्या घरात रहात होता त्याही घरात आम्ही दोघे गेलो होतो. त्यावेळी ते दोघेच त्या घरात रहात होते आणि ते घरही सर्व सुखसोयींनी युक्त होतेच पण अमेरिकेत रहाणारा मुलगा आला आणि त्याने स्वत:च्या कुटूंबाबरोबरच आई

वडिलांनाही एकत्र रहाता येईल असे आणखी मोठे घर तेही अतिशय महागड्या भागात घेतले होते. ”आम्हाला इतक्या मोठ्या घराची जरुरी नव्हती पण त्याच्याबरोबर रहायचे म्हटल्यावर त्याला जे योग्य वाटेल ते करू द्यावे “असे तो मित्र म्हणत होता. त्याच्याकडून बाहेर पडताना तो आपल्या मनातील विचार बोलून दाखवत होता, ” मी तुला सांगतो त्यावेळी ५५ रुपयात उत्तम कातड्याचा बूट शिवून मिळायचा तो मी घेतला त्यावेळी हा माझा मुलगा नुकताच शाळेत जायला लागला होता आणि शेवटी तोच बूट तो कॉलेजला जायला लागेपर्यंत मी घालत होतो आणि आता त्याच्या बुटाचे, चपलेचे जोड किती आहेत हे मोजल्याशिवाय सांगता येणार नाहीत. अर्थात माझीही परिस्थिती जवळ जवळ तशीच होती म्हणजे मी लग्नात अगदी महाग म्हणून घेतलेली बुटाची जोडी अशीच ५० रु. च्या आसपास किंमतीची होती आणि तीही मी आठ दहा वर्षे तरी वापरली होती. आम्हा दोघांनाही (म्हणजे मला व मित्राला)शाळेत जाताना घालायला बूटच काय पण चप्पलही नव्हत्या. मला एस एस सी परीक्षेला परगावी जायचे म्हणून चप्पल घेतल्या होत्या व परीक्षेनंतर आईबरोबर सज्जनगडावर चढताना आईच्या पायात चप्पल नसल्यामुळे तिचे पाय भाजायला लागले म्हणून तिला चप्पल देऊन मी पळत पळत चढलो ही आठवण अजूनही मी विसरू शकत नाही. त्यावेळी आमच्या घरात वडील व सर्वात मोठी बहीण नोकरी करत असल्याने या दोघांनाच चप्पल मिळत.

पण तेच आम्ही दोघे मित्र आपली मुले चालू लागण्यापूर्वीच त्यांच्यासाठी बूट किंवा सॅंडल्स खरेदी करू लागलो होतो. आणि आता तीच

मुले इतक्या बूटजोड्या खरेदी करतात म्हणून आम्हीच टीका करत होतो. आमचे शालेय शिक्षण म्युनिसिपालिटी किंवा लोकलबोर्डाच्या शाळात झाले म्हणजे आजच्या तुलनेत जवळ जवळ फुकटातच झाले. तर या मुलांचेही शिक्षण अगदी फुकटात नाही तरी फी देणे जड जावे असे झाले नाही तर आमच्या नातवंडांच्या शाळेच्याच फीचा आकडा ऐकून आम्हालाच चक्कर येते. आमचे लहानपण जवळ जवळ सगळे भाड्याच्याच घरात गेले पण आम्ही नोकरीला लागल्यावर उधार उसनवार करत पण बऱ्यापैकी घर बांधून राहिलो त्यामुळे आमच्या मुलाने स्वत:चे घर असणे हे हक्काचेच वाटले आणि आता त्याना घ्याव्या लागणाऱ्या घराच्या खर्चाचे आकडे आमच्या पोटात धडकी भरवतात.

त्यांची स्वत:ची जीवनशैली व आता आपल्या मुलांवर ते करत असलेला खर्च याला चंगळवाद म्हणायचे की सुबत्ता? बऱ्याच वेळा ती काळाची गरज म्हणावे वाटते पण प्रत्यक्षात तो चंगळवादच आहे आणि तो त्यांच्या सुबत्तेमुळे त्याना परवडतो पण ही सुबत्ता अगदी काही बोटावर मोजण्यासारख्या ठिकाणी पहायला मिळते. आणि फक्त तेथेच चंगळवाद फोफावतो.

खरे तर माणसाचा चंगळवाद त्याने घर बांधून रहायला सुरवात केल्यावर सुरू झाला. नाहीतर कुठल्याश्या गुहेत रहाणारा माणूस दररोज पोट भरण्यासाठी लागणारी मेहनत करून कंदमुळे वगैरे जमा करून खात असेल अंगावर सुरवातीस काहीच घालत नसेल तर पुढे हळू हळू झाडाची पाने किंवा फार फार तर वल्कले परिधान करत असेल पण हळू हळू सुधारणा होता घर बांधून रहाणे

व शेती करणे यांची सुरवात झाल्यावर गरजेपेक्षा अधिक उत्पन्न करणे व मग त्याचा उपभोग घेणे हा चंगळवादच सुरू झाला.

आता यावर चंगळवाद्यांच्या बाजूने प्रश्न विचारला जाऊ शकतो तो म्हणजे आम्ही काही कोणाला लुटून त्या पैश्यात निरनिराळ्या सुखांचा व सोयींचा उपभोग घेत नाही उलट समाजासाठी आम्ही धननिर्मिती करतो आणि त्यातून आम्ही करत असलेल्या अर्थाजनार्तूनच आम्ही या सुख सोयी उपभोगतो. उदा: स्वत:च्या व कुटुंबीयांच्या वास्तव्यासाठी २६ मजल्यांच्या राजवाड्यापेक्षाही भव्य आणि सुंदर इमारतीत रहाणाऱ्या अंबानीकडून अगदी समर्थ रामदासांसारखा "आम्ही काय कुणाचे खातो तो राम (नव्हे रिलायन्स) आम्हाला देतो असा प्रश्न विचारला जाऊ शकतो शिवाय आम्ही धननिर्मिती करतो व हजारो लोकांना रोजगार पुरवतो असा दावाही मांडला जाऊ शकतो. अम्बानी यांचा दावा रास्तच आहे पण त्याचबरोबर अनेक मोटरी येवढेच काय हेलिकॉप्टरही दिमतीला ठेवून त्यांचा वापर करणारे अंबानी अथवा तसेच इतर उद्योगपती किंवा आपण नागरिकही त्यासाठी लागणारे जे इंधन वापरतात त्याचा जगातील साठा अमर्याद नाही त्याचबरोबर अनेक वाहनांमुळे होणारे प्रदूषण हे पुणे मुंबई वा इतर शहरातील प्रदूषण मोठ्या प्रमाणात वाढवून स्वत:च्या चंगळीसाठी सर्व जगाला वेठीस धरत आहोत.

अमेरिकेसारखे देश चंगळवादापायीच मोठ्या प्रमाणात प्रदूषणात भर घालत असून त्यासाठी करावयाच्या पॅरिस करारावर मात्र सही करायला तयार नाहीत त्यामुळे उत्तर ध्रुवावरील बर्फ वितळून जगाच्या तपमानात दरवर्षी भर

पडत आहे ज्याला आपण ग्लोबल वॉर्मिंग असे संबोधतो. बहुतांश उद्योग आपल्या उद्योगनिर्मितीतून निर्माण होणारा कचरा नद्या किंवा समुद्र अश्या ठिकाणी विसर्जित करत आहेत व त्यामुळे अनेक पर्यावरणास आवश्यक सूक्ष्म जीवजन्तु किंवा प्राणीजीवनासही हानी पोचवत आहेत त्यामुळे एक दिवस शुद्ध मोकळी हवा व स्वच्छ पाणी यांच्या अभावी सर्व मानव जातच नष्ट होण्याची शक्यता अनेक वैज्ञानिकांनी बोलून दाखवून प्रत्यक्ष आकडेवारीने सिद्ध केले आहे.

शासनाचीही एक जबाबदारी आहे ती म्हणजे मोठ्या प्रमाणात सार्वजनिक व्यवस्था निर्माण करणे. आपल्याकडे रस्ते, सार्वजनिक वाहतूक अश्या सर्वच सुविधांचा अभाव असल्याने प्रत्येक व्यक्तीस आपली सोय स्वत: करून घ्यावी लागल्यावर हवा पाणी या सार्वजनिक मालकीच्या वस्तूंची नासाडी व उधळपट्टी थांबवता येणे आवश्यक आहे ते न करता अमेरिका पॅरिस करारावर सह्या करत नाही म्हणून केवळ आगपाखड करून आपली भूमिका आपण पार पाडतो या म्हणण्या त अर्थ नाही. कारण आपणही आपल्या क्षणिक सौख्यासाठी विचार न करता नैसर्गिक साधनसंपत्तीची वारेमाप उधळपट्टी करत आहोत त्यामुळे सुबत्ता आल्याचा भास होत असला तरी याचा अटळ शेवट या ग्रहाचा अंत होण्यातच आहे ही गोष्ट ध्यानात घेऊन आपल्या चंगळवादास आळा घालणे आवश्यक आहे. तरच खरी सुबत्ता येऊन ‘‘सर्वेत्र सुखिन: सन्तु । सर्वे सन्तु निरामया: सर्वे भद्राणि पश्यन्तु ही प्रार्थना करण्याचा हक्क आपल्याला राहील.

# २१. स्थलांतरित

अमेरिका स्थलांतरितांचा देश असे म्हटले जाते, पण खरे तर भारतही स्थलांतरितांचाच देश आहे आणि तसे पहाता सर्वच देशांच्या बाबतीत तसे म्हणता येईल, कारण पहिला मानव आफ्रिका ज्याठिकाणी आहे त्या भूखंडावर जन्मला असे उत्क्रान्तिवाद म्हणतो, तर लोकमान्य टिळकांच्या सिद्धान्तानुसार "आर्क्टिक होम ऑफ़ द वेदाज " म्हणजे आपले पूर्वज आर्क्टिक महासागराच्याजवळ रहात होते. अगदी आपल्या अवतार सिद्धान्तानुसार सुद्धा पहिला अवतार मत्स्य अर्थात तो पाण्यातलाच जीव होता. थोडक्यात आपण सर्वजण स्थलांतरित आहोत, म्हणजे स्थलांतर करणे हाच जीवाचा स्थायीभाव आहे, त्याचमुळे आदर्श वसाहत (आयडियलकॉलनी हा इंग्रजी शब्द वापरायचा नसेल तर) तर स्थलांतरित लोकांनीच भरलेली आहे आणि मीही सध्या त्यातील एक आहे.

माझा जन्म "औन्ध " या संस्थान म्हणवणाऱ्या गावात झाला आणि तेथून शिक्षणाच्या दृष्टीने माझे पुण्यात पहिले पाऊल तब्बल ६४ वर्षापूर्वी पडले आणि त्यावेळी पुणे हीच खरोखर आदर्श वसाहत(Ideal Colony )होती. आणि त्यावेळी तेथे साडेसात लाख लोक रहात होते आता ती संख्या बरोबर त्याच्या दहापटीने वाढली आहे. त्यावेळी पुणे सायकलींचे शहर होते, आणि सायकलींव्यतिरिक्त पायी चालणारेही भरपूर होते. अगदी पु. भा. भावे (होहो,

तेच साहित्यिक, नाटककार आणि त्या रस्त्याची लांबी अजून असती तर कथाकार, कादंबरीकार अश्या आणखी दोन पाट्यासुद्धा लावता आल्या असत्या) आणि गदिमा (आधुनिक वाल्मिकी) एकमेकास चालत आपापल्या घरात पोहोचवायचे आणि मीहि त्यावेळी मी रहात असलेल्या फ़र्ग्युसन महाविद्यालयाच्या वसतीगृहातून बहुतांश पुण्यात चालतच विहार करायचो.

अर्थातच त्यावेळी आयडियल कॉलनी अस्तित्वातच नव्हती. आजचे गरवारे म्हणजे त्यावेळचे एम. ई. एस. कॉलेज ( महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीचे महाविद्यालय) हे पुण्याचे एक टोक होते त्याच्यापुढे “देवल भांडी कारखाना” एवढेच आम्हास माहीत असलेले पुणे होते. १९६१ मध्ये पानशेतचा हाहा:कार झाला आणि त्यातून सावरलेले पुणे जणु कात टाकून नवेच पुणे झाले. आणि त्याची अवस्था भीमरूपी स्तोत्रातील “वाढता वाढता वाढे “अशी होऊन आज माझ्या पहिल्या पुण्याची लोकसंख्या बरोबर दहा पट म्हणजे ७७ लाख झाली आहे.

औन्धाहून पुण्यात मी स्थलांतरित केवळ महाविद्यालयीन शिक्षणासाठी झालो प्रथम फ़र्ग्युसन व नंतर सीओईपी (अभियंत्रिकि महाविद्यालय पुणे, जे नाव बदलण्यास सर्व पुणेकरांनी विरोध केल्यामुळे टिकले) मध्ये शिक्षण पूर्ण करून मी शासकीय सेवेत औरंगाबादमधील तंत्रनिकेतन व अभियांत्रिकि महाविद्यालयात रुजू झालो. तेथे शासकीय निवासस्थान मिळाले आणि आम्ही निश्चिन्त झालो जणु आता जन्म इथेच काढायचा आहे. , आमचे काही सहकारी मित्र खरोखरच सेवानिवृत्तही औरंगाबादलाच झाले, पण औरंगाबादमध्ये बरोबर

एक तप काढल्यावर आणीबाणीच्या काळात सर्व शासकीय कर्मचाऱ्यांना अनधिकृत कारवाया करण्यास आळा बसावा म्हणून निरनिराळ्या जागी फेकण्यात आले आणि पुन्हा एकदा आम्ही स्थलांतरित झालो व सोलापुरास आमची रवानगी झाली पण आणखी काही निमित्ताने चार वर्षानंतर परत औरंगाबाद मुक्कामी आम्हास धाडण्यात आले.

आता मात्र शासकीय निवासस्थान मिळण्याची आशा सोडून आता आपण येथेच स्थायिक व्हायचे असा विचार करून आम्ही दोघे, आणि आमची दोन मुले सर्वजणांना एकत्र रहाता यावे इतकेच काय आपल्या नंतर घराचे योग्य वाटे भांडण न करता मुलांना करता यावे इतक्या दुरदृष्टीने औरंगाबादला घर बांधण्याचा मूर्खपणा केला. एका शहाण्यानेच सांगून ठेवले आहे ना "मूर्ख लोक घरे बांधतात आणि शहाणे लोक त्यात रहातात. " असो, घर इतक्या सायासाने व दूरवरचा विचार करून बांधले आणि झाले काय? "हा हन्त हन्त नलिनीं गज उज्जहार" तसा प्रकार झाला आणि दोन्ही मुलानी अभियांत्रिकि पदवी घेतल्यावर "आकाशी झेप घेरे पाखरा " हा त्यांच्या जन्मानंतर गदिमांचे वारसदार म्हणवणाऱ्या जगदीश खेबुडकरांचा उपदेश तंतोतंत पाळला. एकाने कशीबशी दोन वर्षे औरंगाबादला काढली तर दुसऱ्याने तेवढीही तसदी घेतली नाही आणि एवढ्या मोठ्या घरात आम्ही दोघेच राहिलो. धाकट्याने अमेरिकाच गाठली तर थोरल्याने पुणे पसंत केले. अर्थात त्यातल्या त्यात बरे म्हणून आम्हीही पुण्यात स्थलांतरित झालो.

मधल्या काळात थोरल्यालाही कंपनीनेच अमेरिकेस धाडले ( आठवा धाडला राम तिने का वनी)व आम्ही मधल्यामध्ये दोघेच पुण्यात राहिलो, अर्थात पुणे मला तसे अतिपरिचित असल्यामुळे तसे फार काही बिघडले नाही आणि त्यावेळी तसे आम्ही दोघेही बरेच तंदुरुस्त होतो आणि त्यामुळे सात आठ अमेरिका वाऱ्याही पार पाडल्या. म्हणजे त्यावेळी आम्ही अमेरिकेत मधून मधून स्थलांतर करत होतो. पण मग थोरल्याने अमेरिकेतील कार्यकाळ संपवून पुण्यातच रहाण्याचा निर्णय घेतला आणि आता मात्र आम्ही पुण्यात पक्के पुणेकर झालो, पण त्यापूर्वी औन्ध, पुणे. मुंबई ( हो थोडे दिवस मुंबईतही मी नोकरीनिमित्त वास्तव्य केले होते)औरंगाबाद, सोलापूर, परत औरंगाबाद आणि शेवटी आदर्श वसाहतीत स्थानापन्न झालो, अर्थात पुण्यातल्या पुण्यातच थोरल्याबरोबर सिंहगड रस्त्यावरच "शुभारंभ' "सुन्दर गार्डन " व "सन प्लॅनेट " अश्या तीन वसाहतीत आम्ही वास्तव्य केले होतेच!म्हणजे हे आमचे जवळजवळ बारावे स्थलांतर होते, तसा जन्मत: मी स्थलांतरितच होतो कारण माझा जन्मही औन्धात न होता आटपाडी या वडिलांच्या मित्राकडे मातेच्या उदरात मी असताना गेलो असता तेथेच मला भूमीवर अवतरण्याची बुद्धी झाली म्हणजे औंधातही मी स्थलांतरितच होतो.

आयडियल कॉलनीत मला सर्वात आवडलेली गोष्ट म्हणजे अगदी डोळे मिटून फिरायला एक आदर्श मैदान आहे, कारण यापूर्वीच्या सर्व जागांवर (एक औन्ध सोडले तर)जीव मुठीत घेऊनच फिरावे लागे. अर्थात हे मैदान टिकावे म्हणून येथील पूर्व स्थायिकांना बराच झगडा करावा लागला म्हणे, आताही

आम्ही येण्यापूर्वी बऱ्याच बांधकाम व्यावसायिकांच्या डोळयात इतकी मोठी मोकळी जागा सलत होती म्हणे व त्यासाठीही येथील नागरिकांना झगडावे लागलेच!

तीनच वर्षे काढल्यामुळे फक्त आमच्यासारखेच अनेक स्थलांतरितच मुले जवळ असावीत या उद्देशाने येथे रहाणारे आहेत येवढी गोष्ट ध्यानात आली आणि करोना उद्भवापूर्वी आयडियल मैदानात बाकावर बसून शिळोप्याच्या वा आमच्या वेळी पुणे कसे होते याविषयी गप्पा मारल्या जात होत्या किंवा पुण्यातलेच कोणी मित्र भेटले तर आता कोण कोण उरले आणि उरलेल्यापैकी कोण कोण कुठे आहे याविषयी चर्चा व न उरलेल्यांविषयी हळहळ व्यक्त केली जात होती. आता तेही अवघड झाले आणि प्रत्येक जण शेवटचे स्थलांतर केव्हां (कोठे हे तर ठरलेच आहे) याची वाट पहात आहे.

# २२. एकशे एकावा पुरुष

आत्मचरित्रांचा विचार केल्यास स्त्रियांनी बऱ्याच उशीरा आत्मचरित्रे लिहायला सुरवात केली असे दिसते आणि त्याचे कारणही उघडच आहे कारण लिहितावाचता येण्यासाठीच स्त्रियांना बराच काळ वाट पहावी लागली. लक्ष्मीबाई टिळकांचे आत्मवृत्त ’स्मृतिचित्रे’ हे त्यानी लिहायला शिकता शिकता लिहिले म्हणता येईल कारण त्यांना लिहिता लिहिता एकादा शब्द अडला तर त्या ठोम्बरे (बालकवि) ला अगर त्यांच्या मुलांना विचारत असा उल्लेख त्यात आहे. रमाबाई रानडे यांचे"माझ्या आयुष्यातील आठवणी" हे त्यांच्या व माधवरावांच्या सहवासातील दिवसांच्या आठवणी असेच आहे.

सर्व स्त्रियांच्या आत्मवृत्तात आढळणारी एक अगदी साधारण बाब म्हणजे पुरुषी वर्चस्वाची होणारी ओळख, याला अपवाद एकमेव म्हणजे माधवराव रानडे यांचा आणि त्याला कारणीभूत त्यांचा मूळ क्षमाशील स्वभाव व समाजभयामुळे केलेला विवाह. कारण ज्या सुधारणेचे अध्वर्यू ते होते त्यानुसार पुनर्विवाह हा विधवेशीच करायचा या मताचे ते होते (धोंडो केशव कर्वेयांनी याचे उदाहरण समोर ठेवले होते. )पण घरच्या दबावामुळे आपल्या हातून झालेली चूक सुधारण्याचा त्यांनी आयुष्यभर प्रयत्न केला हे उघडच आहे पण पुरुषी वर्चस्व गाजवणे हे त्यांच्या वृत्तीतच नव्हते. शिवाय कधी त्यांनी तसे गाजवलेच असेल तर रमाबाईंच्या स्वभावात त्याचा उल्लेख करणे बसत नसावे.

याउलट इतरांसाठी क्षमाशील असणारे रे. टिळक, पु. ल. देशपांडे किंवा प्रभाकर पाध्ये यांच्यासारखे पुरुषही आपापल्या बायकांवर वर्चस्व गाजवतात असे "स्मृतिचित्रे" "आहे मनोहर तरी" ("सुनीता देशपांडे ) व "बंधअनुबंध"( कमल पाध्ये) ही आत्मचरित्रे वाचल्यावर वाटते. . पु. ल. च्या बाबतीत त्यांच्याकडे बालकाच्या सहृदयतेनेच सुनीताबाईंनी पाहिले व ते मूल बनूनच राहिले असे "आहे मनोहर तरी"वरून वाटते. (दोन्हीमधील आणखी एक साम्यस्थळ म्हणजे पुरुषांनी करावयाची कामेही (गाडी चालवणे) कमल पाध्ये व सुनीता देशपांडे याच करताना दिसतात. )

कमल पाध्ये यांच्या बंध अनुबंधाविषयी ते केवळ"प्रभाकर पाध्ये व कमल पाध्ये"यांचे वैवाहिक जीवन नसून एकूणच स्त्रीजीवनाचा आढावा त्यात आहे व आजही ज्या अडचणींना स्त्रीला तोंड द्यावे लागते त्या अनादिकाळापासून म्हणजे द्रौपदी पासूनच्या आहेत हे जाणवते. विशेषत: पुरुषाचा स्त्रीकडे पहावयाचा दृष्टिकोण. त्याचमुळे कुंतीने द्रौपदीची वाटणी करून भावांनधील कलह टाळला असे दुर्गा भागवतांनी म्हटले आहे.

प्रथम लक्ष जाते ते स्त्रीच्या देहाकडेच. याचा उल्लेख "बंधअनुबंध"मध्ये अनेक वेळा येतो. अगदी लहानपणापासून पुरुषी स्पर्षातील फरक कळण्याची उपजत प्रवृत्तीच स्त्रीमध्ये असते असे त्यांनी लिहिलेल्या लहानपणाच्या अनुभवावरून दिसते. त्यामुळेच मोठेपणी पुरुषांविषयी येणाऱ्या अनुभवांवरून आपलया दाभोळकर नावाच्या परिचित व्यक्तीशी बोलताना कमल पाध्ये त्यांना विचारतात, "मी अनेक पुरुषांना विचारल की एकाद्या स्त्रीला तुम्ही प्रथम पाहता

तेव्हां तुमच्या मनात कोणती भावना येते? अगदी खरं प्रामाणिकपणे सांगा हं! तेव्हां शंभर जणांनी तरी"उपभोग"" असे उत्तर दिले आहे " त्यावर दाभोळकर म्हणाले "यापुढे शंभर लोक म्हणाले असे म्हणू नका एकशे एक म्हणाले असे म्हणा "

"काय अर्थ याचा?स्त्री केवळ मादी?मग कसली नाती आणि कसली गोती?" हे त्यावर कमलताईंचे भाष्य आहे. यात प्रश्न विचारणाऱ्या कमल पाध्ये यांचे तर कौतुक करावेच लागेल पण असे उत्तर देण्याचे धैर्य श्री दाभोळकर यांनी दाखवले हे विशेष.

हे पुस्तक वाचल्यावर त्यातील पुरुषी मनोवृत्तीचा वेध घेतल्यावर सध्या जगात बलात्काराचे पेव फुटल्यासारखे वाटते तसे नसून जगाच्या आरंभापासून हेच चालू आहे हे समजते. ( फक्त आता निरनिराळया माध्यमांचा सुकाळ झाल्यामुळे आपल्याला हे कळू लागले आहे एवढेच. (नुकत्याच दोन बलात्काr खटल्यांचा निकाल लागून बलात्कार करणाऱ्यांना फाशीची शिक्षा सध्या तरी झाली आहे) अर्थात पुस्तकाचा मूळ हेतू फक्त हे सत्य समोर आणणे हा नाही. पण बालपणापासूनच स्त्रीला कोणत्या यातनांचा समना करावा लागतो त्यामुळे हे पुस्तक एकापरीने"स्त्रीजन्मा ही तुझी कहाणी"आहे असे म्हणता येईल. (अनुबंध या शब्दाचा अर्थ बेडी हाच आहे. ) हे पुस्तक वाचल्यावर प्रत्येक पुरुषालाच आपण तो १०१वा पुरुष आहोत की काय असे वाटू लागण्याची शक्यता आहे.

--------------------------------------------------

# ई साहित्य प्रतिष्ठानचे हे पंधरावे वर्ष
# श्री श्याम कुलकर्णी यांचे हे अकरावे पुस्तक.

श्री श्याम कुलकर्णी हे इंजिनियरिंगचे शिक्षक. पण त्यांचा पिंड साहित्यिकाचा. जगातील विविध रसांचा आस्वाद घेणे, जे जे आवडेल त्याला मनसोक्त दाद देणे आणि जे जे न आवडेल त्यातील विसंगती ओळखून त्यावर विनोद करून ते सोडून देणे असे त्यांचे जीवनसूत्र आहे. त्यामुळे त्यांच्या साहित्यात विविधता आहे. स्त्री मनाच्या वेदनांचा वेध घेणाऱ्या कथा ते लिहितात तसेच विनोदी साहित्यही. संस्कृत साहित्याचा आस्वद घेतात तसाच संगीत आणि इतर कलांचाही. सध्या ते वाल्मिकी रामाअणाच्या २४००० श्लोकांचा मराठी श्लोकानुवाद करण्यात मश्गुल आहेत.

श्री. श्याम कुलकर्णी यांच्यासारखे ज्येष्ठ लेखक आपली पुस्तके ई साहित्यच्या माध्यमातून जगभरातील मराठी वाचकांना विनामूल्य देतात. असे लेखक ज्यांना लेखन हीच भक्ती असते. आणि त्यातून कसलीही अभिलाषा नसते. मराठी भाषेच्या सुदैवाने गेली दोन हजार वर्षे कवीराज नरेंद्र, संत ज्ञानेश्वर, संत तुकारामांपासून ही परंपरा सुरू आहे. अखंड. दिनानाथ मनोहर(४ पुस्तके), शंभू गणपुले(९पुस्तके), डॉ. मुरलीधर जावडेकर(९), डॉ. वसंत बागुल (१९), शुभांगी पासेबंद(१३), अविनाश नगरकर(४), डॉ. स्मिता दामले(९), डॉ. नितीन मोरे (३६), अनील वाकणकर (९), फ्रान्सिस आल्मेडा(२), मधुकर सोनावणे(१२), अनंत पावसकर(४), मधू शिरगांवकर (८), अशोक कोठारे (४७ खंडांचे महाभारत), श्री. विजय पांढरे

(ज्ञानेश्वरी भावार्थ), मोहन मद्वण्णा (जागतिक कीर्तीचे वैज्ञानिक), संगीता जोशी (आद्य गझलकारा, १८ पुस्तके), विनीता देशपांडे (७) उल्हास हरी जोशी(७), नंदिनी देशमुख (५), डॉ. सुजाता चव्हाण (८), डॉ. वृषाली जोशी(३२), डॉ. निर्मलकुमार फडकुले (१९), CA पुनम संगवी(६), डॉ. नंदिनी धारगळकर (१५), अंकुश शिंगाडे(१९), आनंद देशपांडे(३), नीलिमा कुलकर्णी (२), अनामिका बोरकर (३), अरुण फडके(६) स्वाती पाचपांडे(२), साहेबराव जवंजाळ (२), अरुण वि. देशपांडे(५), दिगंबर आळशी, प्रा. लक्ष्मण भोळे, अरुंधती बापट(२), अरुण कुळकर्णी(९), जगदिश खांदेवाले(५) पंकज कोटलवार(५) डॉ. सुरुची नाईक(३) डॉ. वीरेंद्र ताटके(२), आसावरी काकडे(६), श्याम कुलकर्णी(११), किशोर कुलकर्णी, रामदास खरे(४), अरुण कुळकर्णी(११) अतुल देशपांडे, लक्ष्मण भोळे, दत्तात्रय भापकर, मुग्धा कर्णिक, मंगेश चौधरी असे अनेक ज्येष्ठ व अनुभवी, कसलेले लेखक ई साहित्याच्या द्वारे आपली पुस्तके लाखो लोकांपर्यंत विनामूल्य पोहोचवतात.


अशा साहित्यमूर्तींच्या त्यागातूनच एक दिवस मराठीचा साहित्य वृक्ष जागतिक पटलावर आपली ध्वजा फडकवील याची आम्हाला खात्री आहे. यात ई साहित्य प्रतिष्ठान एकटे नाही. ही एक मोठी चळवळ आहे. अनेक नवनवीन व्यासपीठे उभी रहात आहेत. त्या त्या व्यासपीठांतून नवनवीन लेखक उदयाला येत आहेत. आणि या सर्वांचा सामूहिक स्वर गगनाला भिडून म्हणतो आहे.


**आणि ग्रंथोपजीविये। विशेषीं लोकीं ’इ’यें।**
**दृष्टादृष्ट विजयें। होआवे जी।**


श्री. श्याम कुलकर्णी यांची ई साहित्यवरची पुस्तकं.


यांवर टॅप किंवा क्लिक करा. थोडं थांबा. ते उघडेल. वाचा.

(इंटरनेट पाहिजे हो. नाहीतर उघडणार नाही)






















आदिकवी
श्री वाल्मिकी
विरचित
मूळ संस्कृत
रामायण
मराठी श्लोक
श्री. श्याम
कुलकर्णी


मराठी श्लोकानुवाद- श्री श्याम कुलकर्णी
॥ श्रीमद्भगवद्गीता ॥


बुध कौशिक ऋषी
विरचित
रामरक्षा
मराठी समश्लोकी
श्याम कुलकर्णी


॥ श्रीगणपत्यथर्वशीर्षोपनिषद् ॥
मराठी समश्लोकी श्याम कुलकर्णी